वेष्टन — २१८
ग्रं. नं. २९९

# सुवर्णकण.

[ श्री अक्कलकोटकर स्वामींचा
चतुर्दश लघुकथात्मक परिचय ]

REFBK-0004380

श्रीपाद शंकर पटणकर.

[ अक्कलकोटदरबारनें बक्षिस देऊन गौरविलेले ]

# जीवनाचे सुवर्णकण.

[ श्री अक्कलकोटकर स्वामींचा चतुर्दश
लघुकथात्मक परिचय. ]

लेखकः—

**श्रीपाद शंकर पट्टणकर.**

REFBK-0004380

[ प्रथमावृत्ति सन १९३१ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६३८०
ग्रंथ शाखा

किंमत बारा आणे.

[ सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन. ]

मुद्रकः—

धोंडो नारायण विद्वांस.

श्रीरामविजय प्रेस, बडोदें.

# श्री ग णे शा—

ओबडधोबड हाताचा हा माझा पहिला घडा मी माझ्या सरस्वतीमाईला व तिच्या प्रभावळींत विराजणाऱ्या प्रेमळ सज्जनांना काढून दाखवित आहे. त्यांत दोष काढावे तितके निघतील-लच. परंतु 'त्या दृष्टीनेंच आम्ही पाहतों' असें लिहून दाखविणाराला जाणवून देणें कुणाच्या हिताचें असतें? सारस्वतमंदिरांत हें पहिलें पाऊल टाकतांना मी थोडासा भांबावून जाणें साहाजिक आहे पण माझी धूळपाटी पुढील घड्याकरितां मी घट्ट धरून ठेवली आहे. इथवर मला आणणाऱ्या, आणून पाठीशीं उभ्या राहणाऱ्या व राहून राहून मला धीर देणाऱ्या सर्व व्यक्तींविषयीं मला कृतज्ञता तर वाटतेच वाटते पण त्यांची व इतर सहृदयांची मदत इतउत्तरही घेण्याचा लोभ तिच्याहून अधिक वाटतो आहे. माझी ते निराशा करणार नाहींत अशी बळकट आशा दर्शवून पान उलटण्याची विनंती करितो.

श्रीदत्तजयंति.
बडोदें २३–१२–३१ } श्रीपाद शंकर पट्टणकर.

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | अर्पणपत्रिका. | ५ |
| २ | श्रीमंत मातोश्री ताराबाईसाहेब भोंसले रीजंट राणीसाहेब सं. अक्कलकोट ह्यांचें अल्पचरित्र. | ७–८ |
| ३ | प्रस्तावना. के. श्री. रामचंद्र रावजी नातु, एम्. ए. | १–६ |
| ४ | कथाकथा– | |
| | १ परित्राणाय साधूनाम् । (कथा १–७) | १–४० |
| | २ विनाशाय च दुष्कृताम् । („ ८–११) | ४१–६० |
| | ३ धर्मसंस्थापनार्थाय । (कथा १२–१४) | ६१–७६ |
| ५ | संभवामि युगे युगे । | ७७ |
| ६ | परिशिष्ट. स्वामींच्या चरित्राचें ऐतिहासिकदृष्ट्या विवेचन. | १-१४ |



श्रीमंत मातोश्री ताराबाईसाहेब भोसले.

रीजंट संस्थान—अक्कलकोट.

श्रीमंत मातोश्री ताराबाईसाहेब भोसले,

रीजंट राणीसाहेब, संस्थान अक्कलकोट,

यांचे सेवेसी,

**मातोश्री राणीसाहेब,**

जीवसृष्टीचा ऐहिक संसार सुरळीत चालण्यासाठीं **राजशक्तीचा** जन्म आहे. 'स पिता, पितरस्तासां केवलं जन्महेतवः' या कविकुलगुरूंच्या त्रिकालाबाधित उक्तीप्रमाणें व्यक्तिमात्राचा आयुष्यक्रम **राजशक्तीच** आंखून देते. अनेक गरीबांच्या पोटापाण्याचा व पोराबाळांचा संसार धर्मबुद्धीनें थाटून देण्यांत **राजशक्तीचा** सद्व्यय आजवर झाला आहे व पुढेही होईल पण एखाद्या गरीब, नवथर, लेखकाचा वाक्संसार उभा करून देण्याइतकी रसोद्ग्राही धर्मबुद्धि फारच थोड्यांच्या ठायीं दिसून येते. तो विरळ गुण प्रकट करून माझ्या अल्पकृतीला उदारपणें बक्षीस देऊन ती कृती जगापुढें ठेवण्यास आपण मला जी मातेच्या निर्हेतुक वात्सल्यानें मदत केलीत त्याबद्दल ही कृती कृतज्ञतापूर्वक आपल्यालाच अर्पण करीत आहे.

आपला नम्र बालक,

माडवी नजीक श्रीदत्तमंदिर
**बडोदें.** ता. २३-१२-३१

**श्रीपाद शंकर पट्टणकर**

# श्रीमंत ताराबाईसाहेब भोंसले

## यांचें अल्पचरित्र.

श्रीमंत मातोश्री ताराबाईसाहेब भोंसले, रीजंट राणीसाहेब, संस्थान अक्कलकोट, यांचा जन्म करवीर येथें **ता. ३० माहे मे सन १८९९** रोजीं झाला. कागल-संस्थानाधिपति श्रीमंत बापुसाहेबमहाराज यांच्या या कन्या होत. यांनीं आपले चुलते श्रीछत्रपति श्रीमंत शाहूमहाराज यांच्या देखरेखीखालीं राजकन्येस उपयुक्त असें शिक्षण घेतलें. ता. २८ माहे एप्रिल सन १९१२ रोजीं त्यांचा अक्कलकोट-सरकार श्रीमंत फत्तेसिंहमहाराज यांच्याशी विवाह झाला. विजय, जय, लीला व प्रमिला या नांवाच्या चार गुणश्रेष्ठ अपत्यांना जन्म दिल्यानंतर स्त्रीजनांवर इहलोकीं येणारी सर्वांत मोठी आपत्ति त्यांच्यावर कोसळली. परंतु अतुल धैर्यानें त्यांनीं आपल्या स्वतःचे दुःख गिळून प्रजापालन करण्याची जी अनन्यसामान्य कर्तव्यनिष्ठा दाखविली, ती पाहून ब्रिटिश सरकारनें युवराज श्रीमंत विजयसिंहमहाराज यांच्या अज्ञानावस्थेंत त्यांना संस्थानचे रीजंट नेमले. आजच्या तीव्र पक्षभेदांच्या अतीत राहून निर्विकारमनानें व निःपक्षपातबुद्धीनें त्या संस्थानचा राज्यशकट चालवित आहेत. आपल्या संस्थानांतील स्त्रीपुरुषांची बौद्धिक, शारीरिक किंबहुना सर्वांगीण उन्नति व्हावी एतदर्थ राणीसाहेब कायावाचामनें करून झटत आहेत आणि त्यामुळें साहजिकच त्या लोकप्रिय झाल्या आहेत. याप्रमाणें इहलोकींचें आपले कर्तव्यकर्म योग्य प्रकारें बजावित राहून भक्तिभावानें परमेश्वराची आराधना करून त्या आपलें पारलौकिक कल्याणही साध्य करून घेत आहेत. संतसज्जनांची त्यांच्यावर

१४-१०-१०



पूर्ण कृपा आहे. हुबळीचे महासाधु श्रीमत् सिद्धारूढ स्वामिमहाराज यांनीं त्यांना उपदेश दिला आहे. सारांश श्रीमंत मातोश्री ताराबाईसाहेबमहाराज ह्मणजे

दीन अनाथांची जननी। धर्मभावनांची श्रेणी॥
सद्गुणरत्नांची खनी। लोकप्रिय॥ १॥
बुद्धीची कुशल। वाचेची रसाळ॥
अंतरीं निर्मळ। गंगेपरी॥ २॥

अशाच आहेत. अशा या सात्विकतेच्या मूर्तीलाच श्रीअक्कलकोटनिवासी स्वामिमहाराजांनीं उमलविलेलें कथापुष्प अर्पण करण्याचा सुयोग आल्याबद्दल कुणाला आनंद वाटणार नाहीं? श्रीमंत ताराबाईसाहेबमहाराज यांच्याकडून अशीच उत्तरोत्तर जनताजनार्दनाची सेवा अधिकाधिक घडावी आणि जनकल्याणार्थ त्यांना आयुरारोग्यैश्वर्याचा मुबलक लाभ व्हावा अशी सर्वत्राचीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

सं. ५२. ५५२

[stamp]

# प्रस्तावना.

प्रस्तावनालेखन हीदेखील अलीकडे एक कला होऊन बसली आहे. ' पूर्वी आणि आतां ' च्या कालांत जे अनेक फरक जनदृष्टींत दिसून येतात त्यांतलाच हा एक फरक आहे कीं पूर्वी प्रस्तावनेचीं पानें वगळून वाचक मूळ पुस्तकाकडे वळे. हल्लीं प्रत्येक सुशिक्षित माणूस प्रस्तावनाच आधीं वाचतो. याला कारणही तितकेंच सबळ आहे. जुनी प्रस्तावना जुन्या नाटकांतील नटीप्रमाणें, ठराविक व घोकलेली भाषा बोलत असे. आजच्या प्रस्तावनेंत, आजच्या विदुषींप्रमाणें, खोल व व्यापक विचार प्रतिबिंबित झालेले असतात. आजच्या प्रस्तावना मूळ पुस्तकांतील विषयाची सारांशरूपानें मांडणी करून, अनेक प्रश्नांची सर्वांगीण चर्चा करीत असतात. यासाठींच मी म्हटलें कीं प्रस्तावनालेखन ही एक कला होऊन बसली आहे.

या कलेंत मी स्वतः मुळींच प्रवीण नसतानां, माझे स्नेही श्री. पट्टणकर यानीं मला ही प्रस्तावना लिहिण्याची कामगिरी सोपली आहे. अशा वेळीं मित्रकार्य केल्यास, प्रस्तावना बरी न लिहिली गेली तर आपलें हंसूं होतें. बरें मित्रकार्य न करावें तर स्नेहभावांत कमीपणा वाटून मन दुखावण्याचा संभव. पैकीं पहिल्याच प्रयत्नांत हंसूं झालें तरी हरकत नाहीं असा विचार करून हें कार्य हातीं घेत आहे.

श्री. पट्टणकर यांनीं मला आपल्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत दाखविली. एकंदर मजकूर वाचून पाहातां त्यांच्या दीर्घ प्रयत्नाचें कौतुक वाटलें. या पुस्तकात त्यांनीं अक्कलकोटनिवासी श्री स्वामिमहाराजांचा " लघुकथात्मक परिचय " करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्वामिमहाराजांचा शिष्यसांप्रदाय पुष्कळ मोठा आहे व त्यामुळें त्यांच्या चरित्रावर प्रकाश पाडणारे पुष्कळ ग्रंथ निर्माण झालेले आहेत. त्यांतलाच हा एक ' नवीन वळणाचा ' प्रयत्न आहे. एका मोठ्या विभूतीच्या आयुष्यांतील प्रसंग कलेच्या विविध रंगानें चित्रित करून जगापुढें मांडणें हा या ग्रंथकर्त्याचा महत्त्वाचा हेतू आहे. असें असून सुद्धां लेखकानें महाराजांच्या जन्मकाळनिर्णयविषयक चर्चेंत भाग घेतलेला आहे. लेखकानें दिलेला निर्णय जरी कित्येकांना न पटला तरी त्याच्या तर्कशुद्ध विचारसरणीबद्दल कोणीही त्याचें कौतुकच करील.

पुस्तकाचा मुख्य भाग १४ लघुकथांनीं व्यापिला आहे. या लघुकथांचा अनुक्रम एक विशिष्ट दृष्टी पुढें ठेऊन साधलेला आहे. " परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय " हें प्रत्येक महान अवतारी विभूतींचें जीवितकार्य ठरलेलें आहे. स्वामिमहाराजांच्या अनेक लीला याच तत्वाला धरून आहेत. पहिल्या सात लघुकथा सामान्यतः ' परित्राणाय साधूनाम् ' या वर्गांत पडतात. यापैकीं देखील सूक्ष्म भेद दाखवितानां असें म्हणतां येईल कीं पहिल्या तीन लघुकथा, ' स्वामींनीं गरिबांवर कृपादृष्टी कशी ठेविली ' हें दाखवितात. त्या नंतरच्या दोन, ' पतितांचा उद्धार स्वामींनीं कसा केला ' हें दर्शवितात व त्या नंतरच्या दोन, ' स्वामींची आपल्या भक्तांवर कशी प्रेमळ नजर असे ' हें दाखवितात.

अंक ८ ते ११ या चार लघुकथा ' विनाशायच दुष्कृताम् ' या सदरांत पडतात. सामान्यतः ' विनाशाय च दुष्कृताम् ' याचा अर्थ ' दुष्टांचा नाश करणें ' असा करण्यांत येतो. पण हा अर्थ पूर्णपणें खरा नव्हे. स्वामी रामतीर्थ म्हणत असत, " Hate the sin; not the sinner ". सर्व साधुपुरुष

आपल्या वागणुकींत हीच दृष्टी ठेवित असतात. दुष्ट माणसांचा नाश साधारण माणूस देखील करूं शकतो परंतु त्या माणसाला जिवंत ठेऊन, त्याच्यांतील दुष्टपणा, लबाडी, वगैरे हिणकस गुणांचा नाश करून त्याच माणसाला **जास्त जिवंत करणें** यांतच साधूंचा श्रेष्ठपणा असतो. या श्रेष्ठपणाचें स्वामीमहाराज हें एक उदाहरण आहेत. या विभागांतील प्रत्येक लघुकथेंत स्वामींनीं टवाळांना आपल्या ज्ञानवैभवानें दिपवून त्यांच्यांतील हीन वृत्तींचा नाश केला, हें स्पष्ट दाखविलें आहे लबाड मनुष्याला शिक्षा करून स्वामी त्यास कसें शरण आणीत हेंही दाखविलें आहे. अंक १२ ते १४ या तीन लघुकथा ‘ धर्मसंस्थापन ’ या वर्गांत पडतात हें चटकन् लक्षांत येणें कठीण आहे. कारण या लघुकथा स्वामींनीं जे अद्भूत चमत्कार करून दाखविले त्यांची माहिती देतात. परंतु चमत्कार दाखविण्यांत स्वामींचा हेतू चार पैसे मिळविणाऱ्या जादुगारासारखा खात्रीने नव्हता. प्राकृतजनांची मनोभूमिका तयार करण्यासाठीं मोठ्या विभूतींना नेहमींच अशा चमत्कारांचा आश्रय करावा लागतो. अगदीं साध्या गोष्टी घ्या. आपल्या औषधांच्या उपयुक्ततेविषयीं श्रद्धा उत्पन्न करण्यापूर्वीं हकीमसाहेब पत्त्याचे नजरबंदीचे खेळ करून लोकांना आपल्याभोंवतीं जमवीत असतात हें सर्वांना ठाऊकच आहे. अशा चमत्कारांच्या दर्शनानें प्राकृतजनांची श्रद्धा व भक्तिभाव हे गुण बळावतात व अशी मनोभूमिका तयार झाल्यावर महान विभूतींना ‘ धर्मसंस्थापन, आत्मोन्नति ’ वगैरेचा प्रचार करणें सोपें जातें. प्रत्येक थोर पुरुषाच्या चमत्काराकडे मी याच दृष्टीनें बघत असतो व म्हणूनच या तीन लघुकथा मी ‘ धर्मसंस्थापन ’ या वर्गांत टाकतों.

आकाशांतील ध्रुवाचा तारा अढळ असतो. मानवजातींतील थोर विभूतींचें जीवन व त्यामुळें इतरजनांना मिळणारा प्रकाश तितकाच अढळ असतो. या प्रकाशांत इतरजनांनीं आपल्या जीवनाला योग्य वळण देऊन आत्मोन्नति साधणें अवश्य असतें. परंतु अशा वेळींच प्रश्न उपस्थित होतो कीं आत्मोन्नति म्हणजे काय व जीवनाला वळण द्यावें कसें ? पुष्कळ वेळां या कोड्याचा उलगडा न झाल्यामुळें

बरोंचशीं माणसें व्यक्तिपूजन ( Hero-worship ) या आत्मोन्नतीच्य पहिल्या पायरीवरच थांबतात.

" परोक्षप्रिया वै देवाः " या न्यायानें मोठ्या विभूति प्रत्यक्ष व सरळ असा संदेश क्वचितच सांगतात. गुढार्थांनेच पुष्कळ सत्यान्वेषणाची तयारी करून देण्याची त्यांना आवड असते. स्वामिमहाराजांच्या चरित्रांत जीवनविषयक तत्वज्ञान असेंच गूढार्थानं प्रतीत झालें आहे अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.

लेखकाने लिहिलेल्या अनेक लघुकथांपैकीं या महत्वाच्या भागावर प्रकाश पाडणाऱ्या दोनच लघुकथा आहेत. अनुक्रमे लघुकथा अंक ५–६. यांतील प्रसंग व स्वामिजींचा उपदेश अत्यंत मार्मिक आहे. या दोन्हीं लघुकथांमधून जीवनविषयक तत्वज्ञान ध्वन्यर्थानें भरलेलें आहे.

राधा नांवाच्या वेश्येनें इतर जनाना तर वश केलेंच होते परंतु स्वामि-महाराजांसारख्या थोर विभूतीला देखील वश करण्याची तिची महत्वाकांक्षा होती. परंतु महाराज तिला वश न होतां, त्यांनीं तिच्या मोहक इंद्रियांचा व शक्तीचा नाश करून तिलाच वश करून घेतलें. या गोष्टींतील गूढार्थ फारच उत्कृष्ट आहे. ही गोष्ट किती प्रमाणांत घडली हें आज जरी कळणें शक्य नसलें तरी त्यातील तत्वज्ञान अत्यंत सुंदर आणि सत्य आहे. सर्व जगाला उच्च ध्येयापासून परावृत्त करून सुखवादी बनविणारी प्रकृति ही एक वेश्याच आहे. पुरुषांच्या सर्व इंद्रियांना सुख देऊन अज्ञानाच्या अंधारात त्यांना झोंपवून ठेवणें हें तिचे आवडतें काम आहे. सामान्य माणसें तिला वश झालेलींच आहेत व एखादा ध्येयवादी तिच्या ताव्यांतून सुटत असला तर त्याला मिळ्या मारण्याची तिची महत्वाकांक्षा असते. अशा या वेश्येपासून स्वतःचा बचाव प्रत्येकानें करावा. स्वतःचा बचाव करण्यासाठीं स्वामि-महाराजांनीं वेश्येला मारून टाकली नाहीं तर तिच्यांतील हीन प्रवृत्तींना मारून टाकलें. प्रत्येक मनुष्यानें याचप्रमाणें आत्मोन्नति साधावयाची असल्यास नैसर्गिक

प्रवृत्तींना मारून टाकूं नये; त्यांतील वाईट भागाचा त्याग करून त्यांच्या आहारीं आपण न जातां आपण त्यांच्यावर ताबा मिळवावा.

याच तत्वज्ञानाची स्पष्ट कल्पना सहाव्या लघुकथेंत व्यक्त होते. सत्शिष्य वामनबुवा हे महाराजांचे आवडते शिष्य. हे आपल्या ध्येयाला जवळ करण्याच्या प्रयत्नांत असतानां त्यांना शारीरिक व्याधींनीं पछाडले व शेवटीं जिवाला कंटाळून आत्महत्येचे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले. अशा वेळीं महाराज म्हणतात "व्याधी... कसची आली... सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ, अशी स्थितप्रज्ञाची वृत्ति अंगीं बाणली पाहिजे" असा स्वामींचा उपदेश आहे. यानंतर देखील आत्महत्येचा प्रयत्न त्यांनीं केला असतां त्यांना परतवून आत्महत्येपासून परावृत्त केल्याची हकीगत या गोष्टींत आहे.

या जगांत, संसारांत राहणाऱ्या अनेक व्यक्तींना अनेक प्रकारचीं दुःखें, संकटें भोगावीं लागतात. अशा वेळीं ध्येयप्रेमी माणसाला पुष्कळदां असें वाटते कीं सर्व संसाराचा त्याग करून, उपाधीपासून मुक्त होऊन अरण्यांत जाऊन रहावें म्हणजे आत्मोन्नति सुकर होईल. परंतु असें करणें ही पण एक प्रकारची आत्महत्याच आहे. मनुष्याच्या आत्म्याचीं त्रिविध स्वरुपें आहेत. मनुष्याच्या आत्मिक उन्नतीच्या आत्म्या-शिवाय शरीरविषयक व समाजविषयक अशीं दोन आत्म्याचीं स्वरुपें आहेत. प्रत्येकास शरीरविषयक व समाजविषयक कर्तव्यें असतात. तीं कर्तव्यें करून – त्यांतच गुरफटून न राहतां–आत्मोन्नतीकडे लक्ष देणें यांतच जीवनविषयक खरें तत्वज्ञान सांठविलेलें आहे. आपलीं पहिलीं दोन कर्तव्यें चुकवून एकांडेपणनें तिसऱ्या कर्तव्याच्या मार्गे लागणारें लोक पहिल्या आत्म्याच्या दोन स्वरुपांची हत्यां करीत असतात. अशा प्रकारची कोणतीही हत्या स्वामिमहाराजांना मान्य नव्हती. आत्म-हत्येच्या पायावर उभारलेली आत्मोन्नति पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें, कागदी फुला-प्रमाणें मोहक असेल, पण खरी नव्हे. कोणतीही व्याधी, संकट, बंधन यांची हत्या न करितां त्यांच्यावर ताबा मिळवून आपली दृष्टी ध्येयावर निश्चल ठेऊन प्रत्येक

मनुष्यानें आत्मोन्नती करून घ्यावी, असा दिव्य संदेश या गोष्टीच्या द्वारें स्वामिमहाराज देऊं इच्छित नसतील कशावरून ?

सारांश, - स्वामिमहाराजांचें जीवनविषयक तत्वज्ञान एकांडेपणाचें नसून अत्यंत व्यापक, सर्वांना पचेल, रुचेल असें साधें, सोपें आणि सत्य होतें.

अशा महान विभूतीच्या जीवनचरित्रांतील महत्वाचे प्रसंग जनतेपुढें कलात्मक स्वरुपांत मांडून जी जनसेवा श्री. पट्टणकर यांनीं केली आहे ती अत्यंत प्रशंसनीय आहे. अशाच प्रकारची सुंदर ग्रंथरचना त्यांचें हातून होत राहो अशी इच्छा प्रदर्शित करून हा प्रस्ताव संपवितों.

बडोदें.
ता. २२-१२-३१.

**रामचंद्र रावजी नातू.**

सं. च. ४२८

# ‘ परित्राणाय साधूनाम् । ’

लघुकथा

१ ते ७.

कुबेर तुझा भांडारी — आम्हां फिरविसी दारोदारीं ।
यांत पुरुषार्थ मुरारे — काय तुजला पै आला ॥

—व्यंकटेशस्तोत्र.

एखादी अगदीच काड्यामोड्यांनी शाकारलेली कोटशी झोपडी असावी.
त्यातील थोड्याथोडक्याच का होईना — एका कोपऱ्यांत पडलेला तरटाचा
तुकडा — जरा बाजूवर ठेवलेलें घासतेलचें डबरें — एका कोपऱ्यांत घातलेली
चूल — त्या शेजारीस पडलेल्या काटक्या — एका कोपऱ्यांत नीटशी ठेवलेली
अगदीं साधीशीच अशी लहानशी पेटी — त्यावर पडलेलें लक्तर लोंबलेलें
हंथरूण — त्याच्या समोरच कोपऱ्यांत उतरंडीतून असलेला सारा संसार — वगैरे
सारख्या जिनसांनी मूर्तिमंत दारिद्र्याची कल्पना उभी करावी. माकडाच्या माकड-
चेष्टेमुळें सहज जरा अस्ताव्यस्त झालेल्या झाकरणींतून सूर्याच्या कोमल किरणांनी
आत येऊन घोंगडीवर स्वस्थपण झोंपलेल्या बाळांस चळवळायास लावावें.
चुलीशीं बसलेल्या साध्वीस डोळ्यांस चांगलें दिसावें म्हणून कपाळावर डावा हात
ठेवावयास लावावा. शेजारीसच मीठभाकरी खात बसलेल्याच्या साऱ्या अंगाचें
उष्णतेनें कारंजें झाले असावें. थोड्या वेळानें तो गोड छोकरा उठून केविलवाण्या
स्वरांत ‘ आई ’ ला हाक मारीत असतां बापानेंच खवाटे धरून उचलून मांडीवर
घ्यावें. अशा प्रसंगीं दरिद्र्याच्या तोंडून वरील उद्गार का निघणार नाहींत ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ............

रात्रीचा समय. नुकताच भुकेला कोंडा खाऊन निजावयास धोंड्याची अवश्यकता असणाऱ्यांचे आपल्या चरितार्थाबद्दलचे विचार चालत असावेत. सोसाट्याच्या वाऱ्यानें थंडीनें कुडकुडत त्या गोड छोकऱ्यास पोटाशीं कवटाळून दोघांनी अगदीं शेकोटीची ऊब येण्याचा प्रयत्न करावा पण....... ! ! चोहोंकडूनच हिवाळा ! ! अशा दरिद्रावस्थेंत तिन्ही त्रिकाळ सारखेंच ! सर्व बाजूंनी उन्हाळा असल्यावर डोळ्यांतून पावसाळा चालू असतांना परिस्थितीच्या डोंगराएवढ्या संकटांच्या हिवाळ्यानें कुडकुडत असावे... इलाज काय ? तो तिला ह्मणतो...

'काय प्रभू लज्जा रक्षण करील ती खरी ! '

' खरंच दररोज मिळणाऱ्या मजुरीवर आपलें पोट कसें भरावें ? एवढासा बाळ, पण दुधावाचून रहावे लागते त्याला.... अंगावर तरी दूध येणार कोठचें ? '

' ईश्वरालाच दया येईल तर आहे आता... नाहीं तर आपला सारा संसार निराशेच्या प्रळयांत... ! ! '

' असं बोलूं नये गडे... हें काय ?... मला नाहीं कां मजुरी मिळाव-याची ?... पण... धाकट्या बाळाला कोण संभाळील ? '

त्याला झोंप आलीशीं बघून जरासा हात लांब केला... हंथरुण घेतलें... जमिनीवर पसरलें. हलकेंच बाळाला निजविले... ' झोंपा न बाळाजवळ ' ह्मणून पतीस देखील तिनें विनविले. आकाशांत चंद्र सारें बघत होता. तारा हंसत होत्या. हंसा बायानो ! आतां तुम्हाला अमावास्येची रात्र आठवत नाहीं ! मानवी मनः-स्थिती अशी असती तर ?

*    *    *

किती सुंदर सुखस्वप्न ! पतिदेव पूर्णपणें विश्रांति घेत होते. बाळही किती शांतपणें झोंपला होता. तिच्या डोळ्यांपुढून गतकालचा चित्रपट सरसर सरकत होता. इतकें दारिद्र्य आपणाला केवळ दैवाच्या कशा विचित्र फटक्यामुळें प्राप्त झालें त्याचा विचार किती तरी त्रास देत होता. मातापितराचा वियोग असह्य झाल्यामुळें अज्ञान दशेंतच कोठें तरी गिरणीतील मोलमजुरीच त्या वेळीं मोलाची वाटल्यानें स्वकुटुंबपोषणार्थ पत्करावी लागली. त्यात देखील किती गोड स्वभावानें केलेलें काम ? नाहीं तर इतर गिरणीकामगारांचें नाना प्रकारचें रंगढंग किती तरी दिसतात. कोणी दारु पिणारा तर कोणी तिरसट स्वभावाचा, कोणी मवाळ तर कोणी जहाल, कोणी अशक्त तर कोणी धटिंगण, कोणी अंबटशोकी छानछबेले तर कोणी अगदीं साधे, कोणी निर्लज्जांचें अर्क तर कोणी शरमाळू असल्या गिरणीकामगारांच्या प्रांतातून आपला पति अगदीं साधेपणानें वागत असणारा व जीवितसागर तरुन जाणारांत बहुधा बराच पुढें सरसावलेला दिसत असे, पण आताच्या व तेव्हांच्या परिस्थितींत जमीन-अस्मानाचें अंतर. गरिबाभोंवतीच पोराबाळांचें लेंढार किती तरी असते तसें आमचे मागें जरी नसले तरी एकट्या छकुल्यासाठीं जवळ जवळ महिना...... ! ! परमेश्वरा, जगात तूं आहेस तरी का ? भक्ती हेंच जर परमेश्वरवशतेचें साधन असले तर तो आम्हांस कां वश होऊं नये ? ईशनामच जर भवसिंधुतारक असले तर पदोपदीं परमेशचिंतन करीत असलेल्यांस ईशकृपेचें वैभव कां लाभूं नये ? श्रद्धा मात्र अशा योगानें डळमळते आणि तसल्या प्रकारें अशा स्थितींत पूर्ण श्रद्धेनें वागणें खरोखरीच हटयोग्याला साधणें शक्य असते पण आमच्यासारख्यांस... पदोपदीं परिस्थितीचे फटके बसणारांस — ईश्वरांस रानवट फुलांचीं लाखोली वाहतांना श्रद्धायुक्त मन कसें रहावें ? पूजा... देवाची पूजा अश्रुजलसिंचनानें दररोज होत असतां ईश्वर स्वस्थपणें झोंपला असावा...... ! !

असा विचार करीत बिचारी तळमळत पडली होती. इतक्यांत ती निद्रावश झाली. किती निराश झालेलें होतें तें कुटुंब ? तिच्या चेहऱ्यावर किती तरी गांभीर्य

होतें. थोड्या वेळानें ती एकदम खाडकन् जागी झाली. बाळ उठला होता. अंथरुणावर किती गोडपणें खेळत होता. रम्य प्रहरांत प्रशांत अशा समयांत तिनें पतिदेवांस उठविलें आणि ती आपलें सुखस्वप्न त्यास निवेदन करूं लागली.

' कांहीं म्हणा. आज माझ्या अंगीं एकदम कसा उत्साह आला आहे हो ? किती गोड आशिर्वाद ? माझें स्वप्न खरं होईल कां ? '

' कसचं स्वप्न ? काय झालें ? तुझ्या मुद्रेत एकदम पालट कां झाला ? '

' सांगूं कां ? हसायचं नाहीं अं ! भोळ्या भावानें आपल्या परिस्थितीबद्दलचा विचार करीत असतां ईश्वरांस चार शब्द टाकून बोलले पण खरंच किती शांत मुद्रा त्या स्वामींची ? आमच्या यजमानीण बाईच्या येथें आहे ती अक्कलकोट स्वामींची भव्य तसबीर ! अगदीं तसलीच मूर्ति आपल्या झोंपडींत येऊन आपल्या जित्रा-भावाच्या पेटीवर विराजमान झाली. चोहोंकडे दृष्टी फेंकली. मूर्तिमान् दारिद्र्य प्रतिबिंबित झाल्यांवर दुसरें काय दिसावयाचें पण स्वामींना त्यांत धीरता व शांतता दिसली. मी वंदन केलें व माझ्या नेत्रांतून अश्रूधारा वाहूं लागल्या. स्वामी म्हणाले,—

' धीर सो गंभीर – उतावळा सो बावळा । '

पण मी म्हटलेः—

' मनुष्यानें धीर धरावयाचा तरी किती वेळ ? अशा वेळीं मन सुन्न होतें खरंच आतां नाहींच... आशा... अं... हं... ! ! '

' नाहीं म्हणजे क्या बात है ? माझ्याबरोबर चल तूं ? ' म्हणून आम्ही बरोबर स्मशानात गेलों. तेथें किती तरी विचित्र वाटलें. एकाकडे रक्षेचे ढिगार दुसरीकडे अस्थींचें ढिगारे. कावळ्यांची कांव कांव चालूंच... एक चिता पेटलेलीच

होती... काय भयंकर देखावा ? घुवडाचे घुत्कार – सर्पांचे फूत्कार – वगैरे सारखे ऐकूं येत होते. माझें मन किती तरी अस्वस्थ झाले होते. पण स्वामीबरोबर असल्या-वर चिंता कसची ? इतक्यांत स्वामी म्हणतात,—

‘ कां... हें सर्व काय दिसते आहे ? “ धन देखिये ’ ? ’

‘ अगदीं खरं ! ! आमच्या दृष्टीला ती प्रेताची राख दिसतें आहे ! ’

‘ क्या बाता करती है ? त्या बघ तिकडे पडलेल्या सोन्याच्या कांबा ? ’ ”

‘ पण हडकें दिसताहेत ती तर ! ’

‘ बरं... त्याच्यांतून तुला लागेल तितकें धन घेऊन जा... भिऊ नकोस... बावरूं नकोस... उचल... ? ’

मी भितभीतच पण दहापांच अस्थि उचलून पदरांत घेतल्या. स्वामी म्हणाले.

‘ बस्... अभी चलो ? ’

चला म्हणून आम्ही परत आलो. मी तें सर्व हंथरुणाजवळ ठेवलें. स्वामी अंतर्धान पावले...किती सुखस्वप्न आहे बरं... असं सत्य होईल कां ? ’

‘ काय सांगावें. नशिबाचा तारा फिरला कीं सर्व सुरळीत होतें ? ’

‘ खरंच अजून सर्व कसें डोळ्यापुढें चक दिसतें आहे. ’

इतक्यात पुन्हा लख्ख प्रकाश पडला. त्या प्रकाशांत तिच्या शेजारीं पडलेलें गाठोडें दिसले. प्रकाश गेला. अंधार... पुन्हा प्रकाश... पुन्हा अंधार... उदाचा व कापुराचा वास खूप सुटला... मालिन्यतेची मूर्तिमंत प्रतिमा अशी जी झोंपडी ती पवित्रतेचें वसतिस्थान बनली... पुन्हा प्रकाश...

'खरंच हे काय ? हें गांठोडें कसचें ? हें तर मी स्वप्नांत बांधलेलें ? '

'होय कां ? '


'मग सोडूं कां ? बघू या ' पुन्हा अंधार... तिनें गांठोडें सोडलें व सर्वच आनंदी आनंद पसरला. त्या सोन्याच्या कांबा होत्या. त्यांनी एकमेकांस प्रेमालिंगन दिलें. पुन्हा प्रकाश पडला. स्वामी अवतीर्ण झाले. उभयतांनी अभिवादन केलें. ती म्हणते...

'मग हेंच लवकर कां नाहीं प्राप्त झालें ? उगाच अंत पाहून देतां तें ? '

स्वामी हंसले... ते मोठ्यानें म्हणाले:—

'अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥'

अंतर्धान पावले.



# २

मानसिक स्वास्थ्य येण्यांस सभोंवारची परिस्थिती अनुकूल अशी असावी लागते. शारिरिक स्वास्थ्य जरी लाभलें तरी मानसिक विचार परिभ्रमणामुळें तीं चिरशांति लाभणें शक्य नसतें. एखादा उत्तमसा देखावा बघितला कीं मन प्रसन्न होतें व तात्पुरतें रममाण होतें पण जरा पुढें सरकावें कीं मनाची प्रसन्नता विरून पुन्हा विषण्णावस्था प्राप्त होते. विचारांची क्रान्ति मनोव्यापारांस कारणीभूत होतें पण मनाची एकाग्रता होऊन चिरसौख्यानंदी निमग्न व्हावयांस केवल सद्गुरुकृपाच अवश्यक असते. अशा वेळीं श्रीसमर्थांची ' सुबालार्कवत् दिव्य श्याम कांती ' बघून जीवांस समाधान व शांती मिळतें.

*　　　　*　　　　*

माझा जन्म एका खेडेगांवातला जरी असला तरी सारें बालपण शहराच्या ठिकाणीं गेल्यामुळें जग ही काय वस्तू आहे हें मी जाणत असे. शिवाय लहान पणापासूनच घरच्या वडील मंडळींच्या आकस्ताळ्या स्वभावामुळें नेहमीं टक्केटोणपे— वाच्यार्थी आणि लाक्षणेक अर्थीही — खाऊन झाल्यामुळें मी बराच अकाल प्रौढ झालों होतो. माझ्या बालपणींच मला वाटें आपण जीवाचें काहीं बरें वाईट करून घेतलें तर ? उगाच झुरून मरून जाण्यापेक्षां सुखासुखीं मरण लाभलें तर ?... असा विचार मी करीत असें पण मी असें जर काहीं केलें तर घरच्या मंडळींना किती तरी धक्का बसल आणि मग ती पश्चात्तापानें पुनीत होण्याचा संभव खरा ! मग मात्र कदाचित् साक्ष पटण्याचा संभव कीं आपल्याच त्रासामुळें मुलगा गमावून बसलें मात्र ! ! पुन्हा विचार करूं लागावें कीं वाटें जाऊं द्याव जें नशीबीं लिहिलें

असेल तें खरें ह्मणून स्वस्थपणें जीवित कंठू लागलों. पुढें मी चतुर्भुज झालो पण माझें नशीबच खडतर म्हणून माझ्या सुखाची भाग्यदेवता पुढें कांहीं वर्षांनी मला सोडून गेली. मग मात्र पूर्ण वैतागलो. सर्व संग परित्याग करून जीवाला सात्विक समाधान लाभेल असें कांहीं तरी सौख्य शोधूं लागलो पण मार्ग मात्र दिसेना. परमेश्वर ह्या प्रसंगांतून मला पार पाडील का म्हणून विचार करीत परमेश्वराला आळवीत स्वस्थपणें बसून राहिलों इतक्यात मला साधारण झोंपेंत साधारण जागेपणीं अशा अवस्थेंत एक दृश्य दिसलें.

किती शांत वेळ ती ! मी स्वस्थपणें "गुरुचरित्र" वाचीत बसलो होतो. 'इंदुकोटी तेजकीर्ण सिंधुभक्त वत्सलं' हें अष्टक मी ह्मणत मी ह्मणत होतो. अष्टक पूर्ण झालें. इतक्यांत किती छान वास सुटला. मला वाटतें तो अत्तराचा असावा. मी कापूर लाविला व आरती म्हटली व पुस्तक मिटून श्रीसमर्थ नामस्मरण करीत फिरूं लागलों. विचार मनांत चाललेच होते. संसारसागरावरच्या सुखापेक्षा दुःखाच्या लाटांनी मी पूर्णपणें अवगाहित झालों होतो. इतक्यात मला खालील शब्द ऐकूं आले......

"विचार कसला करतोस... लेका, मफत मरशील... वेडा कुठचा... चल डाकोरला... चलो अच्छा आना... सब छोड दो..."

मी विचारच करीत राहिलो. आजपावेतों गुरुचरित्राची पारायणे करीत असतांना मला कित्येक वेळीं दृष्टान्त झाले होते पण आजच्या इतकें आपलें पुण्य असेल अशी माझी कल्पना नव्हती. इतकी आपली पायरी चढली म्हणून एक प्रकारची धन्यता वाटली. थोड्या वेळानें जरा जीवाला स्वस्थता मिळाली व पडशी भरण्यास आरंभ केला. तो काळ रेल्वे – मोटरगाड्या – ट्रामगाड्या वगैरेचा नव्हता. त्या काळी प्रवास पायींच करावा लागत असल्यानें 'आम्ही नुसते ओझ्याचे बैल' ह्या म्हणीची सार्थकता होत असे. तेव्हां नित्योपयोगी वस्तूंचें छोटेसें प्रदर्शन पडशींत भरलें. 'गाशा गुंडाळावयाला' सोपें जावें म्हणून अगदीं कमींत कमी वस्तूंचा संच बरोबर ठेवला. अगदीं कफल्लक अशी अवस्था नसल्यामुळें आम्ही

खिशांत ‘ दोन पैसे ’ बाळगूनही होतो. अशा तयारीनिशीं आमची स्वारी यात्रेकरूंच्या मेळ्यांत दाखल झाली व आम्ही मार्ग आक्रमण करूं लागलों.

* * *

सायंकाळचा सुमार. महिकाठावर नुकतेंच आम्ही येऊन पोहोंचलों. एका झाडाखालीं पडशा ठेवून आम्ही नदीवर ‘ अपवित्रःपवित्रोवा ’ म्हणून वंदन करावयास निघालों. सबंध दिवसभर चालून झाल्यानें पाय अगदीं जमिनीवर टेकवेनात. भूकही इतकी सपाटून लागली होती कीं त्यामुळें गुंगी आल्यासारखें वाटून, पडून रहावेसें वाटत होतें. भूक लागली खरी पण स्वयंपाकाची सिद्धता करावयाची म्हणजे ‘ संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी करणें ’ अवश्य होतें. शिवाय आमच्यापैकीं दोघेजण आजारी होते. त्यांनाच अगोदर हंथरुण टाकून कसें तरी निजविलें. व नदिकाठावर निघालों. पाय दुखत होते — भूक म्हणते मी... अशा वेळीं निसर्ग दृष्य कितीही कमनीय असले तरी मनःस्थिती प्रमाणें दिसावयाचें. तरुवरांची प्रसरण पावलेली छाया झपाट्यानें परत येत होती जणुं तिला भूक लागली असावी. सूर्यनारायण देखाल पश्चिमदिग् सुंदरीकडे झपाट्यांत चालले होते जणुं ती गोड हातानें दुधाचा पेला पुढें ठेवणार होती! आकाशांत काहीं तारा लुकलुकत होत्या जणुं त्याही पण भुकेनें व्याकुळ झाल्यामुळें मंदपणें प्रकाशमान होत होत्या. आकाशांत पक्षिगण कलकलाट — चिवचिवाट करीत उडत चालला होता जणुं त्यांलाही पण भूकेनें त्रास दिला असावा. थोड्या वेळानें नदिकांठावरून शीतल मंद वारा वाहूं लागला. आमच्या प्रकृत्या बऱ्या नसल्यानें तो वारा आमच्या अंगास बोंचत होता. आम्ही लवकरच संध्यावन्दनादि आटोपून परतलों. तेथें त्या बिचाऱ्यास ताप जास्त चढल्यामुळें तळमळत पडले होते. मीही थकलो असल्यामुळें हंथरुणावर पाय पसरले. आमचें हंथरुण बरेंच मोठेसें असल्यामुळें पाय पसरून ताठ करतां येण्याजोगेंही होतें. वारा सोसाट्याचा सुरू झाला. अंधःकार पटलें सभोंवार जास्त जास्त लपेटलें गेल्यामुळें भीषणता जास्तच भासूं लागली. रातकिड्यांची किरकीर चांगली मोठ्यानें सुरूं झाली. ती वास्तवीकपणें मृदू संगीत वाटावयाला हवी पण ती देखील

कर्णकटु भासली. आमच्या मित्रांचे कण्हणें ऐकून आमची वृत्ति तर बावरल्यासारखी झाली. आम्ही ईश्वरास आळविण्यास सुरुवात केली. एकाने जवळच्या खेड्यांत जाऊन कांहीं सुकेला कोंडा तरी मिळतो का म्हणून पाहिलें पण कसचें ? भिक्षापती श्रीपती असतो म्हणतात पण आम्हांला मात्र 'भिक्षापात्र अवलंबणें जळो जिणे लाजिरवाणे' असा अनुभव आला. जनता म्हणजे एक अजबखाना आहे. निरनिराळ्या प्रकृतीचे — निरनिराळ्या वैशिष्ट्याचे लोक जगात किती तरी वावरतांना दिसतात. वरून दिसणारें सभ्य जगात किती तरी वावरतात ? एकीकडे मारे दानशूरत्वाच्या बाता मारावयाच्या आणि एक पैसा एखाद्या सत्शील ब्राह्मणानें तोंड वेंगाडून जरी मागितला तरी जीव कासावीस व्हावयाचा ? साधूजनांची निंदा टवाळी करावी आणि दुसरीकडे एखाद्या भोंदूनें अनेक डावपेंच करून यजमानास लुबाडावें ! कोण उदार वृत्ती ही ! ! तो बिचारा परत आला. अर्धा पाऊणशेर तांदुळानें आम्हा सर्वांचें काय समाधान होतें ? म्हणून त्या दोघांस थोडें थोडें खाऊं घातलें व आम्ही तळमळत पडलों. जगण्याकरतांच खावयाचें होतें पण तें देखील पुरेसें नव्हतें ! !

* * *

मध्यरात्रीचा सुमार. सर्वत्र मिट्ट काळोख पसरला होता. अमावास्येची रात्र ती ! त्या बिचाऱ्याचे कण्हणें — रातकिड्यांचा किर्रर्र शब्द — वटवाघुळांची फडफड — घुबडांचें घूत्कार — वनपशूंच्या भीषण आरोळ्या वगैरेमुळें निद्रावश होता आलें नाहीं तरी गुंगींतल्या गुंगींतच आम्ही होतों. मुखानें नामघोष चालला होता. 'ईशनाम संकीर्तनाचें महत्व[1]' आम्ही पूर्णपणें जाणत होतों. 'गुरु दत्तात्रय अव-

---

१ नाम घेता वाट चाली ... यज्ञ पाऊला पाऊली
नाम घेता करी धंदा ... तो नर समाधिस्त सदा
नाम घेता ग्रासोग्रासीं ... तो नर जेविला उपवासी
ऐसा नामासी जो ध्याय ... तुका वंदी त्याचे पाय.

मूर्ता... जनार्दन स्वामी एकनाथा' अगदीं एक एक शब्द अर्धस्फुट अशा गद्‌गदीत आवाजांत आम्ही म्हणत होतों.

इतक्यांत दूरवरून 'आळख' शब्द ऐकूं आला... उलट जीव जास्त घाबरूं लागला... खडावांचा आवाज तर जवळ जवळ ऐकूं येऊं लागला ह्यावरून ते स्वामी असावेत असा आम्ही तर्क केला. अपेक्षेप्रमाणें स्वामीराज जवळ येऊन उभे राहिले. किती शांत धीरोदात्त मुद्रा ती ! आम्ही अभिवादन केलें... श्रीगुरु-मूर्तींनी आम्हां दोघांवर वरद हस्त ठेवला व म्हणतात, —

'अरे उठा... भोजनाची वेळ झाली... पात्रं सिद्ध आहेत... मग उगीच उशीर कां ?'

मला जरा ती थट्टा वाटली. मी सहज वळून पाहिले तो काय ? महाराजांनीं आपल्या सिद्धिप्रभावानें खरोखरीच पात्र सिद्धता केली होती. पानांवर षड्रस अन्न वाढलेलें होतें. आम्ही उठलों... यथेच्छ जेवलों... महाराजांच्या कृपेमुळें आमच्या प्रकृतीला आराम वाटला... मनाला सात्विक आनंद प्राप्त झाला... मानसिक शान्तिसौख्य लाभलें... श्रीगुरुकृपा लाधली तर काय होणार नाहीं ? तेव्हां—

'सद्‌गुरु वाचुनी सापडेना सोय ।
धरावे ते पाय आधीं आधीं'

# ३.

अलिकडच्या युगांत ' धन्याला धत्तुरा आणि चोराला मलीदा ' फार छान रितीनें खावयाला मिळतो. अशा प्रसंगी बिचारा निरपराधी पार मारला जाऊन त्याच्या जीवावर इतर मंडळींचें उखळ चांगलेंच पांढरें होतें पण देव कैवारी — परमेश्वर पाठिराखा उभा राहिल्यावर मग काय ?

*　　　*　　　*

' पण मला का मारता उगीच ? काल मी नोकरीवर तरी होतो ? '

' नोकरीवर नव्हता म्हणून काय झालें ? तो तुझा बाप पळाला ना ? ' ह्या तुमच्या निष्काळजीपणामुळें... ! ! '

' पण त्याला मी काय करावें ? साहेब, त्याच्यें तेल वाग्यावर नका काढू ? '

' मग तो कसा पळाला ! कितीसें कमविलें ? '

' पण मला माहितच नाहीं मुळीं ! ! माझ्या पहाऱ्यांवर काल कोण होतें ? '

' जाव उसकूं ले के आव '

' का रे ? किती लांच दिली त्यानें ? आणि किती इसम पळाले ? '

' रात्रीं तुम्हीच हजरी घेतली होती नां ? '

' पण तूं तर म्हणतोस दुपारीं कैदी पळाला ? मग हजरीच्या वेळेला ? '

' आपण कचेरींत हजरी लावलीत साहेब ? '

' अरे चोरा, उलट मलाच दोष देतोस ! ! कांहीं नाहीं ! लगाव सालेकूं दोनो कोंबा ! '

'पण मी निरपराधी आहे !'

'बरं आतां मी पहातो ! ! चलाव... लगाव !!'

बाहेर सपाट मैदान पसरलें होतें. एका बाजूसच काय, ती मेंदीची घनदाट झाडी होती. ती सारखी कापलेलीही नव्हती व किती तरी धुरकटून गेली होती. समोर जराशी दूरवर स्मशानभूमी होती. चिता पेटलेल्याच होत्या. त्यामुळें आकाश धूमव्याप्त होतें. दुसऱ्या बाजूस कांहीं थडगी होती. वातावरण किती गंभीर होतें. झाडांना पानें नसल्यामुळें झाडें फांद्यासकट किती विचित्र दिसत होती. अशा वातावरणांत वरील संवादाचा ध्वनी किती तरी दूरवर ऐकूं जात असेल ? मेंदीच्या झाडी मागे दोघेजण कोणी तरी लपून बसल्यासारखें वाटले म्हणून जरा जवळ जाऊन पाहिलें तो तेथें ते होतेच. आम्हीही आमचें अस्तित्व त्यांस जाणूं दिलें नाहीं म्हणूनच खालील संवाद ऐकावयास मिळाला......

'अरे ! अरे ! काय उगीच मारतो आहे ?'

'केवळ आपल्यासाठींच त्या बिचाऱ्याला मार खावा लागत आहे ?'

'आतां आपण काय करणार ?'

'खरं सांगून टाकावें एकदा जाऊन !'

'आणि पुन्हा बंधमुक्त आपणांला कसें होतां येईल.'

'न कां होईना ! पण केवळ सत्याला जागलें तर ! माझ्याने नाहीं पहावत त्याला ! किती निर्दयपणें मारताहेत !!'

पुन्हा जराशी चुळबुळ झाली. आम्ही पुन्हा डोकावून पाहिलें. कैदी कोणाची तरी प्रार्थना करीत होता. आणि इकडे मार खाणारा जमादारही 'देवा... राम-राया... गुरुराया...कृपा कर आता' म्हणून सारखा ओरडत होता. इतक्यांत स्वामीसमर्थ तेथें एकदम प्रगट झाले. मारणाराचा हात वरच्यावरच राहिला. जमा-दारानें नमस्कार केला. दुसरा एकदम झीट येऊन खालीं पडला. ते दोघे कैदी आले. त्यांनीही महाराजास लोटांगण घातलें. तो अमलदार देखील हें सर्व पाहून स्तंभीतच झाला. महाराज त्यास म्हणतात—

‘ अरे जरा तर कांहीं धर्माची चाड धरा. निरपराधी मनुष्य तावडतोब ओळखूं येतो. कसले रे तुम्ही डिटेक्टिव्ह ! !... आंधळ्या, बघ हा अपराधी ! ! म्हणून महाराजांनीं त्या दुसऱ्या जमादाराच्या खिशांतून नोट काढून दाखविली ! ’

सर्वच आश्चर्यचकित झाले. पण महाराजांनीं त्या वेळीं सगळ्यांना अपराधा बद्दल क्षमा करून सोडून दिलें. अमलदारास महाराजांनीं बजाविलें... ‘ पुन्हा असें करूं नकोस... नाहीं तर गोते खाशील ! ! ’

* * *

# ४

‘ मी जाते बाहेर ’

‘ घरीं लवकर यायचं गडे... उशीर करूं नये बाहेरून यायला... अन निघून जाते अन् एवढ्या मोठ्या घरांत मला एकटीला भीती पण वाटते... ’

‘ बाहेरचे दार लावून घ अन कांहीं वाचीत बैस ’.

तारेच्या बोलण्याची कांहीं पर्वा न करतां गणपतराव निघून गेले. त्यांनीं झकपक पोषाख केलेला होता. हातांत हास्तदंती मुठीची काठी धरली होती. पायांत लाल पुणेरी जोडा घातला होता. एकंदरीत त्यांचा त्या वेळचा पोषाख दुसऱ्याचें मन आकर्षून घेणारा होता. त्यांच्या चेहऱ्याकडे कोणी बघितलं असतें तर त्याला चेहऱ्यावर निराशवृत्ति दिसून आली असती – डोळ्यांत असंतोषाची अधाशी चमक दिसली असती आणि त्यांच्या सपाट्याने चालण्यांत एक प्रकारची ‘ अ–धीरवृत्ती ’ ही दिसली असती.

गणपतराव गेले. तारा बाहेरच्या झोपाळ्यावर थोडा वेळ बसली. पण लवकरच संध्याकाळ झाल्यामुळें तिनें दिवेलागण केली. देव्हाऱ्यांतील स्वामिसमर्थांच्या तसबिरीला हळदीकुंकू वाहिलें... आपलें कुंकू सबळ ठेवण्याबद्दल स्वामिरायाला विनविलें... हृदयाची भाषा देवरायाला पटली. क्षणभरच पण तिला कुणी आधार देतयसें वाटलें. देवा–तुळशीला नमस्कार करून ती परत फिरली आणि नवऱ्याच्या म्हणण्याप्रमाणें बाहेरच दार लावून घेतलें व कसल तरी पुस्तक घेतलें आणि बसली... वाचण्याकडे तिचें लक्ष नव्हतेंसें दिसलें. कसल्या तरी विचारांत ती गर्क झाली होती.

' आज दोन तीन दिवस झालें मनमोकळेपणानें बोलणं होत नाहीं... काय असेल कुणास ठाऊक ? खाणं होत नाहीं... पिणें होत नाहीं... रात्रीं फार उशीरा घरीं येणें होतें...दोन घांस कंकास करून खाणं होतें... आणि ' मला त्रास देऊं नकोस ' ह्मणून झोंपायला जाणें होतें... माझ्यावरचं इतकें प्रेम कमी होण्याचं कारण काय असावें बर ?... मी काळीसावळी आहे ह्मणून कां ? माझ्या अंतःकरणांतील प्रेमभावनांची परिक्षा तिकडनें झाली नसेल कां ? परमेश्वरा, आमचा संसार सुखाचा होऊं नये अशी कां तुझी इच्छा आहे ? स्वामिमहाराजांच्या सेवेंत मी कधींही अंतर पडूं दिलें नसतां हा दुःखाचा डोंगर मजवर कां कोसळावा ?'

तिला विचार अतीच त्रास देऊ लागला असावा ? तिनें हातातलें पुस्तक टेबलावर आपटलें व जरासें पडून तरी बरें वाटेल ह्मणून ती इंथरुणावर पडली... दिवामिण मिण जळत होता... स्नेहाभावामुळें तो विझत आला होता. तिचा डोळा लागला जरासा.

* * *

गणपतराव धरून निघाले ते तडक ' माडीच ' चढले ! दोनचार दिवसापासून त्या ' माडीनें ' गणपतरावांचें मन आकर्षून घेतलें होते. पण ' सब पैसेके भाई ' ह्या न्यायानें ती त्याना फार महाग पडणार होती. त्यांनीं सवदा पटविण्याचा निश्चय केला होता आणि ह्मणूनच जय्यत तयारीनें ते तेथें गेले होते.

बोलूनचालून अभिसारिका ती ! तिचें ' गृह ' म्हणजे एखाद्या राजवाड्यांतील दिवाणखान्याला लाजविणारें असल्यास नवल तें काय ? ' त्या नवतीच्या बहरामधील बालिके ' नें लोकांस वेडें कां न करावें ? सौंदर्य आणि तारुण्य ह्यामुळें पुष्कळसे ' मधुकर ' तिच्या भोंवती घिरट्या घालीत होते... गणपतराव बसतात न बसतात तोंच तिनें प्रश्न केला...

' तुम्ही चंद्रहार आणलांत आज ? '

' अँ... पण त्याचेंच काय अडलंयू आज ? '

‘ मग केव्हां ? आज आणायचा नव्हता तर आलांत कशाला ? ’

‘ चंद्रहार काढून घेतला तर तिला समजेल म्हणून नाहीं आणला. ही आंगठी घे हवी तर — ’

‘ आंगठी नकोय मला... बायकोची एवढी भीती वाटते तुम्हाला तर आलांत कसे ? ’

‘ तशी... भीती... कसची ? तिला विचारतो कोण ? तुझ्या पुढें ती दासी शोभेल ! ती मनमोकळेपणानें बोलत नाहीं... तुम्ही बोलतां... ती हंसत नाहीं... तुम्ही हंसतां... तिच्या बोलण्यात माधुरी नाहीं... तुमच्यात आहे... तिच्या वागण्यांत काव्य नाहीं... तुमच्यांत आहे... तिच्या ठायीं जे गुण नाहींत ते सर्व तुमच्यांत आहेत आणि म्हणूनच मला तिच्यापेक्षां तुम्ही जास्त आवडतां— ’

‘ असें... पण मी वर्णनानें भुलेन असें समजूं नका हो... मुकाट्यानें चंद्रहार आणून द्या अन् मग या... ’

‘ आज आपण आंगठी घालूं मग उद्यां परवाकडे चंद्रहार — ’

असें म्हणून आंगठी घालण्याकरतां त्यांनीं तिचा हात हातांत घेतला. आंगठी बोटांत घातली. तो हात त्यांनीं हृदयाशीं नेला व तिला जवळ घेण्याचा प्रयत्न केला. तिनें एकदम बोटांतली आंगठी काढून फेंकून दिली व गणपतरावांस धक्का दिला. ते पडले. स्वर्गीय सुखाचा पेला त्यांच्या ओंठाशीं आला होता. त्याचें सेवन करण्याचा त्यांनी प्रयत्नही चालविला होता. इतक्यांत तो हातचा पडून खळकन् फुटला— त्यांचे हृदय फुटलें... मन विटलें. तिच्या धक्क्याबरोबर गृहिणीच्या मर्दुमकीची आठवण झाली... तिची समर्थभक्ति आठवली... स्वामीमहाराज सोटा घेऊन येतांना दिसले... जवळ आले... सोटा लगावलाही... ‘ निकल जाव इदरसे ’ असें शब्दही कानांत घुमूं लागले... ढकलून दिल्याचा भयंकर अपमान त्यांच्याकडे पाहून खदखदा हंसत होता. ते तेथून उठले व त्यांनीं तावडतोब घरचा रस्ता धरला.

* * *

तारा स्वस्थपणें झोंपली जरी होती तरी तिला स्वप्न पडत असावेसें दिसत होतें. गणपतरावाबद्दलचेंच तें स्वप्न होतें... ती स्वप्नांतच एकदम ओरडली...

'देवा... काय हें ? हिकडनं हा प्रकार करणं झालं ? संपला सारा संसार ! ! स्वामी समर्था, कशी बुद्धि सुचली ही ?'

पण इतक्यांत मांजरानें कायशीशी खडबड केल्यामुळें टेबलावरील पेपरवेट खालीं पडले... त्या आवाजासरशी ती जागी झाली. त्याच सुमारास दरवाजावर थाप ऐकूं आली. तिनें दार उघडलं... तिच्या डोळ्यांप्रमाणें त्याचेही डोळे ताठरले होते. गणपतराव घरीं आले... खोलींत शिरले... तारेनें दार लावलें... त्यांनीं एकदम बिछान्यावरच अंग टाकून दिलें. किती वेळ खोलींत शांतता होती. ती जरा वेळानें त्यांच्या जवळ गेली... अंगाला हात लावून पाहिला... त्यांना स्वस्थ झोंप लागली होती पण हात लागल्यामुळें जाग आली आणि त्यांनी अशी ताडकन् एक चपराक् लगावली कीं ती एकदम खालींच पडली... त्यांच्या तोंडून खालील वाक्यें निघून गेलीं...

'मला टकलून दिलेंस... मग आतां कशाला आलीस ?... 'रुबू पैसे के आई'... किती बेशरम आहेस तू ?... मायावी आहेस... चल चालती हो माझ्या घरांतून ?'

पती बडबड करावयास लागला म्हणून तारा उठली. त्यांच्याकडे एकदा शोधक मुद्रेनें बघितलें... त्यांच्या डोळ्यांवर सुस्ती कमालीची होती. अंगांत लखलख ताप भरला होता. पुन्हा अंगावरून भीतभीतच हात फिरविला व म्हणाली—

'काय होतयं... जरा हात पाय दाबून देऊं का ?... डोकें ही अंमळ दाबून देते... मला ओळखलं नाहीं आपण ? मला धक्का मारणं कां झालं ?'

'ओळखलं ! तारे, तुला कसा ओळखणार नाहीं ? त्या × × च्या नादीं लागून पार फसलों. तारा, तूं खरोखरीच जीवनतारा आहेस... साध्वी आहेस — पतिपरायण आहेस... आणि मी... किती किती वाईट आहे... वेश्येच्या नादीं

लागून तुझा आत्मपावित्र्यावर तिरस्कार केला... जीवन व्यर्थ घालविलें... तरि, आतां मला सुख मिळेल कां ?'

'स्वामी महाराजांच्या कृपेनें काय होणार नाहीं ?'

इतक्यांत टेबलावरचा दिवा विझला. त्यातील तेल संपलें होतें. बाहेरचा चंद्रप्रकाश खिडकींतून आंत येत होता. सर्व किती शांत व निरामय होतें... त्यांनीं तारेला पोटाशीं घट्ट धरलें. दोघेंही सारखीं आनंदाश्रु ढाळीत होतीं. इतक्यांत लखकन् प्रकाश पडला. श्रीस्वामीमहाराजांची मूर्ती दोघांना दिसूं लागली. त्यांनी उभयतांस आशिर्वाद दिला. दोघांनींही अश्रूंनीं समर्थांचे पाय धुतले... गणपतराव म्हणाले...

" तुज न जाणता झालों कष्टी ... आतां दृढ तुझे पायीं घातली मिठी
कृपाळू बा जगज्जेठी ... अपराध पोटीं घालीं माझे... "

स्वामीमहाराज हंसले व अंतर्धान पावले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्र. ............
शाखा

# ५.

वासना... स्त्री असो अगर पुरुष असो — वासना सर्वांना सारख्याच. एखादें दुसरें सुंदरसें पुष्प असावें... मोठें रमणीय दिसावें. ती रमणीयता क्षणभंगुर तर खरीच. पण हें सर्व माहीत असतां पुष्पाच्या मनांत आपण आपल्या सौंदर्याचा आस्वाद कुणास तरी द्यावा किंवा कुणीतरी आपणांस खुडून घेऊन आपलें सौंदर्य मनमुराद लुटावें असें वाटत असतें. त्याप्रमाणें स्त्री-पुरुषाच्या भावना असतात... वासना अंतरीं बळावतात... पण विवेकानें मन शांत झालें ह्मणजे आपोआप सर्व स्थिर स्थावर होते.

*　　　　*　　　　*

बोलून चालून नायकीण ती – तिची स्वरूपसुंदरता नैसर्गिक होती. वेश्या – व्यवसायांत ती फशी पडली गेली होती. अगोदर सुंदर, त्यांत नीटनेटकेपणानें व आकर्षकतेनें केलेलें वस्त्रपरिधान, मग काय ? तिचें सौंदर्य वृद्धाला तारुण्य प्राप्त करून देण्याइतकें मोहक होतें. तिचें ते साधेंच पण नीलवसन, वक्षस्थल उचलून दाखविण्याइतकी तंग कंचुकी — कमरेशीं खोवलेला स्वच्छसा रुमाल व किल्ल्या... डोळ्यांतील मोहक डोळेफेंक... हाताचा चाळा... केसाची ठेवण... पायात सपाटामुळें दिसून येणारी नाजूकता... एका नाजूक यष्टीवर मोहकतेची केवढी बाजारपेठ ही ! तिला काय वाटलें असेल कुणास ठाऊक पण ती अक्कलकोटांस स्वामींच्या दर्शनार्थ गेली होती.

*　　　　*　　　　*

प्रथमदर्शनींच तिच्या मनांत वासना उत्पन्न झाली. महाराजांची दिव्य कांती बघून — त्यांचें तपाचरण वगैरेचा मनांत कोणत्याही प्रकारचा विकल्प न येतां त्यांना आपलें सौंदर्यसुख द्यावे अशी उपभोगेच्छा तिच्या मनात उत्पन्न झाली. जरा वेळ स्वस्थ बसली. मुद्रा विचारग्रस्त झाली. पण इतक्यांत तिनें साजिंद्या जवळून सांथ तयार करविली व गाण्यांस सुरुवात केली. ती गातां गातां इतकी रंगली व स्वामीमहाराजांच्या स्वरुपवारुणीनें स्वतःला इतकी विसरली कीं तिनें त्या भरांत 'पिया बिन नाहीं आवत चेन' ही चीज हृदयांतील चीजवस्त उधळून म्हटली. चीज पूर्ण झाली. ती थांबली तरी साथ चालूच होती. ती उठली. महाराजांचें चरणीं मस्तक ठेविलें. महाराजांनीं तिला तेथे जवळच बसावयांस सांगितले. तिनें सांथ थांबवावयांस सांगितली. साथ थांबली. तरी पण तो मंजूळ स्वर कानीं घुमत होता... ' पिया बिन नाहीं आवत चेन. '

*　　　*　　　*

महाराज तिला म्हणतात—

' स्त्री–पुरुषामध्यें भेद काय ! पुरुषाचें इंद्रिय कापून टाकलें तर तुझ्यात व माझ्यांत भेद तो काय राहिला ! '

' महाराज, असें काय म्हणता ? आमच्या केवळ जीवनमात्रेंच आम्ही पुरुषांना आनंदित करूं शकतों — वाचेनं संतोषित करूं शकतों. स्पर्शानें रोमांचित करूं शकतों. महाराज, फार कशाला, पडलेला हा पदर असा वर करूं लागलों तरी पुरुषी मन आनंदानें बेहोष होऊन जातं. महाराज, ह्या पदराच्या पडद्या आडचा मायचा खेळ परब्रह्माला ही नाहीं कां वेड लावित — लोक आपल्याला परब्रह्म मानतात — मला आपली माया मानून घ्याल कां — महाराज, वासने – मी आजवर कुणाला लाजलें नाहीं पण आपलें हें रूपधन — राधेनें पदर सांवरला — पण–पण काय बरं पण... माझी वासना... पूर्ण होईल कां ?... खरंच पूर्ण व्हावीच... '

तबलजी तबल्यावर बोटे फिरवीत बसला होताच त्याच्या हातून अगदीं न कळत ' धिक् ताम् ' वाजलें. त्याच वेळीं स्वामी महाराज म्हणतात...

' दुर्दैवें बुद्धि नासे... केवळ टवाळखोरांच्या चिथावणीवरून तूं येथें आमची तपश्चर्या भंग करावयाला आलीस नाहीं का ? परिक्षा पहावयाची आहे ? '

' तसें नव्हें, महाराज. मला आपलं इतकेंच पाह्यचं होतं की आपणास गृहस्थाश्रमीं तरी कामिनीसंग झाली कीं नाहीं. '

इतक्यांत ती चमकून उठली -- उभी राहिली एकदम कंचुकी सैल झाली. पदर वाऱ्याच्या झोतानें दवला... तिचे स्तनयुग्म एकदम नाहीसे झाले ! ! भय कुल हरिणीप्रमाणें ती घाबरी होऊन आसरा शोधूं लागली. टवाळांना आतां अगदी गंभीर मुद्रा धारण केली होती. त्याच्यावरून तिनें दृष्टि खेंचून घेतली डोळे मिटून घतलें... पण आंत पेटून उठलेला पश्चाताप कोठून कसचा राहणार... हुंदक्यांच्या वाऱ्यानें कर्दळी कांपूं लागली. राधा वश्येच्या मनीं पूर्ण पश्चात्ताप झाला होता. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. पुढे झप घेऊन तिनें स्वामीचरणांवर मस्तक ठेविलें. तिच्यानें बोलवेच ना. पण तिची विचारसरणी काय असेल. तिला असेंच वाटलें असेल......

' काय जन्म आपला -- वेश्याव्यवसाय किती हीन स्वरूपाचा -- आपले शरीर व मन किती अपवित्र -- काय आपण -- इतकें सुसंस्कृत त्यावेळीं मन असतं तर परपुरुष व स्त्रीत्वाची जबाबदारी त्यावेळीं कळली नसती कां ? परिस्थिती कसची ? त्यावेळीं कोणीही माझ्याशी लग्न करण्यास तयार झाले असते ? शरीरानें व मनानें मी पवित्र असतें तर कोणीही मला पत्करले असत. नायकिणीची मुलगी म्हणून अपवाद राहिला असतां पण एकाच पुरुषाशीं एकनिष्ठेनें वागले असते तर माझा एक प्रकारें गौरवच झाला असतां. स्त्रीत्वाची जबाबदारी म्हणजे कमी श्रेष्ठ नव्हे... ' परपुरुषातें नयनीं पाहे... उपजताची वरडोळी होये ' अगदीं वाईट. आपण लोकांकडे पहावें... आणि लोकांनीं आपणांकडे सार्वजनिकतेच्या

दृष्टीनें बघावें हा किती अधर्म ! ह्यापेक्षां वृद्धकुमारी झाल्याचा जनापवाद असला तर चालेल पण हें निंद्यकर्म कधींही करणें नको. आपण समाजाशीं तितक्याच कटाक्षानें वागलों तर पातिव्रत्यभंगाची वेळ कधीही येणार नाहीं. पण आतां काय – पश्चात्तापानें पुनीत झालें तरी लोकांत तोंड दाखवावें कसें ? ह्या स्वरूपांत – ह्यापेक्षां आत्महत्या... '

महाराज म्हणतात...

' आत्महत्या..., छे... ह्यापेक्षां तीर्थाटणास जा म्हणजे तुझें मन अगदीं शुद्ध होईल आणि मग काशीक्षेत्रीं वास होईल... हीच आतां शिक्षा म्हण अगर कांहीं म्हण ! '

' महाराज, इथें श्वान होईन पण बाहेर हा अवतार नको. '

' जा... तीर्थाटणानेंच तूं पवित्र होशील '

# ६

'देवा गुरुराया, सोडीव मला आतां ह्या दुःखांतून '.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. दरवाजा लाविला होता. खोलींत मिट्ट काळोख होता. मी बिछान्यावर तळमळत पडलों होतो. खोलींत देवघर वजा एक मोठें कपाट असून त्यांत माझी उपास्य देवता — श्री अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ — यांची तसबीर होती. दुसऱ्या बाजूस एका पाटावर माझ्या लेखन व्यवसायाची पोथ्या, पुस्तकें लावून ठेवलीं होतीं. तिसऱ्या कोपऱ्यांत एक फडताळ असून त्यांत मी पैसाअडका ठेवीत असे आणि चवथी बाजू रिकामी असल्यानें हंथरूण त्या कोपऱ्यांत असे. मी एकटाच असल्यानें माझ्या मागें कोणत्याही प्रकारची ददात नव्हती आणि म्हणूनच माझा वाचनव्यवसाय अखंड चालून माझे विचार पूर्णपणें बदलले होते व मला ब्रह्मप्राप्तीचा नाद लागला होता. त्यामुळे व मला साधुसंतांचा सहवास झाल्याचें ऐकून आणि विशेषतः माझ्या वाक्सिद्धीची ख्याती परिचितांना पटल्यानें थोडे सांसारिक व बरेच मुमुक्षु माझ्या भजनीं लागले होते. ही महती मला नको होती. त्यांची सेवा घेण्यांत मला कसेंसेंच वाटे. मी म्हणे "तुम्ही मला इतका मान काय म्हणून देतां? 'भजा दत्तराया तराया भवाब्धि'. मी काय... त्यांचा दास आहे."

* * *

पण आज मी कोणत्या परिस्थितींत होतो... मोठा तत्वज्ञानी असो... ब्रह्मनिष्ठ असो... कोणीही असो रोग मागे लागला कीं त्याच्या असह्य वेदनामुळे सारें शहाणपण — तत्वज्ञान पार विसरून जातो. मोठ्या धीरगंभीरतेच्या गोष्टी सांगणारा... ब्रह्मपदप्राप्तीसाठीं योग वगैरे सारखें साधन सुचविणारा स्वतःच

रोगग्रस्त झाला म्हणजे बिचारा अगदीं गोगलगाय बनतो ! रोगाच्या असह्य वेदना सुरूं झाल्या कीं ब्रह्माण्ड आठवतें. मग कोणत्याही कृतींत गोडपणा वाटेनासा होतो. अणुअणुंत रमणीयता भरून वहात असली तरी अशा वेळीं तळमळ करीत पडून रहाण्याचें सौख्य नशिबीं येतें ! ! रोग रात्रीच्या वेळीं बळावतो आणि रात्र जाऊन उजाडेल केव्हां असें होऊन जातें.

आज माझी स्थिती अगदीं अशी होती. मूत्रकृच्छासारखा असाध्य रोग दिवसें-दिवस पाऊल पुढें टाकीत चालला होता. किती विचित्र रोग तो ! ! सूर्य नारायणाच्या साम्राज्यात मला त्याचा डर वाटत नसे पण रात्रीच्या राजवटींत माझा जीव मोठ्या धोक्यांत पडे. निशे, तुझ्या तेजस्वी नयनांच्या प्रशांत सांनिध्यांत मला ह्यापूर्वी झालेलें सुख – चिंतनाचा आनंद – नवचेतनाचा हर्ष ही सारीं आठवली व हल्लींचा केवळ तुझ्याचमुळें होणारा दुःखाचा कडेलोट पाहिला म्हणजे तूं ती पूर्वींचीच नीलांबरा, नक्षत्रसुंदरा, प्रशांत रमणीया निशा आहेस कीं दिक्-अंबरा, धूसरकराला, विकटहास्या अशी कुणी मूककुटिल निशाचरी आहेस. पूर्वी तूं मला मातेसमान सुख दिलेंस आज तूं अशी कां मला छळतेस ? असं तर नसेल ! सर्वच स्त्रीजात मी मातृस्थानीं मानली... पुत्रप्रेमाची उधळणी विश्वभर केली म्हणून तूं माझ्यावर रागावली आहेस कां ? सृष्टीच्या एका प्रबलतम सुखाला – स्त्री सुखाला – मी लाथाडलें म्हणून वेडेपणानें रुष्ट होऊन माझा असा छळ करतेस ? आई, माझ्या एवढ्या अपराधाची क्षमा तूं नाहीं करणार तर कोण ? मी तरी काय करूं ? तुझ्या दुधाचा... पहांटरात्रीच्या विचारांचा – असा परिणाम झाला त्याचं तुला कां वाईट वाटावं ?... माझ्या विवळत्या विनवणीला मायेचा एक हुंकारही रात्रीनें दिला नाहीं.

सर्वत्र शांत होतें... स्मशानांसारखें भयानक शांत होतें ... जिवाचें धन स्वहस्तानें फेंकून देतां यावें इतकी स्तब्धता होती. मीच काय तो एकटा ! ! माझ्या हंथरुणावर ह्या कुशीवरून त्या कुशीवर... घटकेंत पाळथा... घटकेंत उताणा... घटकेंत पाय पोटाशीं घेऊन... घटकेंत हातांवर डोकें ठेऊन अशा परिस्थितींत मी

तडफडत होतों. रातकिड्यांचा किर्रर्र शब्द माझ्या कण्हण्याशीं साथ करीत होता आणि उंदिरमामांच्या खडबडीनें जणुं ताल धरला होता. इतक्यांत कळ आली म्हणून मी उताणा झालों. माझ्या तोंडून ' अयाई ' हे शब्द किती केविलवाण्या स्वरांत निघाले. मी पोटावरून हात फिरविला. मला जरा बरें वाटल्यासारखें वाटलें. पण कसचें ? जसें वाटलें तसें नव्हतेंच मुळीं. पुन्हां जी कळ आली ती इतकी त्रासदायक वाटली कीं माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. माझा हुंदका मलाच आवरेना. मी रडतच म्हटलें ' गुरुमहाराज, अजून नाहीं का माझी करुणा येत ? '

थोड्या वेळानें मला जरा बरें वाटूं लागलें. मी त्या कुशीवरचा ह्या कुशीवर झालों. थोडा वेळ झोंप म्हणा अगर गुंगी म्हणा लागली. त्यावेळीं खालील प्रमाणें माझ्या मनाचें परिभ्रमण सुरू झालें.

किती अफाट विस्तार सागराचा ! लाटांवर लाटा उसळत होत्या. समुद्रतीरावर सांडलेल्या शिंपल्या मोत्यांसारख्या चमकत होत्या. लाटांवर तरंगत असलेलें होडकें घटकेंत पुढें घटकेंत मागें असें करतां करतां दूरवर गेलें होतें. एका बाजूस असलेल्या शिवालयांतून श्रींची पूजा होत होती. दुसऱ्या बाजूस आगबोटीचा धक्का असल्यानें त्यावर माणसाची वर्दळ चालू होती. शिवालयांत मी कांहीं वेळ जाऊन बसलों. तिथं एक मुनिवर्य ध्यानस्थ बसलेले होते. मी ' देवाचिये द्वारीं ' जाऊन क्षणभर उभा राहिलों. तों मला खालील शब्द ऐकूं आले...

' व्याधी... कसची आली आहे व्याधी... क्या बात है... अरे साधुत्वाची परांकोटी मिळवावयाची आहे ना ! 'सुख दुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ'

इतक्यांत धक्याला आगबोट लागली. बंदरावरची गजघंटा झाली. आज बोटीची कर्कश शीट ऐकूनच कीं काय मी पुन्हा जागा झालों — पुन्हा तळमळूं लागलों — साधुत्वाची परांकोटी ही रोगाची धोंड डोक्यावर घेऊन कशी गांठू ?

* * *

चार दिवसाची कड कशीबशी गांठली. आधी असो व्याधी असो... कांहीं असो... ईशसेवेंत व्यत्यय म्हणून येणें कधींच शक्य नव्हतें. सकाळीं देवपूजा यथासांग आटोपून मी हंथरुणावर बसून माझ्या लेखनाचीं पानें चाळूं लागलों स्वतःचेंच लेखन तें ! कुणाला आवडलं नाहीं असं झालं आहे ? पूर्व जन्मीच्या पापपुण्याची फलप्राप्ति ह्या जन्मीं कशी मिळतें ह्या बद्दलचें तें माझें विवेचन मी नजरें खालून घातलें. पूर्वजन्मीचीं पापें ह्या जन्मीं व्याधि, संकट, अपघात इत्यादि रुपानें पीडा देतात एव्हढेंच, सारख्याच परिस्थितींतल्या दोन व्यक्तींपैकीं एक सुखी तर दुसरा दुःखी असा विरोध जगांत दिसण्याचें कारण नाहीं इत्यादि तें विवेचन होतें. या न्यायानें माझें प्राक्तन मला भोगणें अवश्यच होतें ही गोष्ट खरी पण सद्गुरूच्या एकनिष्ठ सेवकास इतका त्रास कां असावा हा प्रश्न देखील सुचल्या-वाचून राहिला नाहीं. पण तो मला उलगडला मात्र नाहीं. तथापि सद्गुरुनिष्ठेवर, तिच्या सामर्थ्यावर माझा अढळ विश्वास होता. त्याचा अनुभव मला अनेकदां आला होता म्हणून कांहीं झालें तरी ईशनामच तारक असा मी माझ्या विवेचनाचा समारोप केला होता. अशा प्रकारें पानें चाळींत विचारचर्वण करण्यांत बराच वेळ गेला. बसण्याचा कंटाळा आला. पायास रग लागली म्हणून ते सर्व कागद तसेंच ठेऊन हंथरुणावर जरासा कलंडलों तोंच कळ आली. मला आतां ती सोसवेना. कांहीं सुचेनासें झालें.

इतक्यांत माझ्या शिष्यवृंदापैकीं एक गृहस्थ आले. पडलेली सारी कागद पुस्तकें आवरून ठेवलीं व माझ्या जवळ येऊन बसले व मला म्हणतात ...

'महाराज, आपल्या उद्योगप्रियतेची मला कल्पना नव्हती. आजारी असतांना देखील आपण विश्रांति घेऊं नये ?

मी उत्तरच दिलें नाहीं. थोड्या वेळानें त्या गृहस्थानें शेगडीवर दूध तापवून मला दिलें. अजून पावेतों सारख्या कळा चालल्या होत्या. गृहस्थाश्रमाचें जीवन असें असतें कीं उपाधिरहित असा क्वचितच सापडावयाचा. त्याप्रमाणें ते गृहस्थ व नंतर आलेली कांहीं मंडळी आपापल्या घरीं गेली. घरात वृद्ध मातोश्री व

नुकेंच आलेले बधु होते. मी हंथरुणावरून उठू शकत नव्हतों. वेदना अगदीं असह्य झाल्या म्हणजे एक तर हा पार कीं तो पार गाठावा असें होऊन जातें. कसें तरी शांतिसौख्य मिळवावें, दुखाडावे, असा मनाचा निर्धार होता. जगांत आतां माझें कांहींच उरलें नव्हतें. तत्वतः सर्वसंग परित्याग करून माझ जीवित मी स्वामिचरणीं अर्पण केलें होतें. यथाशक्ती स्वामींची सेवा केली होती—मातेच्या सेवेंत तत्पर राहिलों होतों — आत्म्याची उन्नति शक्य तितकी करून घेतली होती — त्या उन्नतीचा मार्ग इतरांनाही दाखविला होता. — अमूक एक करावयाला विसरलों किंवा करावयाचं बाकीं राहिलं असें असमाधान मला मुळींच वाटत नव्हतें. मग देहाच्या ह्याच कांटेरी पिंजऱ्यांत कां तडफडत बसूं? आत्मारामाला असा भिडकत ठेवण्यांत कोणता लाभ आहे? ‘ वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति ’ ह्या गीतावचनांत जीर्ण शरीर टाकण्याचा व नवें घेण्याचा अधिकार भगवंतानी कुणाला दिला आहे? कोण गृण्हाति? नरो गृण्हाति!! माणसालाच दिला आहे!! माझें शरीर जीर्णच काय पण शीर्ण...विदीर्ण...छिन्नविछिन्न...झालें होते. जगण्याचा हक्क माणसाला आहे अन् मरण्याचा नाहीं? मरण्याकरतां आम्ही दुसऱ्याच्या हिडिस तोंडाकडे बघावयाचें? आत्महत्या पातक आहे? आहे, पण देहाचा त्याग म्हणजे आत्म्याची हत्या नव्हे...माझ्या आत्म्याला मी सुंदर रितीनें जगविला होता व त्याहून अधिक सत्यं... शिवं... सुंदरं...—असा जगविण्याची माझी महत्वाकांक्षा होती. मग देहपातन ही आत्महत्या कशी? माझी महत्त्वाकांक्षा साध्य होण्याला देहाचें रांगट साधन थिटें पडत होतें... दुसरें दुरस्त साधन घ्यायला काय हरकत आहे? कायद्यानें हा गुन्हा आहे — असेल — सांसारिक जीवनाला हे कायद्याचें आळें लागतें — मला पारमार्थिकाला त्याचें काय? माझा कायदा म्हणजे आत्मोन्नति... वेदांतप्रणीत तत्त्वज्ञान...तेवढा कायदा एक मी ओळखतां... आत्महत्येचा विचार नामर्दपणाचा वाटत असला तरी एकदम दुःखमुक्त करणारा म्हणून मनाला आनंद व अचळ बळ देणारा आहे. दुःखाच्या वेदना वाढत चालल्यामुळें तोच विचार कायम करावासा वाटला!! ठरला!! पक्का केला!!

मातोश्रींना दुःख होईल — मंडळी म्हणतील ' ब्रह्मनिष्ठानें निव्वळ म्याडपणानें जीव दिला,... म्हणूं देत... आईचें दुःख आणि हें तोंडसुख दोन्ही कमकुवत, कोत्या बुद्धीची धुळवड आहे... ज्ञानस्वरूप गुढीचा पाडवा पुढेंच आहे.

* * *

रात्री बरोबर वेदना व वेदनाबरोबर माझा ' इसपार 'चा निश्चय यांची वाढती शर्यत लागली. रात्र मध्याप्रावर आली. वेदनांचें अमहीं माझ्यामधें खोल खोल रूतूं लागलें — माझ्या निश्चयाच्या कळ्याच्या अग्रावर मी येऊन पोंचलों निश्चयाच्या तीव्रतेपुढें वेदनाचे शल्य बोंथटलें. विश्रांत थाटलेली शांतता माझा अंमली निश्चय अंमलांत आणण्यास मला स्पष्टपणें सुचवूं लागली. त्या प्रोत्साहित उन्मादाच्या भरांत मी काय केलें, असें तुम्हांला वाटते ? तुम्हांला कल्पनाही करवणार नाहीं ! एरवीं उठून बसण्याचें सामर्थ्य नसणारा आता दोन दरवाजे सताड उघडून, फर्लांगभर चालत जाऊन, एका जलसंचयाच्या कांठीं जाऊन, मी उभा ठाकलों — करवते ही कल्पना ? — सोसायचीही नाहीं कदाचित् ! जलांत पडलेलें तारांचें प्रतिबिंब मृत्यूच्या दाढेंसारखें होते. जललहरी धांवत पळत माझ्याचकडे येत होत्या जणूं जीभ काढून मरण मला चाटूं पहात होतें. मला नकळत माझ्या डोळ्यांतून दोनचार अश्रू त्या जिभेवर मी टाकले. तेवढे घेऊन लहरी परत फिरल्या. अश्रू ? अश्रू आसक्तीचे नव्हते — तिलांजलीचे होते — कष्टी जीवनांवर मी हें पाणीच सोडलें — अश्रूंच्या उबेनें माझ्या महिरलेल्या वृत्ती किंचित् जाग्या झाल्या. भेसूर प्रत्यक्ष अश्रूंच्या जाळींतून मला अधिक भेसूर दिसूं लागलें. बरोबरच आहे. कांट्यानेंच कांटा निघतो. माझ्या भयंकर दुखण्यांला हाच भेसूर उतार हवा होता. स्वामीचरणांचें एकवार स्मरण केलें. माझे चरण मी नेटकें केले. नीट आंत आंता उडी घे —.


' घे ही मुस्कटांत —– आमच्यावर दंद करतोस — ही मोक्षप्राप्तीची तयारी काय ? अरे " भोगादेव क्षयः " असें तुझें कर्म, तें आम्ही मिटविलें तर मोक्षाकरतां तुला आणखी १०–१५ जन्म घ्यावे लागतील '.

अशी ओळखीची वाणी ऐकूं आली. परिचित स्पर्श होऊन दंडाला पकड बसली. मी माझ्या हंथरुणावर येऊन बसलों. गालांत बसलेली चपराक मला २–३ दिवस जाणवली. एकच गाल लालबुंद व दोन्ही दरवाजे उघडे पाहून दुसऱ्या दिवशीं जो तो मजकडे जास्त चौकसपणें पाहूं लागला. सकाळची नित्यपूजा करतांना समर्थमूर्तीवर मला घर्मबिंदू दिसले. माझ्या हृदयांत कालवाकालव झाली. तशीच मूर्ती मस्तकीं धरून मी मनमुराद अश्रूपात केला – हृदय हलकें झालें. दुःख हलकें झालें. "भोगादेव क्षयः" हें पटलें – अगतिकाच्या नैराश्यानें मला बळ देऊन दुःखाचें बळ कमी केलें. माझा लेखन-व्यवसाय मी चालूं ठेवला. स्वामीरायांच्या लीला वर्णन करीत उर्वरित आयुष्य व्याधीसमवेत पण समाधानानें घालविलें. उशीरां कां होईना पण स्वामीमहाराजांनीं प्रथमदर्शनालाच मला दिलेला आशीर्वाद खरा ठरला तो आशीर्वाद––

'ब्रह्मनिष्ठ होशील बाळा । न भिणें कधीं कळिकाळा' *

---

* श्रीगुरुलीलामृत. अ. ४८ ओवी. १८०



कै. वा. ब्रह्मनिष्ठ वामनबुवा रावजी
**वैद्य बामोरीकर**
( श्रीस्वामीमहाराजांचे पट्टशिष्य )

श्रीमहत्तावतारी
**अक्कलकोटनिवासी**
**श्रीस्वामीसमर्थ**

# ७.

पहाटे चार वाजण्याच्या सुमार. ' ब्राम्हे मुहूर्तेचोत्थाय चिंतयेत् हितमात्मनः ' ह्या तत्वानुसार आमची वागणूक असल्यानें सवयीनें वेळेवर जाग न आल्यास आश्चर्य ते कोणतें ? पहाटेच्या प्रशांत प्रहरीं झोंप सुरेखशी झाल्यामुळें अंगांत एक प्रकारचा उल्हास वाटत होता. तरट गुंढाळून ठेवलें. शाल खुंटाळ्यावर ठेवली व बाहेर अंगणांत आलों. मंद मंद मेघ वर्षत होते. थंडगार असा वारा सुटला होता. माझी प्रकृती तितकी नाजूक नसल्यानें तो वारा मला झाबत तर नव्हताच पण उलट जास्त उत्साह देत होत हाता. मला वाटलें त्यावेळीं शंभर जोर जास्त काढले तर ? आवडली कल्पना ! ! मी लगेच ती अमलांत आणण्याचें ठरविलें. पण प्रथमतः ' सहस्र विहाय स्नानमाचरेत् ' प्रमाणें स्नानसंध्या उरकून घेतली. जोरा-ऐवजी सूर्यनमस्कारासच सुरुवात करावी म्हणून सर्व यथासांग आटोपून सूर्य-नमस्कार घातले. किती सुरेख वाटलें त्या दिवशीं ! १२०० वर नमस्कार ! ! पुढें... हितम् चिंतयेत्... पण कोणत्या हिताचा मी विचार करूं ? आमचे वडील पुराणमतवादी असल्यानें मला त्यांनी ' न वदेत् यावनीं भाषाम् ' ह्या कलमा-न्वयें शिक्षणबंदीची शिक्षा ठोठावली होती व मला संथा देण्यापूर्वीच आपला ग्रंथ आटोपला होता. घरांत मी, आई व दारिद्र्य ह्या खेरीज कोणी नव्हते... कां SS हीं नव्हते !

कोठें जग ? कोठें मी ? मी जगांत पोरका नाहीं तर काय ? आज वडील असते तर वेदाक्षरें जरी शिकलों असतों तरी बरें होतें... पण... ! ! आतां

काय ? येथें श्री स्वामिसमर्थांच्या सेवेंत काळ कंठावयाला कांहीं हरकत नव्हती म्हणा ! पण आज येथें जमतें आहे आपलें. पण उद्यांच आपला साधा... सरळ सुस्वभाव लोकांना उपहासास्पद वाटूं लागला तर ? लोक ऐतखाऊ म्हणूं लागले तर ? माझ्यासारख्या स्वाभिमान्यास तें पटेल कां ? स्वामींची कृपा आपणांवर आहे खरी पण लोक माझा द्वेष करूं लागले तर ? काय करणार ? अकल नाहीं म्हणून लोकांनी माझा धिक्कार केला तर ?

असा विचार करीत मी इकडे तिकडे येरझाऱ्या घालीत होतों. आईनें दूध आणून ठेवलें होतें. माझ्या लक्षांतही तें आलें नाहीं. पांच मिनिटें... दहा मिनिटे झालीं... दूध निवून गेलें तरी माझी समाधी भंगली नाहीं. इतक्यांत आई बाहेर आली व म्हणते...

' हे रे काय ? दूध अजून घेतलेंच नाहींस कां ? कसला विचार करतोस आहेस कुणास कळे ? किती विचार... विचार... विचार... करावयाचा ? अति विचार कांहीं चांगला नाहीं... '

मी दूध घेतलें. अंगावर शाल घेतली. हातांत पळीपंचपात्री घेतली व स्वामी समर्थांच्या दर्शनास निघालों... कांहीं तरी विसरल्यासारखें वाटलें खरें ! पण कांहीं लक्षांत येईना. थोड्या वेळानें गंध लावण्याचें विसरलों म्हणून लक्षांत आलें. मी आधवें गंध लावलें व ' ऊर्ध्वमूलमधः शाख ' म्हणत बाहेर पडलों.

* * *

' हा मोठा पंडित होणार आहे बरं कां ? '

स्वामिसमर्थ मला पाहिल्याबरोबर बोलले. मी जवळ जाऊन बसलों. महाराजांची सेवा करूं लागलों. मनांत विचार सकाळचेंच चालले असल्यानें कांही कांहीं अगदीं विसरल्यासारखें होई. चांगली पादपूजा करून पाय पुसून स्वच्छ

करून त्यांवर गंधाक्षता पुष्पें अर्पोत्रयांची सोडून देऊन पुन्हां भस्म कोठें आहे म्हणून एका सेवेकऱ्यांस विचारलें. माझी चूक माझ्या लक्षांत आली. मी चित्त भावें नीट पूजा केली व जरासा बाजूस सरकलों. महाराज म्हणतात—

'आज मन अस्थिर आहे ? काय झालें आहे रे ?'

'कांहीं नाहीं महाराज. ध्येयाकरतां धडपडणें आपलें कर्तव्य आहे इतकेंच'

'मग जा न काशीक्षेत्रीं – वेदविद्या पारंगत होऊन ये'.

'माझ्यासारख्यानें ती आशा करणें व्यर्थ... असें वाडस अंगीकारण्यांत काय अर्थ आहे ?'

'उं... त्यांत काय मोठेसें ? तूं जा... आम्हीं आहोंतच ना !'

'महाराज, बाहेर नका कुठें पाठवूं बुवा ! तिथें बडी मंडळीं असणार ? आमचा दुसऱ्यांचा कोण भाव पुसतो ? ही बडी मंडळी जिथें तिथें नेहमीं मागें खेंचण्याचा प्रयत्न करतात... तिरस्कार दर्शवितात... त्यापेक्षां नको तो अभ्यास असें होऊन जातें... बरी आहे आपली चरणसेवाच !'

'काय रे टकळी लावली आहेस ? जा सांगितलें जावं ?'

'पण महाराज नको तो शास्त्राभ्यास... बरी आहे आपली मीठ-भाकरी. तुपपोळीच्या मागें लागण्यांत काय अर्थ आहे ? महाराज, तसं पाहिलं तर मला कांहीं कमी नाहीं... आपल्यामुळें मला कशाची उणीव नाहीं'

'नाहीं म्हणजे... तुला गेलेंच पाहिजे... पाहूं तर खरें कोण कशी टवाळी करतो ती ?'

'बरं आपल्या आज्ञेला मी ना कसा म्हणूं ? पण महाराज तें जाणें अन् तो अभ्यास मला संकटाप्रमाणें वाटतें सारें !'.

'कसंच आलं आहे संकट. 'धैर्यं यस्य पिता'... अपजय येणेंच शक्य नाहीं'.

* * *

आज्ञेप्रमाणें येथें आलों तर खरा. किती दूरवर ? वरी काय वाटत असेल मंडळींना ! माझी मनःस्थिती किती विचित्र झाली आहे... कधींच सोडलें नव्हते नातेवाईकांना — ! आतां कसेंसेच वाटतें. येथील दिनचर्याच मी अशी आंखून ठेवला आहे कीं सारा दिवस स्वव्यवसायीं दंग राहिल्यामुळें, झालेल्या श्रमामुळें रात्रौ शांत गाढ निद्रा लागतेच लागते... पहाटेस ' सर्व मंगल मांगल्ये ' वगैरे आटोपून जी अध्ययनांस सुरवात करावी ती सरासरी भोजन — वेळे पावेतों. अध्ययन — अध्यापनानें गावांत तितकें वजन तर बसलेंच बसलें. सायंकाळीं थकवा आल्यासारखें वाटलें कीं गंगातीरावर लाटांची लीला बघत संध्यावंदनादि आटोपावें. सभोंवरची रमणीयता बघून मन प्रसन्न व्हावें. वृक्षादिकांची छाया पाण्यांवर पडलेली बघून ' जीवित ही निव्वळ छाया ' तर खरींच, पण गंगाजल-संनिकर्षांत ती छायाही मनोवेधक व आल्हादक ठरते असें वाटूं लागावें. समोर दिसणारा अश्मसमूह पाहिला कीं मी ही एका कालीं जगांत पथ्थर म्हणूनच ओळखला जात होतों त्यांची आठवण व्हावी व दगडाचा देव करणाऱ्या देवाधिदेवाबद्दल— माझ्या स्वामिसमर्थाबद्दल — भक्तीनें हृदय उचंबळून यावें. अशा प्रकारें गंगातीरा माझ्या मनाला शांती मिळे. दुपारीं पाठशाळेतील गुरूजींचे बोलणें... छद्मी टीका... खरोखरीच सहन होत नस आणि मग मनीं पूर्ण खिन्नता बाणे.

एक वेळीं मी कांहीं पृच्छा योजून गुरूजींकडे गेलों होतों. गुरूजी मारे लोडाशी टेकून शालजोडी गुरफटून बसले होते. मी गेल्याबरोबर मला म्हणतात——

' कां महाशय ? कुत्राऽगन्तव्यम् ? अरे आतां सकाळींसच... थंडी काय पडली आहे ?

' कांहीं पृच्छा योजून आलों आहे '

' मूर्खस्य: किं शास्त्रकथा प्रसंगः ' बरं... बोला तर खरं काय आणलं आहे तें ? '

मी माझ्या शंका सांगितल्या. गुरूजी जरा चकीत तर झालेच. त्यांनी तोंड आंबटसें केलें व आंतल्या बटूंस हांक मारून म्हणतात—

' अरे, मार्तंडभट्टाकडे कांहीं ग्रामण्यासंबंधी सभा आहे ना! मला ठेका आठवण नाहीं केलीस? सर्व मंडळीं माझ्याकरतां खोळंबली असतील. ती माझी काश्मिरी बंडी आण... आधी थोडें चुळीला पाणी आण... '

' मी जाणलें. उगीच बोलूं कशाला? अगोदरपासूनच मी जाणतच होतों कीं गुरुजी ज्ञानाच्या मारे बाता मारताहेत बाकीं आहे नुसता खळखळाट!!

' मग आपण केव्हां फुरसद घ्याल माझ्यासाठीं? ' नम्रतापूर्वक मी प्रश्न केला.

' हें असें पहा... आज मंगळवार... उद्यां षष्ठीच तेव्हां नाहींच. परवा अनध्याय... आणि तेरवां... पण आहे काय त्यांत मोठेसें? अगदीं साधारण आहेत शंका त्या... तेवढें कळूं नये म्हणजे लांछन आहे '.

' गुरुजी आपणाला फुरसद असेल तेव्हां... ह्या आठवड्यांत नाहीं तर पुढच्या आठवड्यांत! '

' बरं, बरं, या बरं आतां, पाहूं... पुढच्या आठवड्यांत अवश्य पाहूं '.

मी घरी आलों. माझ्या पुस्तकसंग्रहाशीं गप्पा मारीत बसलों. दुसरीकडे गुरुजींच्या वागणुकीबद्दल विचार चाललाच होता. काय झालें होतें मला कुणास ठाऊक? बाकीं त्यादिवशीं मी अगदीं स्वस्थ बसलों होतों. माझ्या हातांत पुस्तक जरी होतें तरी वाचण्यांत मन रमेनासें झालें म्हणून विचार करीत तळहातावर डोकें टेकून आणि खिडकीच्या चौकटीवर कोपर ठेऊन बसलों होतों. माझ्या परिस्थितीबद्दल मी विचार करून ठेवला होतांच कीं उदयोन्मुख तरुणाला मार्गे खेचण्याचा प्रयत्न केला कीं त्याचा मनोभंग झाल्याखेरीज रहात नाहीं पण तेवढ्यातच त्याच्या उत्साहानें उचल खाल्ली कीं विजयी झाल्याखेरीज रहात नाहीं. समर्थांचें

प्रोत्साहन मला नित्यनूतन चेतन देत असे. त्यांच्या कृपेनें मी इतकी मजल मारली... इथून ' दिल्ली ' कांहीं बहोत दूर नाहीं आणि तिथें पोंहोचवावं असा समर्थांचा अभिप्राय मला स्पष्ट दिसे. एऱ्हवी त्यांच्या कृपेशिवाय एका क्षुल्लक सामान्य माणसाची हा सामना देण्याची तयारी कुठून होणार ? मला फक्त प्रसंग हवा होता. माझ्या आयुष्याची माती हातीं घेऊन तिचं हें आजचं सुकांत — सुगुण सुवर्ण बनविणाऱ्याला मी अवतारी पुरुष मानूं नको कां ? घटके-घटकेला मला त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण होत असे. ह्या भावबळानेंच माझी इथली किती तरी संकटें दूर झाली होतीं. माझा मार्ग निर्विघ्न झाला होता. माझें अध्ययन निर्दोष, निरपवाद झालें होतें. निर्मल आचरण व प्रशांत विचार ह्याची जोड मी अभ्यासाला देऊं शकलों होतों. समर्थांचा तो आशीर्वाद, तो पाठपुरावा नसतां तर पहिल्या अशांत आयुष्यानें माझी पाठ पुरवून मला त्या चिखलाच्या चाकोरींतच जिवंत पुरलें असतें. म्हणून आजची ही उच्च, प्रगल्भ, प्रशांत मनःस्थिती स्वामिमहाराजांच्या कृपेचेच फळ असें माझें पूर्वीचें भाविक आणि आतांचें तार्किक अशीं दोन्हीं मनें एकमतानें सांगत. इथल्या पंडितांचे पोपटपंची अध्ययन, कोते विचार, अभद्र आचरण पाहून माझें मन विटलें होतें. पण त्याला अजून वाचा फुटली नव्हती. सभा मंत्रजागरादिक समूहसमारंभांना गुरुजी मला जाऊं देत नसत. कां ? मी कुणाच्या चुका उघडकीस आणीन म्हणून ? दुसरी भीति काय असणार ? असें, एकंदरींत ह्या काशीक्षेत्रस्थ महापंडितांना ह्या दक्षिणी भटाची भीति वाटायला लागली. एकूण समर्थांच्या कृपेचा केवढा प्रभाव हा ? अष्टभावानें गद्गद होऊन माझी सजल दृष्टी मी वर केली. तों — काय मला दिसलें ? स्वामीसमर्थ इथं कसे ? हा भास ? — कुठें अक्कलकोट आणि कुठें मी ? पण छे ! भास असला तर मूर्ती इतका वेळ दिसेल कशी ? हा भास कीं सत्य ? अति विचार चांगला नाहीं असं आई म्हणे तो असा चांगला नव्हे. काय ? अतिविचारामुळें भास होतो ? कोण म्हणतो भास ? ते पहा महाराज

चालतही आहेत आणि-आणि — माझ्याचकडे येत आहेत ! धन्य मी — महाराज — अहाहा — सुबालार्कवत् ही आपली दिव्य-श्याम कांति — हें आपलें प्रसन्न, सुहास्य वदन — यावे — ह्या मृगाजिनावर बसावें — का थबकलांत — अर्घ्यासनादिक नको ? — बस्—एवढेंच — एवढ्याकरितां इतकी तसदी कशाला घेतलीत ? चारच शब्द सांगायचे होते ना ? ‘ आज तूं मंत्रजागराला जाच ’ — अहो, मी त्याचाच विचार करीत होतों. आपल्या मुखांतुन तीच आज्ञा आल्यावर आता शंका कशाला ? महाराज मी अवश्य जाईन, पण एकवार ह्या दासाला आशीर्वाद द्या. पुढें जाऊन मी साष्टांग नमस्कार घातला. वरदहस्ताचा स्पर्श अनुभवला. उठून पाहतों तो ना स्वामी ना कुणी... ! !

* * *

त्या दिवशीं मंत्रजागराचा कार्यक्रम झाला. मोठी मजा ही कीं मला आमंत्रण आलें होतें. गुरुजीही ‘ जा ’ म्हणाले. वेदमंत्र सुरूं झाले. किती तरी चुका करीत होते म्हणतांना. एकदां... दोनदां... तिनदां मी त्या ऐकून घेतल्या. पुढें मला गप्प बसवेना. मी त्यांच्या चुका नम्रपणें दाखविण्यास सुरुवात केली. सर्वजण चमत्कारिक मुद्रेनें माझ्याकडे बघूं लागले. वेदमंत्र थांबले. निराळेंच ऐकूं येऊं लागलें. मजवरच ‘ पुष्पांजली ’ सुरूं झाली. वेदमंत्राचे स्वर देतांना हलणारे हात निराळ्याच सुरांला ताल देत मागेंपुढें होऊं लागले. शांतवृत्तीचे ज्ञानवृद्ध असे चार पंडित पुढें आले. माझी बाजू उचलूं लागले. गुरुजीही टेका देऊं लागले. ‘ आजवर केलेली खच्ची बस् झाली — चांगल्याला डावून ठेवण्याची, वाईट म्हणण्याची प्रवृत्ति आतां सोडली पाहिजे ’ असें त्या पांचां ( पंडितांच्या ) मुखीं परमेश्वरच बोलतो आहे असें माझ्या विरोधकाना वाटलें. मलाही समर्थांचे

आशीर्वचन आठवून तसेंच वाटलें. विरोधक धक्का दिल्यासारखें मागें झाले मलाही एक धक्का बसला — पण तो कोणता — त्यांना कोणता बसला ? मला एकाएकीं समर्थमूर्ती दिसूं लागली. ' चांगल्याला वाईट म्हणण्याची प्रवृत्ति सोडा ' असे त्यांचेच शब्द मला ऐकूं आले. गुरुजीखेरीज बाकीच्या चार पंडितांना मी ओळखतही नव्हतों पण चतुर्वेदाच्या ह्या प्रत्यक्ष मूर्तीसाठीं—श्री स्वामिसमर्थांसाठीं—मी माझ्या हृदयाचा देव्हारा केला होता — त्या मूर्तीनेंच — त्या वेळेपासून शिरपादाचा ' श्रीपादभट्ट ' केला व माझें ध्येय मला प्राप्त करून दिलें.

# विनाशाय च दुष्कृताम् ।

लघुकथा

८ ते ११.

# ८.

दिव्य वनस्पतींच्या धनाचा स्वामी – प्रति कुबेरच – अशी हिमालयाची ख्याती आहे. मी पदवीनें डॉक्टर होतों पण वनस्पतीशास्त्राचा नाद विशेष म्हणून हिमालयाच्या चरणांजवळ कांहीं दिवस वास करून होतों. नित्याप्रमाणें मी आजही एक आश्रम गांठला. किती रम्य आश्रम तो ! हिमालयाच्या विशालोदरांत असलेल्या कुहरांत स्वामीमहाराज विराजमान झाले होते. भोंवतालीन सर्व पाषाणमय असले तरी स्वामींच्या दर्शनानें मनाची पाषाणता विरून स्वामींच्या सच्चिदानंद निमग्नतेबद्दल किती तरी पूज्यभावना उत्पन्न व्हावी. एकीकडे ओढा खळखळत असावा. रम्यशा वृक्षराजींतून वहाणाऱ्या शीतल, मंद वाऱ्यानें जरा पुलकित करावें. गुहेच्या प्रांगणातून खालीं दृष्टी फेंकली तर दाट धुकें पसरलेलें दिसावें. सर्वत्र फेनधवलता दिसावी. सूर्यकिरणाच्या उष्णतेनें हिमखंड वितळत असतांना दिसत असलेली रमणीयता बक्त उभे असावे. निरनिराळ्या वनस्पतींचा कटुमधु सुवास येत असावा. व्याघ्रादि हिंस्र पशूंच्या डरकाळ्यांनीं मन भयाभीत व्हावे. हरिणशिशु कोमल पल्लव खात असतांना, चपलतेनें पळत असतांना बघून मन रमावें. इतक्यांत आकाशांत मेघांनी दवडण्याची शर्यत खेळण्यास सुरुवात करावी. वातावरण सुन्न असें व्हावें. दूरवर भटकत असलेल्या व्याधांच्या बंदुकींचे बार ऐकूं यावेत. हरिणांची दृष्टी भयभीत झालेली बघून कींव यावी. अशा वेळीं गुहेंत स्वामीसन्निध जाऊन बसावें आणि चार उपदेशाच्या गोष्टी ऐकून पुनीत व्हावें. स्वामीमहाराज शांत मुद्रेनें बसले होते. सभोंवारच्या मेघांच्या गडगडाटानें, बंदुकीच्या सटफटीनें, व्याघ्रादिकांच्या डरकाळ्यांनी आपल्यासारख्याचें मन, केवळ

मनाच्या कमकुवतपणामुळे, भीतीमय बनते. पण स्वामीसमर्थ... त्यांची ती निर्विकार मुद्रा... स्वानंदनिमग्नता वगैरे बघून स्वामी कोणी सत्पुरुष असावेत असेंच वाटे. इतक्यांत व्याघ्रभयानें एक मृग महाराजाजवळ येऊन बसला. जणुं त्यानें भयभीत-पणें पळून येऊन त्यांच्या आश्रयाबद्दल विनंतीच केली. महाराजांनी त्याला कुर-वाळले व ते म्हणाले...

'क्यौं बे ! कायकू डरना है ?'

मी म्हटलें... 'शस्त्रास्त्रानें सज्ज झालेले आमच्यासारखे वीरसुद्धां प्रसंग बेतलां तर पिस्तूल रोखण्याचें धैर्य दाखविणार नाहींत. मग हा तर बिचारा निःशस्त्र, सरल स्वभावाचा गरीब !'

स्वामीमहाराज हंसले व मला म्हणतात—

'सरल स्वभावानेंच मनुष्य जगीं प्रिय होतो. 'द्वितीयाद्वै भयं भवति'... अजून तुझी विद्यार्थीदशा आहे. ज्ञानानंदाचा आस्वाद चाखून झाल्यानंतर योगा-नंदाकडे आपोआपच प्रवृत्ति होईलच.'

मी 'तथास्तु' म्हटलें व कांहीं वेळ आम्ही स्वस्थ बसलों. माझ्या हातात कसलेंसें पुस्तक होतें. पण वाचण्याकडे माझें लक्ष लागेना म्हणून मी उठलों व बाहेरच्या ओटीवर हिंडूं लागलों. इतक्यांत जवळच कुठें चाललेला खालील संवाद मला ऐकूं आला.

'त्या समोरच्या गुहेंत एक बोके संन्याशी रहातो. कंदमूलादि सेवन करून भला गलेलठ्ठ झाला आहे म्हणे'— हा आवाज स्त्रीचा वाटला.

'हो कां ? जगांत पुष्कळ असतात ! ! पण तपश्चर्येच्या नांवानें भोपळ्या-एवढें ! ! 'टिळेटोपी, माळा गळां' प्रमाणेंच ! ! !'— ह्या लगतच एक विकट हास्य मोकाट सुटलें. ह्यावरून दुसरी व्यक्ती एक पुरुष व तोही उन्मत्त असावा असें वाटलें. तोच पुढें म्हणाला...

'आपण जरा मजा करूं या. खरा संन्याशी कधीं रागवत नाहीं. चल, थोडीशी गंमत करूं' तो पुढें आला. खेंचल्याप्रमाणें ती स्त्रीही पुढें आली.

' आतांच नको गडे. उगाच कशाला विश्वाची परिक्षा पहावयाची ? जाऊं द्या. ती बघा समोर किती गोड राई आहे ती. त्यांतील तें आडोश्यावजा शिवालय. चला... जाऊं आपण तिकडे. वनश्रीचें हें विलासस्थान आपल्या विलासाला सूच–' इतकें... म्हणून तिनें एकदम त्याचा हात दाबला व डोळ्याची विचित्र फेंक फेकली. मला संताप आला. तीं दोघें एखाद्या प्रमत्त यक्षदांपत्याप्रमाणें विचित्र अभिनय करीत पुढें निघून गेलीं. मी विचार करीतच उभा राहिलों. मदिरा, वनिता आणि वित्त ह्यांचे पायीं मनुष्य कसा अहंकारी, पिसाट बनतो ह्याचें तें हिडिस दृश्य होतें. मदिरेच्या ऐन अंमलांत मदिराक्षींही मनांवर अंमल चालवितेंच... ' कामातुराणां न भयं न लज्जा ' ! मग तो आश्रम असो वा एखादें पवित्र शिवालय असो ! सुशिक्षित, सात्विक प्रेमाच्या बाता मारणारेही कामवासनेस बळी पडतात आणि अशा वेळीं अबलांचें प्रबलत्वही शून्य होतें. माझ्या मागें सळसळ असा आवाज झाला. मी मागें वळून पाहिलें. वृक्षवराचा आश्रय लतेनें केला होता. त्या दोघांवरून फुकाटणारा पन्नग जात होता. मी चार पावलें दूर झालों. पिस्तुल सज्ज ठेवलें. दुरून ' बंSSS भोलानाथ ' म्हणून एक अर्धस्फुट आरोळी ऐकूं आली. बोलणाराच्या तोंडावर कोणी तरी हात ठेवला म्हणूनच शेवटचे शब्द अस्फुट होते. पण लगेच एक विकट हास्यही कानांवर आदळलें... त्याच उन्मत्ताचें हास्य हें ! निशाचराच्या प्रेमविलासांची कल्पनाही मला असह्य झाली. भृंगकीटक न्यायाची मला आठवण झाली. लंपटतेमुळें – तन्मयतेमुळें तद्रूपता येते हें खरें असेल काय ? हा माणूस स्त्रीच्या इतका आहारीं गेला–ह्याच्यांत व त्या स्त्रींत फरक काय ? ' कसचा फरक... स्त्रीच तो ! ' महाराजाचे शब्द मला स्पष्ट ऐकूं आले व शांत समुद्राच्या लीलेसारखे त्यांचे प्रसन्न हास्य माझ्या कानीं आलें. पिस्तुल माझ्या हातीं होतेंच. अचानकपणें चाप दबला गेला व बार झाला. त्या बारानें बरेंचसें कार्य केलें. स्वामीमहाराज बाहेर आले. मी अभिवादन केले. मला म्हणतात...

' कोठें आहे तो चिनी ? बुलाव उसकु ? '

' पण महाराज, एकांतभंगाचें पाप– ! '

' कसला बोडक्याचा एकांत ? तो बघ तोच येतो आहे. '

स्वामी आंत गेले. मी तेथेंच उभा होतों. त्या दोघांचा संवाद ऐकूं येऊं लागला. मी नीट लक्ष देऊन ऐकूं लागलों.

' झालें हें किती विचित्र झालें. काय झालें हें ! आतां सौख्य कुठचें ? आनंद कुठला ? विलास कुठला ?

' मला वाटतं. आपण उगाच त्या साधूंची निंदा केली. त्याची ही शिक्षा असावी ! '

' इतकें सामर्थ्य ह्या लोकांत असतें म्हणतेस ? बाकी मलाही असेंच वाटा-वयाला लागलें आहे कीं उगीच त्याची मी निंदा केली. '

' तर काय ? आपण मघा समजलों तसा तो नसावा... तसा जर असतां तर गांवांत नसतां का राहिला ? तपश्चर्येची पुण्याई जोडणें देखील कठीण काम आहे... चला आपण त्या स्वामींचं दर्शन तर घेऊं '

' पण तेथें जाणार कसें ? अंतर्ज्ञानानें आपली सर्व पापें त्यांनी जाणलींही असतील. मला नाही बुवा धैर्य होत '.

' तेथें जाऊन करुणा भाकल्याशिवाय गत्यंतर नाहीं आणि वंदनीयांपुढें शरणांगत नाहीं व्हावयाचं तर कुणापुढें ? हे साधू तसे मोठे दयाळू असतात '

* * *

मला मोठें आश्चर्य वाटलें. मघाची ती टवाळी कुठें व आतांची ही पश्चा-तापाची भाषा कुठें ? तीं दोघे आतां जवळ आल्यांमुळें त्यांच्या चेहऱ्यावरचा फरक दिसून येण्याजोगा होता. चेहरे फिकट बनले... अश्रुपातामुळें डोळ्यांत निस्तेजता आली... निराशेमुळें मंदगती आली... शिक्षेच्या कडकपणामुळें दीन-बापुडीं बनलीं. तीं दोघे माझ्याजवळ आलीं व मला म्हणतात...

' कोठे आहेत यतिराज ? '

मी गुहेकडे बोट दाखविलें पण तो मला केविलवाण्या मुद्रेनें म्हणाला ' चलान् आमच्या बरोबर आंत... '

मी त्यांना घेऊन आंत गेलों. स्वामीचरणीं त्यांनी मस्तक ठेवलें. दोघेंही ओक्साबोक्सीं रडूं लागले. मी दूर उभा होतों. स्वामी शांतपणें त्या दोघांस म्हणतात...

' हंसत केलं आतां का रडतां ?... निंदा करावयाची आहे नाहीं ? अरे बाबा, षड्रिपूंचे दमन करणाराच खरा योगी असूं शकतो '.

त्यांच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. खूण बरोबर पटली होती. स्वामींनीं मंगलाशीर्वाद दिला नाहीं तर जगांत तोंड काढावयाला जागा नव्हती. स्त्रीलंपट चिनी स्वतःच स्त्री बनला होता ! त्यानें महाराजाच्या पायांवर पुन्हां डोकें ठेवलें व अश्रूंनीं पादप्रक्षालन केलें. महाराजांच्या दयाळू अंतःकरणांस शुद्धान्तकरणाची भक्ती मिळाल्यावर द्रव फुटावयास कितीसा उशीर ? महाराजांनीं त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला. पुन्हां सर्वत्र आनंदी आनंद झाला. त्या आनंदांत महाराज मला म्हणतात...

' हं चालूं दे... अब सुनाव तो कुछ. '

महाराजांना गाणें फार प्रिय असे. माझ्यापासून ते नेहमीं म्हणून घेत. मी सूर छेडूं लागलों...,एक हिंदुस्थानी चीज म्हटली... महाराज खुष झाले व गोड-पणें आम्हां सर्वांस निरोप दिला.

१

अवतारी पुरुषाच्या सामर्थ्याची प्रचीती, हेका धरूनच, पटवून घ्यावयाची म्हणजे मोठें कठीण काम आहे. कारण त्यांत आपले आपणच ' बनण्याचा ' प्रसंग ९९॥ टक्के येतोच.

*     *     *

चार-चौघे जमले कीं मुद्याऐवजी शब्दालाच धरून वाद चालतो. मूळ विषय पार वाहून जातो व शब्दांचे गोटे तेवढे एकमेकांचा कपाळमोक्ष करावयाला हातीं उरतात. चर्चेचा निर्बंध सुटून ग्राह्याग्राह्य विचारही सुटतो. कोणीकडून तरी हंसण्याचा व्यायाम होईल व मनाला आनंद मिळेल ह्या कल्पनेनें तोंडे बोलत सुटतात. हा अनुभव नेहमींचा आहे. ' मुखमस्तीति वक्तव्यम् ' असे प्रकार पुष्कळ वेळां घडून येतात त्याचप्रमाणें आज चार-चौघजण एका मोठ्या दालनांत भागवतांतील श्लोकांचा अर्थ करीत बसले होते. त्यांच्या मुद्रेवरून ते कंटाळल्यासारखे दिसत होते. एकानें डोळ्यांवरचा चष्मा कपाळावर चढविला होता. दुसरा पंचानें वारा घेत होता. तिसरे शिष्ट पुस्तक छातीवर घेऊन तक्क्याशीं टेकून पाय लांब करून आडवे झाले होते आणि चवथे गृहस्थ जरा पाय मोकळा व्हावा म्हणून दालनांतून इकडे तिकडे येरझाऱ्या घालीत होते. इतक्यांत समोरून ' श्रीस्वामीसमर्थ महाराज की जय ' म्हणून जयघोष ऐकूं आला. त्यासरशीं ह्यांच्या वादांस एक नवेंच चालन व वळण मिळालें.

*     *     *

‘ काय हो, येतां दर्शनाला ? ’

‘ हो... हो... तर ? काय गृहस्थ आहेसरे ?... त्यांना काय पहावयाचे आहे ? आहे आपला तो एक संन्याशी ! ’

‘ अरे बडबड करूं नकोस उगीच ! येतोस कीं नाहीं तें सांग ना ’

‘ आस्ते कदम ! धीर सो गंभीर, उतावळा सो बावळा ! दमानें घे, काय हो बंडोपंत, आजच्या श्लोकाचा अर्थ नाहीं लागत... चला...ह्या स्वामींनाच विचारूं. येतां कां ? ’

‘ ते भार्री तुह्माला सांगणार आहेत... मनःपूत वागणारांचें ठायीं तितकी बुद्धीची स्थिरता असूं शकतें कां ? ’

‘ अहो स्थिरबुद्धिवाले, तुमची स्थिरबुद्धि आतां नष्ट बुद्धि इतकी स्थिर — दगडाइतकी स्थिर झाली आहे. त्या स्वामींना कां दगड मारतां ? साधूजनाची निंदा करून उगाच आपली जीभ अन् आमचे कान कां विटाळतां ? साधुपुरुषांचे अनुभव जगाला आले, येतात व येतील. तुम्ही एक कोरडे रहातां त्याला कोणी काय करावे ? आपली भावनाच तशी जबर ! ! काय मोरोपंत, येता कां ? ’

‘ हो... हो... चला जाऊं या... अर्थही पाहूं विचारून... एक पंथ दो काज ’

‘ मी एकटा इथं बसून काय करूं ? मीही येतो तुमच्याबरोबर गंमत पहायला, ’ बुद्धिवाले म्हणाले.

एकानें बाबाशाई पागोटें चढविलें. एकानें पुणेरी पगडी घातली. एकानें फेटा लपेटला आणि चवथ्या चिक्कूनें आपल्या बाळ्याची टोपी डोक्यांवर टाकली... चारी मूर्ती निघाल्या.

* * *

स्वामिमहाराज नुकेच निजून उठले होते. हुक्क्याची सर्व सिद्धता होऊन नळी हातीं देण्यास जमादार पुढें झाला. त्यास महाराज म्हणतात—

'आज आम्हाला नको– आज 'वेद' विषयाची परीक्षा द्यावयाची आहे. मूर्खांच्या विद्यापीठांतील परीक्षक येणार आहेत ! !'

जमादारानें हुक्का बाजूला ठेवला व आपला घेऊन अंमळ दूर जाऊन महाराजांना गुड्गुड् आवाज ऐकवूं लागला. महाराज त्याच्याकडे पाहून हंसले. इतक्यांत ते चौघे वावदूक तेथें आले. महाराजांस उभ्यानेंच हात जोडून नमस्कार केला. महाराजांनी तो स्वीकारुन लटकेंच हंसून वेदांतील सर्वांच्या आवडीचा एक मंत्र म्हणण्यांस सुरवात केली. ते चौघे एकमेकांकडे पाहूं लागले. ज्या मंत्रानें आपण आपल्या चर्चेला सुरवात करतो तोच हा मंत्र महाराजांना कुणी सांगितला – समजा त्यांच्या एकाद्या हेरानें सांगितला असेल – प्रत्येक साधू हेर बाळगतो – पण आपल्या ह्या मुलाखतींत पहिला डाव महाराज खेळले व खेळून जिंकलेही, हे कांहीं ठीक झालं नाहीं. नाक गेलं. तोंड तरी राखूं या आतां – आपण अडलेला श्लोक काढूं व ह्यांना अडवूं–जिंकूं. पण विचारील कोण ?– बुद्धिवंत, तुम्ही ?– छट्, मी तर तुमची नुसती गंमत पाहायला आलों आहे – बरं मोरो – ह्यः ह्यः ह्यः, मी कशाला, मी कशाला, आपणच विचारा कीं – उरल्यानें पंतांनाच अनुमोदन दिलं, ठराव पास झाला – म्होरका पुढें झाला – गळ्याची गुंडी गळाटवून उपरण्याचा शेंढा झटकून खांद्यावर सारखा करून, खांकरून – 'मोरोपंत, तुम्हीच व्हा पुढं ना' असें म्हणत मुरकला. महाराजांचा वेदमंत्र संपला. 'पुंडलीक वरदे हाऽऽरि विठ्ठल' अशी त्यांनीं घोषणा केली – उपासकांनीं साथ देऊन तिला दुमदुमविली – ह्या चौकडींतून ही चोरट्या आवाजात 'हाऽऽरि विठ्ठल' निघालें. महाराज गर्दी करून आपल्याला भांबावून टाकीत आहेत, हा अन्याय आहे. चर्चानीतीचा हा खून आहे. रूसून चढल्याप्रमाणें 'बुद्धिमंत' पुढं झाला व गळाटल्या गुंडीचा अंगरखा त्यानें मागें खेंचला. इतक्यांत मुकुलित हस्तकमलांपैकीं एक तर्जनीच उभारून महाराजांनीं तोच अडलेला श्लोक म्हणण्यास सुरवात केली. अंगरखा खेंचणाऱ्याचा हात आश्चर्यानें तोंडावर बसला. कुणी न खेंचता तो दोन पावलें मागे हटला. मोठ्या केवढ्या सारखे चारदोनी आठ डोळे नांवाच्या

मालकांना विसरून महाराजाच्या वदनाभोंवतींच खिळून बसले. फजितीचा खेळ रंगाला चढला असें त्यांचें पडलेले चेहरें सांगूं लागले. श्लोक संपतांच ' ह्याचा अर्थ हवा ना रे ' म्हणून महाराजांनीं विचारिलें. पण एक ' होय ', उच्चारण्याचें कुणाला होईना. एक दोन माना मात्र हलल्या. महाराज म्हणाले ' बसा, सांगतो '. कळीच्या बाव्हल्यासारखे ते उभ्या जागीं मटकन् बसले. नयन व श्रवण ह्या खेरीज इतर अवयव माणसाला असतात हे त्यांच्याकडे पाहणाऱ्यांस पटलें नसतें. मेस्मेरिझम जाणणारा म्हणेल, ' महाराजांनीं ह्याच्यांवर भूल तर टाकली नाहीं ? केवढे वादमतंगज पण काय शेळ्यामेंढ्यासारखे खेटून बसले आहेत. ' महाराजांनीं त्यांना आसनांवर बसण्यास सांगितलें. जवळच्या उपासकांसही समोर बसविलें. जमादाराकडून गुडगुडी आणवली व सुमारें १५–२० मिनिटें त्या श्लोकावर प्रवचन केलें. मेस्मेरिझमची भूल उतरली. डोळे तेजाळले वदनें विकसलीं – भिंवया नाचल्या – ' आतां अर्थ जुळला ' असें जो तो सुचवूं लागला. महाराजांनीं समारोप केला. उपासकांनीं प्रणाम केले. हे चौघेही आपोआपच नत – साष्टांग नत – झाले – ' समझा, बच्चा ? ' असें महाराजांनीं विचारलें. पण बुद्धिमंतांना वाचा फुटेना मग. महाराज म्हणतात, ' क्यंव बढिया बुद्धिके गद्धे, समझ गया ? ' असें म्हणून महाराज उठले व कुठलीशी एक लावणी गुणगुणत आंत गेले. जणुं ह्या जड प्रवचनाचें त्यांना अजीर्णच वाटलें. पण त्या चौघांच्या बुद्धीचें अजीर्ण कायमचें दूर झालें. त्यांच्या ... द्वैताचा विनाश... नायनाट ... झाला.

# १०.

अहंबुद्धिनें जीव हा बद्धकर्ता... स्वरूपीं नसे बद्धमुक्तादि वार्ता ।
ह्मणोनि स्मृतिज्ञानभक्तीसी देसी... नमो स्वामी अनन्यभावें पदांसी ॥

परमात्म्याची ओळख पटावयाला संसाराच्या तुफान दर्यांतुन, भक्तीच्या होडक्यांत बसून, ज्ञानबलानें वल्हीं, सुकाणुं इत्यादिवर ताबा ठेवीत जावें लागतें. नुसते पोहून जाऊं म्हटलें तर कधींही शक्य नाहीं. नुसत्या पाखंडीपणानें कार्य होत नसून त्या बरोबर भावनाही पाहिजे. पुष्कळ घसा खरडून भजनें म्हटलीं... हात दुखेपावेतों झांजा वाजविल्या, पण भावना मुळींच नसली तर कुठचें परमेश्वर – दर्शन ? तेंच एक भावयुक्त मानसिक चिंतन असेल, तर परमार्थाची जोड अवश्य झालीच पाहिजे.

* * *

द्वारकेपासून थोड्याशा अंतरावर नारायण सरोवर या नांवाचें एक यात्रेचें ठिकाण आहे. तेथें कृष्णत्रिविक्रमाचें मंदिर असून प्रतिवर्षी यात्रा जमते. द्वारकेहून जलमार्गे अगर पायवाटेनें ह्या ठिकाणीं जातां येतें. गांव लहानसेंच पण रम्य वाटतें. श्रींचें दर्शन हेंच यात्रेकरूंचें ध्येय. त्यासाठीं किती लांबून मंडळीं येतात पण त्यांना गोरांचें ( क्षेत्रस्थ पोटभरु ब्राम्हणांचे ) हातीं सांपडलेलें पाहिलें कीं त्यांची कींव येते. त्यांची धांवपळ पाहून त्यांच्या ध्येयतत्परतेचें कौतुक वाटते. ही गोरमंडळी प्रतिष्टित चोर !! धनलोभी तर इतकीं कीं परमेश्वराच्या नांवावर वाटेल तसा पैसा यात्रेकरूजवळून काढवावयाचा !! ह्या नारायण सरोवरीं एक कुंड असून तेंच एक तीर्थ समजलें जातें, पण त्यांत स्नान करावयाचें म्हटलें कीं

गोराची तुंबडी भरल्याशिवाय आंत उतरणें शक्य नसतें. एवढ्या लांबून केवळ स्नानदानादिकाकरतां यावें पण हेंच घटिंगण आयत्यावेळीं गळीं पडून उपरण्याच्या गांठी सोडून — कडोसऱ्या तपासून — हात धरून — दडबड करून — वाटेल तसे पैसे घेतात मग अंध — पंगु — दीन वगैरेस धर्म काय करावा ? काय दान द्यावें ? हे लोक इतका पैसा घेऊन सत्कारणीं खर्च करतील अशी आशा करणेंही व्यर्थच. एक वेळ यात्रेकरु ह्या नात्यानें गोराशीं आमची एक खडाजंगी उडाली ती अशी:—

*

त्यानें मला गंध लावले व हात पुढें केला. मी म्हटले—

' कां रे बाबा ? '

' देवदर्शनाचें वेळीं गंध लाविलें. द्या दक्षणा ! '

' मी त्याच्या हातांवर एक पैसा ठेवला. त्यानें तो फेंकून दिला व म्हणतो—

' ब्राम्हणाला दक्षणा एक पैसा... देवदर्शन करतां... गोमतीस्नान करतां... सरकारचे कर भरतां आणि आम्हांला एक पैसा ? जरा कांहीं... ! !

' शरम—म्हणणार तूं आतां नाहीं कां ? तुम्हांला काय म्हणून पैसा द्यावयाचा ? एवढा चांगला गुंडगोल दिसतो आहेस — धंदा करावयाला काय झालें ? शरम नाहीं वाटत हात पसरावयाला ? माझा शरम काढतोस ती ' ? पैसा फेंकून कां दिलास ? तुला कोणी सांगितलें होतें गंध लावावयाला ?

' यात्रेला येतां तरी कशाला ? दान करावयाचें नाहीं तर मग यात्रा तरी कां ? '

' त्याची तुला काय पंचाइत ? तूं आल्या वाटेनें निघून जा ! नाहींतर पोलिसच्या हवालीं करून बेअदबी बद्दल खटला भरीन तुझ्यावर ! काय समजतो तूं मनांत ?

' बरं, बरं, असें पुष्कळ पाहिलेत ! उगीच कां तणतणतां ' ? असें म्हणून किती सपाट्यात निघून गेला ! फेंकलेला पैसा ज्यानें उचलला तो त्याचा मुलगा होता हें मला मागाहून कळलें.

*

असेंच एकदां राधाकृष्ण नांवाच्या तेथील गोरवजा ब्रह्मचारी बुवानें केलें होतें. त्याचे चौघे शिष्य कुंडावर उभे राहून एक विवक्षित कर दिल्याखेरीज कुणांस आंत उतरूं देईनात. ज्यांनीं कर दिला त्याला स्नान करण्याची मोकळीक देत असत. आंत पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ होतें. कुंड बरेंच खोल असून त्यांत चार पुरुष पाणी नेहमीं असे. यात्रेकरूंनी त्या कुंडांत स्नान केलें कीं त्यांना मुक्ति मिळे ही एक भावना असल्यानें प्रत्येकजण चार-आठ आणे दक्षणा देऊन मानसिक स्वास्थ्य मिळवित असे.

*　　　*　　　*

दुपारची वेळ. सूर्य डोक्यांवर आला होता. त्या बाजूचा प्रदेश अगदीं रख-रखीत असल्यानें उन खूप पडलें होतें. पण समुद्रकिनारा नजीक असल्यानें तितकी उष्णता भासत नसे. श्री स्वामीसमर्थ शिष्यासमवेत तेथें येऊन दाखल झाले. यात्रेकरूंचा मेळा कुंडावर गोरांशीं बाचाबाची करीतच होता. वारा थंडगार वहात होता. आंतमध्यें पाण्यांवर किती शोभायमान अशी तरंगावली दिसत होती ! श्री स्वामीसमर्थ कशाला बाचाबाची करतात ? ते तर आपल्या योगसामर्थ्यानें आत एकदम पाण्यांवर वीतभर अधांत्री असे राहिले. तेव्हां मात्र सभोंवारची मंडळी चकीत झाली. विशेषतः राधाकृष्णानें जेव्हां हें पाहिलें तेव्हां तो मनीं वरमला व श्री स्वामीसमर्थांस अभिवादन केलें. बाकीच्या कुटाळखोरांनीं नाना तर्कवितर्क लढविले. हे स्वामी खरोखरीच योगाभ्यासी असतील काय ! ह्यांना मोहिनीमंत्र येत असेल काय ? कां तपसामर्थ्य असेल ? कां सप्तशतीचें पारायण केलें असेल ? कां दृष्टीबंधनाचा मंत्र सिद्ध केला असेल ? कां प्राणायामें करून हें साध्य झालें असेल ? कोणत्या दैवताची आराधना केली असेल ?... असेल कोणी तरी मलीन दैवत ! त्याशिवाय इतकें व्हावयाचें कसचें ? असल्या प्रकारचे कुटाळखोरांचें तर्कवितर्क ऐकून शहाण्यांस त्यांची कींव आली असती. बाकी सूज्ञानें मात्र श्री स्वामींच्या मुद्रेवरूनच ते योगी, महात्मे असावेत असें एकदम मानलें असतें. किती आनंदपूर्ण वृत्ति !

किती गोड दृष्टी ! एखाद्या बालकाच्या डोळ्यांतील निर्दोषता त्यांच्या दृष्टीचे ठायीं होती. श्रीस्वामी शिष्यांसमवेत स्नान करून बाहेर आले. राधाकृष्ण म्हणतो—

' महाराज विदुराघरच्या कण्या गोड करून घ्याव्यांत ! '

' क्यंव बे ? अब् तेरेकुं मालूम हुवा ? चलो... पकाव खाना ' असें म्हणून त्याच्या घरीं गेले. यथासांग पूजाअर्चा होऊन श्रीस्वामिसमर्थांनीं त्यांच्या घरीं पुडी घेऊन त्यास कृतार्थ केले. संतकृपा ही मेघवृष्टी प्रमाणें असते. मेघवृष्टी होतांच सर्वत्र रमणीयता दिसूं लागते. एकनिष्ठ, भावयुक्त अंतःकरण असल्यावर संतकृपा होण्यास अवसर कुठचा ? पुडीच्या वेळीं ते चौघे कुटाळखोर शिष्य हजर होतेच. त्यांना स्वामिमहाराज ह्मणतात—

' अरे, आह्मी तर भिक्षाटन करतों... हिंडत असतों... आह्मांस कसली योगसिद्धी अन् ज्ञानप्राप्ति ! तुह्मी तर वेदविद्यापारंगत महापंडित, मग मांडा पंचराशीक, करा गणीत, काढा तुमची विद्वत्ता केवढी ? '

स्वामीमहाराजां समक्ष ह्या गोष्टी मुळींच झाल्या नसतां नेमकां आपल्यासच प्रश्न कसा विचारला ? अंतर्साक्षी तर खरेंच. नाहीं तर आपल्या शब्दांत आपल्याला ' बनाविलें ' नसते. ह्याचा विचार त्यांस बोचूं लागला. ते विनम्र झाले. स्वामीचरणीं मस्तक ठेविलें. आणि ह्मणतात ' महाराज, चूक झाली खरी. अज्ञानमदानें आह्मी आपणांबद्दल संशय घेतला त्याची क्षमा असावी. '

*　　　*　　　*

सायंकाळ झाली. सूर्यभगवान अस्ताला जाण्याच्या बेतांत होते. आकाशांत मेघाभोंवती कोठें सोनेरी तर कोठें रुपेरी छटा दिसत होत्या. कांहीं ठिकाणीं मेघसमुदायानें गर्दी करून सोडल्यामुळें आकाश काळेंकुट्ट बनलें होतें. कांहीं ठिकाणीं त्याची धवलता फारच आकर्षक होती. समुद्रतीरांवर आढळणारे पक्षी आपल्या घरट्याकडे परत येण्यांस निघाले होते. समोरून कुठूनशी ' द्वारकाधीश की जय ' म्हणून घोषणा ऐकूं आली.

नुसतें काषायवस्त्र परिधान केलें म्हणजे चित्तशुद्धी होते — आत्मोन्नतीचा मार्ग सांपडतो असें नव्हे तर आत्मोन्नति हें देखील एक तपश्चर्येचें फळ होय. उपासने-व्यतिरिक्त आत्मोन्नति होईल किंवा भक्तियोगावाचून मोक्षप्राप्ती होईल ह्या भावनाच मुळीं चुकीच्या आहेत. पण केवळ काषायवस्त्रपरिधानानें लोकांच्या दिखाऊ आदरास पात्र झालों व अहंकारभावनेनें नटून बसलों तर आत्मोन्नति ऐवजी उलट अवनति मात्र होते.

*　　　　*　　　　*

डाकोरसारख्या पवित्र ठिकाणीं बुवांचें वास्तव्य असे. श्री क्षेत्रात ' नित्य श्री नित्यमंगल ' असावयास हरकत ती कोणती? त्यांच्या विरक्तावस्थेनें गोमती तीरांवर असलेल्या एका मंदिरातल्या त्यांच्या विजनवनवासामुळें लोक त्यांना ब्रह्मचारीबुवा म्हणून ओळखीत असत व शक्य तितकी मदतही करीत. पण... ! ! नुसता काषायवेष परिधान केला असला... फटिंगवृत्तीनें वागत जरी असले तरी काम-क्रोधादि षड्रिपूंनीं त्यांच्या हृदयाचा ठाव अजून सोडला नव्हता. ' युवति-जनकथामूकभावः परेषाम् ' ' यतयो भागसंग्रहात् ' वगैरे सुंदर सुभाषितें माहीत जरी असलीं ते कामज्वरानें ते सदा पीडित असत. कोणी टवाळीचें स्वरूपांत बोलूं लागला कीं पिसाटासारखे त्यावर चिडत असत. सकाळीं देवदर्शना-करतां म्हणून मंदिरांत जाऊन कोणास थोडीशी विभूती देऊन कोणी दोन पैसे देता कीं काय म्हणून तोंडावर आशाळभूतपणा आणीत असत. मध्यान्हीचा सुमार

झाला कीं लगेंच थोड्याफार आण्याचे पैसे गोळा करून मंदिरांतुन निघत व पायीं खडावा, हातीं दंडकमंडलु, डोळ्यास मोठा काळा चष्मा अशा थाटांत कोणा एखाद्याचें घरीं पुढीचें प्रस्थान ठेवीत. ह्या त्यांच्या शिष्टपणामुळें गांवांतील टवाळखोर 'अति तृष्णा न कर्तव्या' म्हणून त्यांच्या तोंडावर म्हणत. स्वतःच्या वाचनव्यासंगाचें तर त्यांना इतकें महत्व वाटत असें कीं बस्. 'मी फार वाचलें आहे' असें लोकांना भासविण्याचा प्रयत्न अगदीं मनापासून करीत असत आणि इतक्यानंतर त्यांची वृत्ति म्हणजे 'श्वानवत् गुर्गुरायते' वजा नसली तर मग काय राहिलें ? अशा वृत्तीनें हे 'निवृत्तीपर' संन्याशी तेथें रहात असत.

* * *

'बुवा कांहीं म्हणा खिशांतली नोट जावी कशी ?' बुवांच्या मंदिरांतला एक उतारु म्हणाला.

'सामुद्रिक शास्त्राप्रमाणें पाहूं गेलें तर द्रव्यनाश दिसतो' बुवा हात पहात म्हणाले.

'पण बुवा आम्हां सांसारिकांना लक्ष्मीची आवश्यकता...'

'असेल पण आम्ही तिचा विटाळ मानतो म्हणून तूं येथें येण्यापूर्वींच तिनें यःपलायन केलेलें दिसते'

* * *

दुसऱ्या एका मुंबईच्या 'मवाली' उतारूबरोबर बुवा बोलत होते.

'अरे ए नारदासारखी आतां मला वासना उत्पन्न झाली आहे. माझें नांव मोहन... मला मोहनाराणी पाहून द्या हो कोणी ! !'

'मवाली'ला वाटलें बुवा आपली परिक्षाच पहात आहेत. तो म्हणतो—

'हो... हो... देऊं बरं... काळजी कशाला ? पण काय बुवा ? कसली हवी ? जन्मभर गोरी कीं क्षणभर—'

‘ अरे काळी चालेल. ’ बुवा गुणगुणले ‘ प्राप्ते तु षोडशे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत् ’... माझा मठ मुंबईंत असता तर... ? ’

‘ कशाला ? इथेंच जित्राची मुंबई तुम्हांला करता येईल कीं ! ’

*　　　*　　　*

बुवाच्या मंदिरांत माझा मुक्काम कारणपरत्वें होता. बुवाला मी ओळखला होता. त्या दिवशीं बुवा गोमतीतीरावर संध्यावंदनादी बकध्यानें करून करीत बसले होते. सायंकाळचा सुमार. मी जरा एका बाजूस घाटांवर बसलों होतों. सूर्यनारायण अजून पूर्णपणें अस्ताला गेले नव्हते आणि ह्मणूनच पश्चिम क्षितिजांवर एक लाल रंगाची छटा दिसत होती. गोमतीच्या पाण्यावरून वहात असणारा सोसाट्याचा वारा गोमतीला कांपवित होता. दूरवरच्या तीरावर दिवे लागले होते. त्यांचें प्रतिबिंब पाण्यांत पडलेलें दिसत होतें. एकीकडच्या बाजूस धुराचे लोट दिसत होते जणूं तेथें स्मशानच असावें. पक्षी घरट्याकडे परत येत होते. पाणबुड्या — आणि पाणकोंबड्या घटकेंत पाण्यात डुंबत — घटकेंत वर दिसत... घटकेंत कांठावर येऊन बसत. मंदिरातून आरतीची वेळ झाली म्हणून शिंगाचा आवाज ऐकूं आला दुसरीकडून शंखनाद — तिसरीकडून सनईवादन ऐकूं येऊं लागले. पण उठण्याची इच्छा मात्र होईना. अंधार पडूं लागला. चादण्या चमकूं लागल्या. वारा जरासा मंदावला होता. काठांवर धक्याशीं तरंगावली आपटल्यामुळें डुबुक् डुबुक् असा आवाज होत असे. इतक्यांत एक षोडशवर्षीय कन्यका तेथें आली... बुवाचें नेत्र तिच्यावर खिळले. ती घाट उतरून पाणी घेऊं लागली. ‘मोहने’, बुवा मोठ्याने ओरडले. तिनें दचकून मागें पाहिलें. पाय सरकला. धाडकन् पडली. घागर गड-गडत खालीं गेली, पाण्यांत जाऊन पडली. दोघाही ‘ गद्गद् ’ रडूं लागल्या.

मी आवाज ऐकल्याबरोबर खालीं डोकावून पाहिलें. बुवा तिला मांडीवर घेऊन तिचें मुख कुरवाळीत — अंगावरून हात फिरवित होते. त्यांच्या वासना बळावल्या. डोळ्यांत कांहीं और चमक दिसत होती — बुवांनीं तिला घट्ट धरिलें. पण इतक्यांत ती सावध झाली — मी खालीं घाट उतरतच होतों.

तीं सावध झाली. एकदम दूर झाली व बुवाच्या फाडकन् मुस्कुटांत चढ-विली व म्हणते—

' शरम नाहीं वाटत... ब्रह्मचारी म्हणवितां तरी कशाला ?... दररोज मी बघते...

' असेंच तुला वाटत असेल तर होऊन जाऊं दे ! '

' हो... हो... तर ! '

बुवांनी हात पुढें केले. तिनें हात बाजूस सारण्याचा निष्फळ प्रयत्न केला. आपले हात झटापटीनें सोडवून घेतले व तीं बुवाला मारीत ओरडूं लागली. मी तेथें गेलों. बुवांचा चेहेरा खरकन् उतरला. बुवा मला म्हणतात...

' जगांत न्यायच असा आहे... ज्याचं करावें बरं तो म्हणतो माझंच खरं...'

' बुवा... कांहीं लाजलज्जा आहे कां शिल्लक ? मी पाहिलें बरं कां आपलं बकध्यान ! उगीच कशाला आतां प्रतिष्ठा ! '

' तोंड संभाळून बोल जरा. '

' हो... हो... समजलें... हात संभाळून बोलतों आहे हेंच जास्त आहे ? '

त्यांनीं मला मारण्याचा प्रयत्न केला मी त्यांना दूर ढकललें. तों बुवा गोमतींत गंटागळ्या खाऊं लागले.

*

' किती वेळेवर आलां तुह्मी. नाहींतर... बुवाजी... ! ! '

' मला तसला संशय होताच ह्मणून आज मी पाळतीवर होतों '

माझे तिनें मनःपूर्वक आभार मानले. पण शब्दानीं नव्हेत—आनिमिष नेत्रांनीं ! !

*

रात्रौ केवळ्या मोठ्यानें बुवा ओरडत उठले. चाबुकाचे फटकारे जसें फटाफट उडावेत असा आवाज ऐकूं येत होता. बुवा अगदीं अजीजीनें विनवणी करीत उभे होते. तोंडानें ' अयायाई—मेलों—नको नको—आतां नाहीं पुन्हां करणार ' —इत्यादि नंतर

'येई धांवत त्रिंबकराजा... गुरुमहाराजा...' असा आक्रोश सुरू केला. इतक्यांत खालील शब्द ऐकूं आले...

'साधू व्हावयाचें आहे ? बेट्या,' टांकीचे घाव सहन करावे लागतात' लोकांचे खिसे तपासून... परदारा... परद्रव्यापहरण करून साधुत्व मिळत नसते. त्यांस हा असा मारच ! !'

पुन्हां फट् फट् असा आवाज ऐकूं आला. बुवाजी कळवळून ओरडूं लागले.

* * *

दुसऱ्या दिवशीं त्यानें आम्हांस सर्व हकीकत सांगितली व गाशा गुंडाळून श्रीमद्दत्तावतारी अक्कलकोटनिवासी श्री स्वामीमहाराजांसंनिध रहाण्याचा निश्चय निवेदन केला.

# धर्मसंस्थापनार्थाय- ।

लघुकथा

१२ ते १४.

ग्रं. गो.

# १२.

' स्वामिसमर्थ येती घरा तोची दिवाळी दसरा ' अशी अक्कलकोटस्थजनाची भावना झाली होती. स्वामीसमर्थ आपले गावीं यावेत म्हणून कित्येकजण प्रार्थना करीत असत. पण लहर लागेल तेथेंच महाराज जात असत. त्यामुळें कोणाही सेवेकऱ्यांवर रागलोभाचा प्रश्न उरत नसे.

*　　　*　　　*

एक वेळ सकाळपासून सायंकाळपावेतों स्वामीसमर्थ–दर्शनास खूप गर्दी झाल्यामुळें सबंध दिवसांत नैवेद्य ग्रहण करण्यास फुरसद मिळाली नाहीं. हा आला... तो गेला... असें सारखे चालल्यामुळें महाराजांस चार घांस भरवितां येईनात. तेव्हां सर्व मंडळीं भुकेनें व्याकूळ होऊन तळमळत बसली होती. यजमान जेवल्याखेरीज इतरानें जेवणें शिष्टाचारास सोडून असल्यानें कोणीही जेवले नाहींत. सायंकाळ झाली तों महाराज बाहेरच जाण्यास निघाले ! ' चलो ' म्हणताच सर्व शिष्यवृंद महाराजांचें मागें जाऊं लागला. महाराज पायवाट सोडून आडरानांत शिरले त्याबरोबर मंडळींही.

नीळधूसरवसना पश्चिमा जणूं श्रमामुळेंच आरक्तमुखकमला झाली होती. सूर्यनारायण अस्ताचलांवर श्रमनिवारणार्थ पाय सोडून बसले होते व किंचित् लालस पण अधिक कौतुकपूर्ण दृष्टीनें ते पश्चिमेकडे पहात होते व त्यामुळेंच कीं काय ती जास्त जास्त आरक्त होत होती. पण हें सुंदर दृष्य क्षणांतच विरलें. महाराज एका राईंत शिरले. घनदाट वृक्षच्छायेमुळें कलत्या सूर्याच्या किरणांसही तेथें मज्जाव होता.

महाराज पुढें चालूं लागले. मंडळी थकून गेली. श्रीपादभट्टांनी महाराजांस आता थांबण्यांस विनविले पण महाराज म्हणतात—

'कायरे, तुझ्या बापाचे आम्ही नौकर आहोंत ?'

इतकें झाल्यानंतर कांहीं इलाज नव्हता. श्री स्वामीसमर्थ एक मैल आणखी पुढें गेले. शिष्यवृंद मागाहून चालला. मग मात्र श्रीपादभट्ट अगदीं गयावया करून विनवूं लागले—

'महाराज, आतां आमच्यानें पुढें चालवत नाहीं. आतां तरी आमची कींव येऊं द्या.'

महाराज थांबले. हुश्श करून एका झाडाखालीं बसले. मंडळींना हायसें वाटलें व सर्वजण पटापट बसले. पांच मिनिटें होतात न होतात तोच एका वृद्ध सेवेकऱ्यानें पाणी मागितलें म्हणून पाणी आणण्यांस दोघे-तिघे गेले. बाकीची मंडळी हाः हुः करीत बसली होती. कित्येकांनीं पाय पसरले होते. कित्येक तोंडावरून हात फिरवीत होते. कित्येक वारा घेत होते. कित्येकांनी डोक्याचा फेटा खालीं हंथरून स्वस्थपणें पडण्याची तयारी चालविली होती. कांही जेठा मारून चंचीचे कप्पे तपासीत होते.

* * *

'ही एकटी उभी कां ? कोणाची वाटबिट पहाते काय ?'

जवळ जवळ अंधार पडला होता. हे तिघे पाणी घ्यावयास गेले त्यांपैकीं एकानें ह्या युवतीस बघितले. ती एका प्रशस्त झाडाखालीं उभी होती. तिची आकृती आकर्षक असून मनांत आदर उत्पन्न करणारी होती. तिच्या तेजाळ व विशाळ भालप्रदेशावरचा कुंकुमतिलक तिच्या सौंदर्याला पावित्र्याची ठसठशीत जोड देत होता. तिनें अंगावर घातलेले दागिने ती 'थोरां—' घरची आहे असें लख्ख सांगत होते आणि तिच्या आसपास मांडलेला ५०—६० पानांचा भोजनप्रपंच तिच्या थोरपणाला पुष्टी देत होता. कुणी राजेमहाराजे

शिकारीला — पण मग, ही देखील शिकारीलाच नसतीं कां गेली ?— तिचे भरदार पण सुटसुटीत शरीर मृगयेला योग्यच होते. कांहीं व्यंग म्हणून हिला मागे ठेवली म्हणावें तर तिनें खोंचलेला पदर, सांवरलेला ओंचा, तिचा फुललेला चेहेरा व उभे राहण्याची तिची ऐट पाहिली कीं व्यंगाची कल्पनाच उधळून जाते — तिच्या उत्फुल्ल वदनांत मातेची स्नेहाळता रसरसत होती — विजन अरण्याच्या एकांतांत एकटी तरुण सुंदर स्त्री म्हणजे सामान्य पुरुषाला जबरदस्त मोहस्थानच होय. पण ह्या स्त्रीकडे — तिच्या रुबाबदार अंगलटीकडे, निर्भयवृत्तीकडे, सुहास्य वदनाकडे, नयनांतील प्रशांत तेजाकडे — एकवारच पाहिले तर दुष्टांतला दुष्टही तिला ' मातोश्री ' ह्मणून साष्टांग नमन करील. तिच्या सन्निध आलेले तीन पुरुष तर महाराजांचे सेवकच होते. त्यांच्या अंतःकरणांत पापवासनेला थाराच नव्हता. त्यांनीं तिला तत्काळ ' आई ' ह्मणूनच हांक मारली व ' कांहीं खावयाला देतां कां — तहान-भुकेनें व्याकूळ झालों आहों ' असें केविलवाण्या मुद्रेनें विचारलें.

' होय कां ? मग मघापासून येथें फिरतां आहांत — बोललां नाहीं कुठें तें ? किती संकोची स्वभाव हा ! '

' हो... असें झालें खरें ! ! ! '

' आज आम्ही येथें पाव्हणे मंडळींकरतां वाट पहात आहोंत पण मला नाहीं वाटत आतां ही मंडळीं येतील. तेव्हां हे ५०—६० मनुष्यांचे अन्न तुमचेंच समजा. तुमच्या बरोबर आणखी कांहीं मंडळीं असतील ? '

' होय आहेत... आई, तुमचा थोरपणा स्वामीमहाराजांनी— '

' पण नाहींतर काय करणार एवढ्या अन्नाचें ? कोणाच्या तरी मुखीं पडेल. '

तिने तें सर्व अन्न स्वाधीन केलें. ते तिघेजण तिला ह्मणतात—

' स्वामिमहाराज समोरच्या झाडाखालीं बसले आहेत. आपण दर्शनास येतां कां. '

' तुम्ही व्हा पुढें. मी येतें. '

सेवेकरी अन्न घेऊन गेले. सर्वजण जेवावयास बसले. महाराज म्हणतात—

' अरे थांबा. तुमची ' आई ' यावयाची आहेना – वाढेल – तुम्ही सगळे थकलां आहांत. अन्नपूर्णामैया, तसदी माफ करो, पिरसो सबकुं ! '

अमृतासारखें गोड व अमृताहून गोड अशा हातांनी आग्रहपूर्वक वाढलेलें अन्न आश्चर्यानें आ केलेल्या तोंडांत टाकीत सर्वजण जेवले. महाराज त्या दिवशीं कधीं नव्हत हातानें जेवले... ' अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ ' हा श्लोक अन्नपूर्णेनें म्हटला. मंडळींबरोबर महाराजही म्हणूं लागले.

उभयहस्त उभारून उंच स्वरांत महाराजांनीं ' पुंडलीक वरदे ... ' चा घोष केला – मंडळींनीं त्याला ' अक्कलकोटनिवासी स्वामीसमर्थ महाराज की जय ' अशी पुष्टी दिली. महाराजांच्या उभविलेल्या हातांतून प्रसादाचा एक तुकडा श्रीपाद-भट्टांच्या पानांत जाऊन पडला. श्रीपादभट्टांना कृतार्थ झालोसें वाटलें. महाराज म्हणतात.

' त्याला आणखी दोन लड्डू वाढा. फार त्रास झालाय् त्याला. धावायची त्याची विनंती आम्हीं धुडकावून लावली '.

श्रीपादभट्ट म्हणतात.

' महाराज, अशा मंगल प्रसादभोजनाकरतां शेंकडो मैलच काय पण शेंकडों जन्मही मी घेईन व हव्या तितक्या प्रार्थना करीन. ' अशा अनेक भाषणप्रसंगासमवेत सर्वत्रांचे भोजन मजेंत उरकलें – श्रीपादभट्टाकरवीं महाराजानीं सर्वांना तांबुल देवविले. यजमानीण बाईनीं सुग्रास भोजन दिलें आतां सुवर्ण दक्षिणाही मिळेल, असें भरल्यापोटीं कांहीं हांव भरल्यांना सहजच वाटूं लागलें. हातांत दक्षिणापात्र घेऊन मालकीणबाई कधीं येते इकडे त्यांची दृष्टी धांव घेऊं लागली – पण त्या बाई

कुठे दिसेनात. बसल्याजागीं मानः वळवून वळवून पाहिले—पण छट्—नाहींतच कुठें— इतक्यांत कंकणाचा मधुर नाद ऐकूं आला – ' येते मी ', असे शब्द ऐकूं आले – महाराज हंसत हंसत उभे राहिलेले दिसले. पोंचवायला जावें त्याप्रमाणें चार पावलें चालत गेले – थांबले – पुन्हां दोन हास्यांचा सुरेख संगम झाला – महाराज परत फिरून स्वासनीं येऊन बसले. ' घरच्या माणसांना दक्षणा कोण बाप देतो ! ' असें ह्मणून सेवकांकडे सूचक दृष्टीपात केला – सर्व सद्गदित झाले – साष्टांग नमस्कार करून ' दत्तअवधूत... अन्नपूर्णा मायकी जय ' इत्यादि जयघोषांनीं अरण्य दुमदुमले तोंच ' ...... योगक्षेमं वहाम्यहम् ' हा पंक्तींत म्हटलेला श्लोक तसाच ऐकूं आला.

# १३.

नुक्तेच आखाड्यांतून बाहेर पडलेले ते मल्लद्वय वाटेनें चालले होते. किती पिळदार शरीरें त्यांचीं तीं ! अण्णा ' किर्लोस्करांचा ' हा एकेक दंड, म्हणून दाखवितां आला असतां कदाचित्. दोघेही लुंगी नेसून अंगांत मुंडेछाट सदरे अडकवून डोक्यांवर भय्येशाही बिनबुडाची जाळीदार टोपी ठेऊन चालले होते. पायांत लोखंडाचें पातळसें कडें अडकाविलेलें होतें. गळ्यांत काळ्या लोकरींतून ओवलेला सोन्याचा ताईत होता. तोंडावर दाढीमिशांचे जाळे जरी पसरलेलें नव्हते तरी बारीकशी लव घनदाट होती. किती करारी नजर त्यांची पण ! जरा आपण जवळून चालूं या म्हणजे संवाद तरी ऐकूं येईल.

' अबे यार, कैशी औरत चल् रही है. किसमत्, किसमत्, क्या देखता है ? उसकुं एक गलीमें ले जाईंगे... हमकूं कौन बोलने वाला है... हम तो बीन – हरीफ है '.

' खाना – पीना – मगरमस्त रेहेना ये बात तो ठीक आहे लेकिन् ऐसा कैसा करना ? ऐसा कभी भी नहीं करना ! रेहिमत्, तूं केहेता है वो बात एकदम बुरी आहे '

' अबे जा बे...तेरेकूं आना हो तो चल्... नहीं तो हम् ही अकेले जाईंगे उसके पीछे पीछे. हमारी किसमत् तो आज खुल् गई... तेरी किसमत् पडने दे इदर '

असें म्हणून तो सपाट्यांत चालूं लागला. सायंकाळच्या संधिप्रकाश आतां मरणोत्तर असलेल्या मुखावरच्या मंद तेजाची कल्पना देत होता. तो प्रकाशही सपा-

त्यांत विरत होता. अंधार पडला होता. रस्त्यांवर दिवे लागले होते. वहाता रस्ता असल्यानें गाड्या, स्टारें इत्यादिकांची वहातुक सारखी सुरु होती. आकाश निरभ्र नव्हतें. नभ मेघांनीं आक्रमिलें असल्यानें तारकागण दिसत नव्हता. कोठें कोठें पक्षिगणांचा चिवचिवाट — पंखांचें फडफडणें ऐकूं येत होते.

ती बाला किर्ती घाईत चालली होती. पाऊस भरून आल्यामुळें ती कोसळण्याच्या अगोदर घरीं जाऊन पोहोंचावें म्हणून सपाट्यानें जात होती. तिचे तें पायघोळ नेसलेलें लुगडे... कोन्या लुगड्यांच्या आंतून दिसणारी कंचुकी... तिच्या खांद्यावर खेळणारा सोन्याच्या कंठीचा पदर... पदराआडून 'मी आहे' म्हणणारा केसावरील गजरा... हातांत घेतलेलें गृहिणीला साजेल असें कसलेसें भांडे... ती नाजुक शरीर यष्टी... किति काव्यमय दिसत होते. पण हें रम्य पुष्प त्या आचरटास खुडून घेऊन... वास घेऊन... पायाखालीं तुडवावयाचें होतें... श्री बजरंगबलीचा आदर्श पुढे ठेऊन असा उद्योग निव्वळ उन्मत्तपणें करावा ! ब्रह्मचर्याबद्दल त्याच मल्ल लोकांनीं हौद्यांत आपल्या विद्यार्थ्यांना शिकवितांना मोठें वक्तृत्व पाघळावें आणि बाहेर निघाल्याबरोबर हा स्तुत्य उद्योग ! काय नीती ही ! 'बळी तो कान पिळी' ह्या न्यायानें ते वागावयाला जातात. अलिकडच्या कायद्याच्या युगांत 'सत्यमेव जयते' अशी स्थिती असते, हे ते विसरतात. चोर मुद्देमालासकट सांपडणें किंवा नुसती वृत्ती संशयास्पद वाटणें देखील वाटेल त्या मनुष्यांस चार तास अटकेंत ठेवण्यास कारणीभूत होते. तेव्हां अशल्या प्रकारचा जरासा सुगावा लागला कीं तडक बंदोबस्त करण्यांस हरकत ती कोणती ? पण तत्कालीन परिस्थिती फार भिन्न होती. रात्रीचा अंधार जितका गाढ होता तितकेंच कायद्याचें अज्ञान गाढ होतें.

ती वळली — हा वळला — ती पुन्हां वळली... हा पुन्हां वळला... तिनें मागें वळून पाहिलें चार पावलांवर हा पांढरा अवाढव्य अवतार आपल्याच रोखानें येतांना तिला दिसला. मग मात्र जरा घाबरली आणि जास्त झपझप चालूं लागली. पण हा कसचा सोडतो तिला ! एकदम् 'ठेरो' म्हणून मोठ्यानें ओरडला आणि

धावत जाऊन तिला धरलें. पण तितक्यांतच वरून एक वीट त्याच्या टाळक्यांत पडली व तो बेशुद्ध झाला. ती पुढें निघून गेली व हा तसाच रस्त्यावर तळमळत पडला होता. त्याचा एक मित्रही मागाहून झुलत झुलत येत होता. स्वारी खूपशी झोंकून आल्यामुळें झोकांड्या खात होती... शिव्या देत होती... रस्त्यांवर लोकांनांहीं बराचसा उपद्रव त्यांच्यापासूनही झाला होता म्हणून त्याला कोठें तरी ढकलून देण्याचा लोक प्रयत्न करीत होते व संधि मिळण्यास्तव त्याच्या मागोमाग येत होते.

' वो कहा गई ? बहोत खूपसूरत थी ! या अल्ला ऐसा कैसा कर दिया ! क्या... किसमत् मे नहीं थी... और भी दुसरी... वो चली... ! !

म्हणून जो येत येत अडखळून पडला तो रहिमतच्या अंगावर. दारुबाज मनुष्य एकदां खालीं पडला कीं त्याची उठण्याची ताकद नसते. दोघेंही त्या रात्रीं तथेंच पडून राहिल्यामुळें रस्त्यावरचा सारा व्यवहार बंद पडल्यासारखा झाला.

* * *

चार महिन्यानंतरची गोष्ट. लोकांना त्रास देऊन ' प्रसिद्धी ' पावलेले हे मल्ल कोणत्या हीन परिस्थितींत जाऊन पोहोंचले होते ! शक्तीच्या जोरावर इंद्रियसुखलालसा पुरवित पापकर्में करीत — केवळ मदोन्मत्तपणें वागले पण आतां ? त्यावेळीं कित्येकांना विनापराधें मार दिला... कित्येक पोरी पळविल्या... कित्येकांची अब्रनुकसान केली... कित्येक पतिव्रतांचे पातिव्रत्य भंगविले... कित्येक वेश्यांच्या हवेल्या उंच झाल्या. पण आतां ? पापाचा घडा भरला कीं संपलें सारें. श्रीकृष्णानें शिशुपालास शंभर अपराधाची माफी केली होती त्याप्रमाणें ह्यांनाही कदाचित् तशी झाली असेल ह्मणूनच ' दैव कोपलें ' नव्हतें. पण त्यांतूनही कित्येक वेळां मार खाल्ला — दंडुके मिळाले... पत्थर बसले... शिव्यांची लाखोली तर नेहमींचीच ! तरी ' नफटसे भलाई जोर, मारे जूते चढे नूर ! ' पण आतां ! ! सर्वांगावर रक्तपिती उठली होती ! किती विचित्र दिसत असत ते ! शरीर साफ

उतरून गेलें होतें. डोळ्यांत पूर्वीचा करारीपणा उरला नव्हता. सर्वांगावर रोग उद्भवल्यामुळें अती दीनवाणे झाले होते. इतके दिवस ह्या मल्लद्वयापासून त्रास झालेलीं माणसें लोकांच्या दयेस पात्र होत असत पण आतां हेच लोकांच्या मनांत कींव उत्पन्न करूं लागले. पूर्वीची रग आतां जिरल्यामुळें बिचारे अगदीं नरम आले होते. एखाद्या धर्मशाळेंत रात्र घालवावी, दिवसा दोनचार ठिकाणीं हलके हलकें फिरून जी लोकांच्या दयेनें भाजीभाकरी मिळेल ती ध्यावी, रडत काळ कंठावा अशी अवस्था झाली. दिवसेंदिवस रोग तर बळावत चालल्यामुळें बिचारे कंटाळले. मनुष्य संकटांत सांपडला ह्मणजे दैवास दोष देतो पण आपलें कर्म कसें होतें ह्याचा विचार ? पूर्वार्जित कर्मे फळतें ह्याचा प्रत्यक्ष अनुभव तो होता ! आतां ईशकृपेखेरीज इलाज नव्हता.

पहांटचा सुमार. आकाशांत तारकागण आपल्या व्यतीत रात्रीचा जणूं विचार करीत होता. चंद्रमा लवकर मार्ग आक्रमीत होता. पूर्वा सूर्यनारायणाच्या आगमनाची तयारी करीत होती. जणूं तिला आगाऊच तार मिळाला होता. रस्त्यावरून जाणारीं मंडळीं नियमाप्रमाणें गंगेवर स्नानास जात होतीं. सडकेवरचे दिवे आपणही गंगास्नानास जावें कीं रहावें ह्याचा विचार करीत होते. कित्येक जाऊन परत येत असलेलीं तोंडानें स्तोत्र पाठ ह्मणत होतीं. कोणी व्यंकटेशस्तोत्र — कोणी गंगाष्टक — कोणी 'इंदुकोटितेजकर्णि' — कोणी चर्पटपंजरी — कोणी महिम्न — कोणी गंगालहरी ह्मणत होते. एका हातांत धोतराचा पिळा व दुसऱ्या हातांत पाण्यानें भरलेला कलश. किती सात्विक वातावरण तें ! रस्त्यावरच्या धर्मशाळेबाहेर ओट्यावर हे मल्ल लोळत होते. तोंडानें सहज लक्षांत राहिलेले असें हिंदुस्थानी भजन ह्मणत ह्मणत... काठीनें ताल धरित होते. मधून मधून खिन्न असें खोल सुस्कारे टाकीत. इतक्यांत दूरवरून जयघोष ऐकूं आला.

स्वामीसमर्थ 'शिवहरशंकर नमामि शंकर... शिवशंकर शंभो' हें भजन ह्मणत एका शिष्यासमवेत येत होते. मूर्ती वृद्ध खरी पण तरुणांना लाजविणारा उत्साह त्यांचे अंगीं खेळत होता. पायीं खडावा घातल्या होत्या तरी किती सपाट्यांत येत होते. मल्लद्वयांनीं अभिवादन केलें. महाराज ह्मणतात...

' अबी जाव... गंगाजीका स्नान करके पवित्र हो जाना ! ' ते दोघे गंगेवर गेले. माणसाची वर्दळ नाहीं अशा बाजूच्या घाटावरून उतरत प्रवाहासमिध आले. गंगेचें स्नान कित्येक रोगग्रस्तांनीं केलें पण तें कुठें रोगमुक्त झाले — नुसत्या जल-स्पर्शानें हे रोग जाते तर त्यांचा इतका बाऊ कां होता — असे संशयी विचार कलुषित बुद्धिच्या संचयामुळें सहजच त्यांच्या मनांत आले. पण कुणाच्या हस्त-स्पर्शानें तर कुठल्याशा झऱ्याच्या पाण्यानें असे रोग गेल्याचे एका पात्रानें सांगित-लेलें त्यांना आठवलें. गंगेच्या पाण्यांत तसा गुण नसेल कशावरून ? आपल्या कुळांत हा रोग कुणालाच नव्हता — सत्पुरुषाच्या वाणींत असें सामर्थ्य असतें कीं ती नसलेला गुणही उत्पन्न करूं शकते. प्रयत्न तर करून पाहूं. असा विचार करून स्नान केलें — रोज स्नान करावें — स्वामीदर्शन घ्यावें व तेथें मिळेल तो प्रसाद भक्षण करून धर्मशाळेंत वसती करावी. प्रातःस्नान, थंडपाण्याचें स्नान, ' स्नानाय प्रतिवासरं भवतु मे गांगं जलं निर्मलम् ' असें भाग्य, रोज सत्पुरुषाच्या उत्साह-मूर्तीचें दर्शन व उत्कृष्ट प्रसादाचें भक्तिभावानें सेवन इतकीं एकवटल्यावर तो आगंतुक रोग पळ काढणार नाहीं असें नास्तिकांसही वाटणार नाहीं. मग मल्ल निरोगी झाले ह्यांत नवल कसलें ? श्रद्धा तसें फल.

# १४.

‘ दत्तगुरु गिरनारी – भरोंसा भारी – कृपा करी कीं भक्तावरीं – दर्शन देई रे सत्वरीं ’ असा श्वासाला श्वास लावीत गिरनार पर्वतावर एक साधु झोंपडींत बसले होते. समोर मृगाजिन असून त्या शेजारीसच – कमंडलु, कटोरा वगैरे – वस्तू पडल्या होत्या. बाहेर दुसरे कोणी चार साधु आल्याची चाहुल लागल्यामुळें तीच श्वासावली गुणगुणत ते बाहेर आले.

‘ दत्तगुरु गिरनारी... ’

‘ हो... हो... दर्शन देतील बरं... बाबा, आपण कलीयुगांतले संन्याशी. भले भले भागले – हटयोग, राजयोग असे योग योग करतां करतां रोग होऊन मेले, पण दर्शनाचा लाभ झाला नाहीं ! तर आपली कथा काय ? ’ पांचांच्या गप्पा सुरूं झाल्या .

‘ मोठे योग आचरिले... नाना प्रकारची दानकर्में यथासांग केलीं... पण चित्त-शुद्धीविना परमेश्वर प्राप्त होणार नाहीं ! ’

‘ बरं आतां बघूं या. आज काय खबरबात ? ’

‘ आज काय विचारतां ? सकाळीं वाघोबा आमच्या झोंपडीनजीक आले अन् मी इतका घाबरलों कीं दरदरून घाम सुटला ! ’

‘ परब्रह्मतदाकारवृत्ति हीच वाटते ! ’

‘ आज सकाळीं पर्वत चढून आलों पण आता असा उत्साह अंगीं खेळतो आहे कीं बस् ! ’

' पर्वत वर चढून येणाराला थकवा लागतच नाहीं असा महिमा आहे. स्वामिदर्शनाला उत्साहानें येणाऱ्या मनुष्याला दर्शनांत अंतर कधींच पडत नाहीं ! '

' आज ईशचिंतनांत निमग्न झालों होतों... समाधीअवस्थाच ती... समाधी उतरल्यानंतर पहातों तों पन्नगराज माझ्या मांडीवरून उतरले आणि सरपटत निघून गेले ! '

' हा मात्र खरा भाग्यशाली... ह्याला आशा आहे स्वामीदर्शनाची... बाकी सर्व यथातथाच ! ! '

* * *

असा संवाद साधुवृंदात नाहीं चालावयाचा तर कोठें ? गिरनार पर्वतीं वरच्या टोकांस एका चौथाऱ्यांवर हा आखाडा बसला होता. खालून पायऱ्या चढून येणारानें वर बघितलें असतें तर तो ह्या ऋषिवर्यांच्या जटाजूटभारानें व मुखावरच्या सांवळ्या रंगानें मनुष्यजातीच्या उत्क्रान्तीतत्वाच्या मूळाशींच येऊन पोंचता. पण ह्या ठिकाणावरून खालीं बघतांना व भोंवतालीन रम्य प्रदेश बघतांना ' नेत्र संतुष्ट झाले ' असेंच जो तो ह्मणाला असता..

एका बाजूस पायऱ्या दिसतात. ह्या पायऱ्यांच्या कित्येक हस्तिणीवर देवालयें आहेत. त्यावरील ध्वजा वाऱ्यानें फडफडत नेहमीं शांतताभंग करतात. वरच्या टोंकाला श्री स्वामीसमर्थांच्या पादुका असून त्या शेजारींसच गोमुखीतीर्थ आहे. तेथें एका मुखांतून ऊन पाणी येतें आणि दुसऱ्या बाजूस असलेल्या मुखांतुन थंड पाणी येतें. शिखरांवर शांततेचे पूर्ण साम्राज्य असतें. वनस्पतींचा सुगंध सर्व प्रदेशांत दरवळत असतो. दुपारचें वेळीं हुक्क्याची गुड्गुड देखील किती स्पष्टपणें ऐकूं येते. जरासें बोलले कीं प्रतिध्वनी इतका उठतो कीं तीं स्थळें ह्मणजे जणूं Whispering galleries !

सायंकाळच्या वेळीं अगदीं शिखरावर बसावें आणि समोर दिसणारा सूर्यास्ताचा देखावा बघावा. भगवान् सूर्यनारायण पश्चिमेच्या द्वारीं ताटकळत उभे न रहातां झपाट्यानें खालीं उतरत असतांना खालीं आकाशाचा भाग शिल्लक आहेसा वाटतो

व मधेंच सूर्यबिंब अंशाअंशानें दृष्टीआड होतेसें दिसतें. बिंबात त्या वेळीं रसरसणारा प्रकाश सौम्य असल्यानें बिंबाचे खंड कसे पडतात हें न्याहाळून पाहतां येते. भर दुपारच्या ज्या धगधगित सूर्याकडे वर डोळा करून पाहवत नाहीं, त्याच सूर्याचे खंड — तुकडे — उडतांना डोळे सुडकऱ्यासारखे त्याच्याकडें सारखे रेंखून पाहूं शकतात. एखाद्याला जिवंत गर्तेत पुरण्याचें दृश्य ह्याहून भयानक नसेल. त्या अभाग्याचे अवयव असेच अंशाअंशानें आपल्याला दिसेनासे होतात व इतकें होत असतांना पहाणाऱ्याच्या डोळ्याला पाण्याचा थेंबही येत नाहीं ! डोंगराच्या सहवासांत हृदयही डोंगरी — निव्वळ पाषाणाचें बनतें. मनाला मात्र थोडा विषाद वाटतो कीं तेजस्व्यांमधे श्रेष्ठ अशा ह्या महाभागाचा अंत असा — इतका अभागी व्हावा अं ! बा जगा, तेजस्व्याचा असा पाणउतारा करून त्याला छिन्नविच्छिन्न करण्यात तुला कोणता आनंद वाटतो ? पण मट्टीच्या जगाला तेजस्वी कुठचा मानवणार ? एकट्या तेजतत्वानें पचभौतिक जगावर इतकी दीर्घ सत्ता कां गाजवावी ह्याचें इतर चार महाभूतांना वैषम्य वाटलें — त्या चौकडीनें कट करून तेजाला गाडून टाकलें ! सृष्टी उदास झाला. तिला रंजविणारें, हंसविणारें, हर्षविणारें दर्शन दुर्दर्शन झालें. पुसून टाकलेल्या कुंकवामुळें येणारी भीषण आरक्तपाडुरता सृष्टीच्या कपाळावर दिसूं लागली. घरट्यांकडे जाणाऱ्या पक्ष्यांच्या पंखाप्रमाणें सृष्टीचें हृदय शांति मिळण्याकरतां फडफडूं लागलें. रातकिडे, कोल्हे, घुबड याच्या ओरडण्याप्रमाणें ती सती दुःखाला मोकळी वाट देऊं लागली. पवनांदोलित पर्णराजीनें सुस्कारे सोडून तिचे सांत्वन सुरू केले. पर्वतावरच्या साधु—संन्याशांनींही रांगड्या गाण्यास प्रारंभ करून तर्क—कर्कश ' वेदांत ' सांगून तिचें समाधान चालविलें — शंख-भेरींचे नाद झाले — जणू एकच आकांत उडाला — निरांजनें पेटवून श्रींची शेजारती झाली, सृष्टीला वाटलें हां आगीची शेजच घातली — श्री निजले, साधू निजले — पण सृष्टी ? — चांदण्याचे डोळे करून मलीन वदनानें ती बिचारी रात्रभर तात-कळत बसली !

*　　　*　　　*

किती स्वस्थपणें निजले होते ते ! रामकृष्ण – सेवादास वगैरे तपस्वी मंडळी बोलतां बोलता निजून गेलीं ! साक्षात्काराचा त्यांचा विचार मात्र जागत होता. मध्यरात्र उलटून गेली. आकाशांत चंद्रचंद्रिका आपल्या परिवारांसह साधूंवर पहारा करीत होती. समोरच्या बाजूस सप्तर्षींसह अरूंधती ह्या योग्यांकडे बघत होती. ध्रुवतारा योग्यांस मार्गदर्शकच होत होता. योगनिष्ठेचें ध्येय कठीण तर खरेंच पण तितकें साध्य करून योगनिद्रेचें अढळपद भोगण्यास जणूं शिकवीत होता. इतक्यांत सिंहगर्जना ऐकूं आली. मंडळी जागृत झालीं. ईश्वरध्यान, प्रातःस्मरण करावयास लागलीं. एकदम प्रकाश पडला. त्या प्रकाशानें डोळे दिपलेच असते खास – पण तितका प्रखर सूर्यप्रकाश नव्हता तो ! त्या प्रकाशांत ‘ संन्यासी वेष, दंड हातीं, सुवर्ण पादुका चरणीं ’ अशा वेषांत श्री स्वामीसमर्थांचे दर्शन झालें. स्वामी महाराज म्हणतात—

‘ मी चंचलभारती – मला नृसिंहभान म्हणतात – मी येथें तुम्हांजवळच असतो... इतकें तुम्ही कसें विसरता – साक्षात्कार हवा खरा कां ? ’

मंडळी चकीत झालीं. कालच दुपारीं ह्या विषयावर आपलें बोलणें झाल्याचें त्यांना आठवलें. स्नानादिक उरकून चंचलभारतीची मठी त्यांनीं शोधून काढली – आत जाऊन पहांटे दर्शन देणारी मूर्ति पाहिली – दर्शन घेतलें – साक्षात्कार घडवून आणण्याचे मार्ग श्रवण केले – आनंदानिमग्न झाले.




अक्कलकोटनिवासी श्रीपरमसद्गुरु स्वामिमहाराज.

# परिशिष्ट.

स्वामींच्या

चरित्राचें ऐतिहासिकदृष्ट्या

वि वे च न.

# अक्कलकोटचे स्वामिमहाराज

## — चरित्र —

अक्कलकोटचे स्वामीसमर्थ माहीत नाहींत असा मनुष्य विरळा. अक्कलकोटास इ. स. १८५७ पासून इ. स. १८७८ पावेतों एकवीस वर्षांच्या कालावधींत लोकांस नाना प्रकारच्या लीला दाखवून केवळ आपल्या सिद्धिप्रभावानें प्रसिद्धीला आलेले हे स्वामी लोकांचें परमपूज्य दैवत होऊन बसले व अजूनही त्यांच्याबद्दल चिरस्मरणीय अशी भावना लोकांच्या अंतरीं जागृत आहे. सिद्धिप्रभाव व अवतारिकत्व ह्या दोन भावना प्रत्यक्ष प्रचीतीस आल्यामुळें श्री स्वामीसमर्थांचें नांव आज सर्वतोमुखीं असून श्रीदत्तसंप्रदायाचे अध्वर्यु म्हणून आज त्यांना मान आहे. अशा अवतारी पुरुषाचें चरित्र आजपावेतों पुष्कळांनीं पुष्कळ तऱ्हेनें लिहिलें आहे. कोणी संस्कृत—कोणी प्राकृत—कोणी कादंबरीमय—कोणी चरित्रात्मक रूक्ष भाषेंत-कोणी वेदांत विषयांस प्राधान्य देऊन, तर कोणी अगदीं साधें सुटसुटीत ओविबद्ध असें लिहिलें आहे. ' विपुलाच पृथ्वी ' असल्यानें ते ग्रंथ कित्येकांनीं वाचले असतील अभ्यासिलेही असतील; परंतु कोणीही अद्याप लिहिलें नसलेलें संशोधनात्मक चरित्र लिहून आजपावेतों असलेली उणीव आम्ही अंशतः दूर करण्याचा प्रयत्न करणार आहोंत.

इंग्रजींमध्यें जसा Encyclopœdia Britanica तसा आपल्या महाराष्ट्र भाषेंत सर्व माहितीपूर्ण असा ' महाराष्ट्रीय ज्ञानकोष ' आहे. प्रस्तुतच्या

लेखाची उभारणी ' महाराष्ट्रीय ज्ञानकोषां ' तून दिलेल्या हकीकतीवरून झाल्याचें दिसून येईलच. पण प्रथमतः एवढें सांगणें बरें की ' ज्ञानकोषां 'त माहिती अशी फार थोडी दिली असून संशोधनदृष्ट्या इतकी महत्वाची नाहींहि. आणि म्हणूनच प्रस्तुतचा लेख आम्ही वाचकांस सादर करीत आहोंत.

---

## १ अक्कलकोटचे स्वामीमहाराजः—

हे गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेलेले महाराष्ट्रीय साधुपुरुष कधीं व कोठें जन्मले याविषयीं माहिती मिळत नाहीं. अक्कलकोटास स्थायिक होण्यापूर्वी ते मंगळवेढ्यास कांहीं वर्षे होते. तेथें दिगंबरबाबा या नांवानें लोकांस स्वामी अवगत होते; पण शिष्यसंप्रदाय किंवा दैवी अंश असल्याविषयीं प्रसिद्धि मुळींच नव्हती म्हटलें असतां चालेल. उलट पुष्कळ जण त्यांना 'वेडा' म्हणत. सं. १८५७ मध्यें स्वामी अक्कलकोटास आले. तेथेंही बरींच वर्षे आपल्या गावांत कोणी महान् साधु आहे अशी फार थोड्या अक्कलकोटकरांस कल्पना होती. हैदराबाद संस्थानांतील माणिकनगर (हुमणाबाद) चे माणिकप्रभु समाधिस्त झाल्यावर हे स्वामीमहाराज प्रकट झाले म्हणतात.

स्वामी अक्कलकोटास देहावसान होईपावेतों होते. त्यांची कीर्ती जिकडे तिकडे पसरल्यावर राजेरजवाडे धरून सर्व भाविकलोक अक्कलकोटची यात्रा करूं लागले. त्यांच्या भक्तांत सर्व जातीचे व दर्जाचे लोक आहेत. स्वामींची रहाणी व वागणूक पुष्कळांस चमत्कारिक वाटे पण त्यात पूर्ण विरक्तता भरलेली असे. ते कधींच कोणाच्या तंत्रानें वागले नाहींत व कोणाला कधीं त्यांनी धड उत्तरही दिलें नाहीं. मात्र ते जे कांहीं बोलत तें त्यांच्या दर्शनास येणाऱ्यांच्या मूक प्रश्नाला उत्तर म्हणून तंतोतंत जुळें असें सांगतात. त्यांची बरदास्त राजाला शोभेशीच असे, तरी राजविळासांत ते कधींच गुरफटलेले दिसत नसत.

( पुढचा मजकूर पान ५ वर पहा. )

# स्वामिसमर्थांचा जन्मकाल निर्णय.

स्वामीसमर्थ अक्कलकोटास १८५७ सालीं आले ही गोष्ट सर्वमान्य आहे. पण त्याजवरून जन्मकालनिर्णय होणें शक्य नाहीं. श्री समर्थ अक्कलकोटास आले त्यावेळीं जवळ जवळ ४५०।५०० वर्षांचे ते जुनाट पुरुष असावेत असा लोकांनीं तर्क केला होता. दुसरी एक समजूत प्रचलित होती की श्री स्वामीसमर्थ गाणगापुरच्या नरसिंह सरस्वतींचे अवतार असून त्यांचे अक्कलकोट येथील जीवन-चरित्र म्हणजे 'श्रीगुरुचरित्र' ग्रंथाचा उत्तरार्ध होय. तिसरी समजूत अशी कीं स्वामीसमर्थ फारच जुने आणि तें इतके कीं हिंदुस्थानांत पहिला चिनी प्रवासी आला त्यावेळीं स्वामीमहाराज हिमालयावर गुहेंत तपश्चर्या करीत होते. हा चिनी प्रवाशी म्हणजे इ. स. ६३० मध्यें आलेला हुएन शांग होय असें मानण्यांत येतें. आणखी एक कल्पना कानीं येते ती अशी कीं स्वामी 'गोरे ग रूप तुझें । तुला पाहिले सात ताल माडीवरी' अशा तऱ्हेच्या लावण्या म्हणत असत म्हणून ते पेशव्यांच्या काळांतले असावेत.

आतां ह्या सर्व विधानांची सत्यता कशा काय पटते तीं आपण बघूं या. स्वामीमहाराज ४५०।५०० वर्षांचे जुनाट पुरुष असावेत आणि श्री नरसिंह सरस्वतींचे अवतार असावत ह्या विधानात कांहीं अंशीं सत्यता भासते. त्याचें कारण असें कीं एकवेळ एक इंग्लिश बॅरिस्टर एका पारशी गृहस्था समवेत अक्कल-कोटास आला असतांना स्वामी महाराजाच्या मुलाखतींत बॅरिस्टरानें आपण कोण,

---

स्वामींनी दाखविलेल्या चमत्कारांच्या गोष्टी पुष्कळ सांगतात. अक्कलकोट येथील एका कडुलिंबाच्या झाडाची पानें त्यांनी जो गोड करून टाकिलीं तीं अद्यापि तशींच लागतात असें भाविक लोक सांगतात.

शके १८०० चैत्र व. १२ स स्वामी 'निजानंदी निमग्न' झाले. समा-धीच्या जागीं त्यांचें स्मारक बांधलें आहे. —महाराष्ट्रीय ज्ञानकोष भा. ६.

कोठील, काय असे प्रश्न विचारले असतां महाराजांनी त्यांस खालीलप्रमाणें उत्तर दिल्याचें ' मराठे ' कृत चरित्रांत नमूद आहे.

' प्रथम मी कर्दळीवनांतुन निघालों... नंतर नाना तीर्थांचे ठायीं यात्रा करीत करीत... वास करीत... सध्यां येथें येऊन राहिलों आहे '.

ह्या उत्तरांतील ' कर्दळीवन ' म्हणजे श्रीगुरुचरित्रांतल्या ५१ व्या अध्यायांतीलच असें मानण्यांस कांहीं हरकत नाहीं. गाणगापुरचें नरसिंहसरस्वती पंधराव्या शतकाच्या शेवटच्या पादांत विद्यमान होते आणि ते कर्दळीवनांतून,

' कन्या गतीं बृहस्पती—बहुधान्य संवत्सरीं ख्यातीं
सूर्य चाले उत्तर गतीं—संक्रांत कुंभ परियेसा ३७
शिशिर ऋतू माघ असितपक्ष प्रतिपदेस
शुक्रवार पुण्य दिवस—श्रीगुरु बैसले निजानंदीं. ३८

—श्रीगुरुचरित्र अ. ५१.

तेव्हां हे सर्व योग शके १३८० मध्यें येतात. × तेव्हां शके १३८० पासून शके १७७८।७९ पावेतों अज्ञातवासांत राहून शके १७७८ सालीं अक्कलकोटीं पुन: प्रकट झाले. ह्यावरून पहातां त्यांचें वय ४००।४५० वर्षांपावेतों नसूं शकेल काय ? गाणगापुरास त्यांचा वास ४०—५० वर्षेंच झाला असें ' गुरुचरित्र ' च सांगते. ह्याप्रमाणें पाहिलें तर श्रीनरसिंह सरस्वतीचा जन्मकाळ शके १३३० गणतां येईल. तेव्हां ह्या विधानांतच सत्यता भासते म्हणून हीच भावना खरी असावी असें वाटतें.

स्वामी समर्थ मंगळवेढ्याहून अक्कलकोटीं आल्याचें सांगतात. त्यांतही सत्यता असावी. स्वामीमहाराज नाना तीर्थें आचरून आल्याचें सांगत त्याप्रमाणें मंगळवेढ्यास कांहीं कालपर्यंत ' गोविंदबुवा ' ह्या नांवानें प्रसिद्ध नसतील कशावरून ?

---

× ' महाराष्ट्र सारस्वत, ' वि. ल. भावे.

आतां दुसरें विधान म्हणजे हुएनशांग प्रवाशी त्याच्या हकीकतीबद्दलचें. इ. स. ६३० त चिनी प्रवासी आला त्यावेळीं दत्तभक्तीचा प्रसार देशांत नव्हता. एवढें मात्र खरें कीं हिमालयावर इतर साधुवर्य पुष्कळ तपश्चर्या करीत असतील. ब्रम्हनिष्ठ. वामननबुवा वैद्य वामोरीकर यांनीं आपल्या ' श्रीगुरुलीलामृत ' ग्रंथांत एका चिनी व्यापाऱ्याची हकीकत दिली आहे. तो व्यापारी हुएनशांग हा खास नव्हे. स्वामीमहाराज नरसिंह सरस्वतींचें. अवतार म्हणून गाणगापुर येथें कित्येकांना कित्येक वेळां दृष्टान्त होऊन कित्येक जण श्रीसमर्थचरणीं नत झाले. श्री दत्तोपासनेस मुळीं एकनाथापासून सुरवात झाली. जनार्दनस्वामी आणि श्रीनरसिंहसरस्वती हे समकालीन होत असें ' महाराष्ट्र सारस्वत ' कार भावे म्हणतात. तेव्हां हिमालयावर हे स्वामिश्रेष्ठ इ. स. ६३० त कसे असूं शकतील ?

लावण्या म्हणत म्हणून स्वामी पेशवाइंतले असावेत हें विधान तपासूं. लावण्या म्हटल्यानें साधुवृत्तीस बाध येणें शक्य नसतें एवढेंच ह्या विधानावरून म्हणतां येईल. पण जन्मकाल काढतां येणें शक्य नाहीं. आजकालच्या गंधर्वांच्या गाण्याप्रमाणें लावण्या आबालवृद्धांच्या तोंडीं बसण्याचा काल म्हणजे श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब यांची कारकीर्द. पेशवाई सोंपून देण्यापूर्वी श्री. बाजीराव हे चिदंबर दिक्षित यांजकडेस गेले होते. त्यावेळीं श्री स्वामीसमर्थ चिदंबर दिक्षित यांजकडेस यज्ञप्रसंगीं तूप वाढण्याचें काम करीत असल्याचें श्रीसमर्थांनीं अनेकवेळा अनेकांपाशीं सांगितल्याचें आपण ऐकतोंच. ह्यावरून श्री स्वामीसमर्थ चिदंबर दिक्षितांकडे तीर्थे आचरीत असतांनाच असावेत असें वाटतें. नंतर मंगळवेढ्यास ' गोविंदबुवा ' ह्या नावानें... नंतर ' चंचल भारती ' या नावानें... आणि नंतर मग अक्कलकोटीं इ. स. १८५७ सालीं प्रगट झाले.

तेव्हां ह्या प्रकरणाचा निष्कर्ष इतकाच कीं श्रीस्वामीसमर्थ नरसिंहसरस्वतींचें अवतार असून अक्कलकोटीं असतांना त्यांचे वय ४५०|५०० वर्षांचें होतें. श्रीनरसिंहसरस्वतींचा जन्मकाळ निश्चित होण्यांस मार्ग नाहीं आणि कोणी प्रयत्न केल्यांस हरकत घेण्यांत येते असें श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबे स्वामी म्हणत. तेव्हां श्री

नरसिंह सरस्वतींचा जो जन्मकाळ तोच अक्कलकोटस्वामींचा हें निराळें सांगणें नलगे.

अक्कलकोटच्या स्वामी महाराजांची पत्रिका अहमदनगरचे ज्योतिषी नानारेखी जोशी ह्यांनीं तयार केली होती. त्याबद्दल माहिती मिळवितां, ती पत्रिका तर आज अस्तित्वांत नसल्याचें कळतें पण त्यांत नमूद केलेली ग्रहस्थिती वगैरे खालील प्रमाणें आहे असें वे. मू. दत्तोपंत रेखी नगरकर कळवितातः—

" मध्यहिंदुस्थानांत हस्तिनापुरापासून १२ कोसांवर छेलिखेडा ह्या नांवाच्या गावीं शके १०७१ त चैत्र शु. २, गुरुवारीं, प्रथम प्रहरीं ह्मणजे दोन घटका दिवसाला अश्विनी नक्षत्र आणि प्रीतायोग अशा वेळीं श्रीस्वामीसमर्थांचा जन्म झाला. "

ह्यावरून पुन्हा पत्रिका कोणी तयार केल्यास त्यांच्या चरित्राचा फलज्योतिषाच्या दृष्टीनें विचार करतां येईल. पण सध्यां तर ह्या कल्पना आणि समजुतींवरच समाधान मानून घेणें भाग आहे.

## स्वामीमहाराजांची जातः—

" अक्कलकोटकर स्वामीविषयीं राजवाडे सांगत कीं त्यांचें आडनांव बापट होते. ते दक्षिणेंत बंड करण्याच्या निमित्तानें आले आणि त्यांच्या बरोबर याच हेतूनें आलेली मंडळी म्हणजे आळंदीचे नरसिंहसरस्वती आणि पुण्याचे काळुरामबुवा हे होत. हे दक्षिणेंत बंडाचा उठाव होऊं शकत नाहीं म्हणून गप्प बसले. दक्षिणेंत आले त्या वेळीं ह्यापैकीं कोणीही साधू नव्हते हे तिघेही बाजीरावाबरोबर जी आश्रित मंडळी बिठूरला गेली त्यांचे मुलगे होते. "[1]

---

१ ' राजवाड्यांनी सांगितलेल्या गोष्टी ' ' विद्यासेवक ' फेब्रुवारी १९२७.


—डॉ. केतकर श्री. त्र्यं.

वरील माहिती श्री स्वामीमहाराजांच्या तोंडून ऐकलेल्या माहितीशी बरीच विसंगत दिसते. एक वेळीं अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांस एकानें विचारलें. ' आपण कोण, कोठील ? ' त्यावेळीं महाराज म्हणाले...

' [illegible] '

शकें १०७१ दोन घटका दिवसास अश्विनी नक्षत्र आणि प्रीतीयोग

चैत्र शु. २.




श्री अक्कलकोटनिवासी स्वामीसमर्थ

वर दिलेल्या जन्मकालावरून अशा प्रकारची कुंडली होऊं शकेल.

[illegible]

मंडळींना सांप्रदायिक विशेषणें म्हणून चौदा रत्नांची एक नामावलीच तयार केलेली आढळते.

---

१ एका इतिहास संशोधकानें हा प्रवाद तोंडी सांगितला.

त्यांतील रत्नें खालीलप्रमाणे—

१ भक्तकार्य कल्पद्रुम. २ गुरुसार्वभौम. ३ श्रीमंत राजाधिराज. ४ योगी महाराज. ५ त्रिभुवनानंद. ६ अद्वैत. ७ अभेद. ८ निरंजन. ९ निरालंब. १० निर्गुण. ११ परिपूर्ण. १२ सदोदित. १३ सकलमतस्थापक. १४ सद्गुरु×

ह्या श्रीदावलींतील वैशिष्ट्य ह्या दृष्टीनें विचार केला तर श्री दत्तसांप्रदायी संस्थापकांचीं ध्येयें अगदीं अशीच होतीं. उदाहरणार्थः— अक्कलकोट स्वामींचें ध्येय असें असून, लोक त्यांचा 'राजाधिराज योगिराज श्रीअक्कलकोटस्वामी महाराज की जय' म्हणून जयघोष करीत असतच. जनार्दनस्वामीस श्री दत्तत्रयांनीं खुद्द उपदेश दिला. त्यांच्या शिकवणुकीचें वर्णन एकनाथानें आपल्या भागवतांत केलें आहे. ती शिकवणूक अशी—

हात ठेवितांची तत्काळ
मिथ्या प्रपंचाचें मूळ
कर्म करूनि अकर्ता
देहीं असोनि विदेहता
**गृहस्थाश्रम न सांडिता**
**निजव्यापारीं वर्ततां**
तो बोधू आकळतां मना

बोधू आकळिला सकळ
स्वरूप केवळ स्वबोधें
तोचि अकर्तात्मबोध जाहला देता
तेहीं तत्त्वतां आकळिली
**कर्मरेखा नोलांडितां**
**बोधू सर्वथा न मैळे**
मन मुकलें मनपणा

—एकनाथी भागवत. अध्याय ९.

तेव्हां स्वार्थ साधून परमार्थ करावा हेंच सारसर्वस्व. ह्यापासून त्यांना शिकवावयाचें हेंच कीं कलियुगीं परमेश्वराचें नामच तारक आहे. तेव्हां कोणत्याही परिस्थितींत असा, ईशचिंतनीं निमग्न असा.

ह्या सांप्रदायाचें प्रथम पुरस्कर्ते जनार्दनस्वामी आणि श्रीनरसिंहसरस्वती, नंतर 'बालसरस्वती' 'कृष्ण सरस्वती' वगैरेंनीं काय सांप्रदाय चालविला असेल तेवढाच. त्यानंतर हुमणाबादेस श्रीमाणिकप्रभूंनीं पुन्हां सांप्रदायास चालना दिली व अगदीं अलीकडचे असे श्रीअक्कलकोटचे स्वामी प्रसिद्ध आहेतच.

× करमणूक ७-१२-१९२५

## स्वामींची दिनचर्या

महाराजांस प्रातःकाळीं चोळाप्पा ( महाराजांचा परम प्रिय असा सेवक – ज्याचे घरीं महाराज रहात. ) स्नान घालून कपाळास केशर कस्तुरीचें गंध लावी. महाराज दोन आचमनें घेत. ते स्वतः हातानें क्वचितच जेवीत. त्यांस एखाद्या लहान मुलाप्रमाणें भरवावें लागे. ते लंगोटी नेसत असत अथवा कित्येक प्रसंगीं त्यांस ती नेसवावी लागे. ते तोंडानें—

पंढरीचे लोका किती मारूं हांका – तेथें माझा सखा पांडुरंग

*　　　　*　　　　*

पीठं यस्य धरित्रीं जलचरकलशं लिंगमाकाशमूर्ति ।
नक्षत्रं पुष्पमाला ग्रहगणकुसुमं नेत्रचंद्रार्कवन्हिः ॥
कुक्षौ सप्त समुद्रं भुजागिरि शिखरं सप्तपातालपादम् ।
वेदं वक्त्रं षडंगं दशदिशि वसनं दिव्यलिंगं नमामि ॥

*　　　　*　　　　*

शिवहर शंकर नमामि शंकर । शिवशंकर शंभो ॥

वगैरे चरण अथवा श्लोक म्हणत.

सकाळपासून संध्याकाळपावेतों दर्शनाची इतकी गर्दी होत असे कीं महाराजांस विश्रांती कशी ती मिळतच नसे. कांहीं खुणा करून – कांहीं प्रत्यक्ष भाषणानें दर्शनास आलेल्या मनुष्याच्या गोष्टीचा खुलासा महाराज करीत. महाराज लहान मुलांप्रमाणें खेळत. हातांत मूर्ती घे, तिच्याकडेच बघ... कापसाचा गोळा कर, त्या बंदुकीप्रमाणेंच लाव... माप हातात घे, त्यांत तांदूळ भर... इकडील वस्तू तिकडे ठेव... तिकडली इकडे... हातांत 'बाबागाडी 'च घे... कुठे पंख्याशींच खेळ... असे नानाप्रकारें खेळत. दुपारीं कोणास दर्शन द्यावयाचें नसलें म्हणजे निजल्याचें सोंग करीत... तोंडी शिव्या बऱ्याच होत्या... पण त्यांच्या तोंडून शिव्या ऐकणें म्हणजे कृपाप्रसाद होणें असें लोक समजत... महाराजांची त्रिकाळ

आरती होत असे... महाराजांस बहुतेक दत्ताच्याच आरत्या म्हणून ओवाळीत... महाराजांस अक्कलकोट संस्थानचे राजे कै. श्री. मालोजीराजे व श्री. मा. राणी-साहेब, भजूं लागण्यापूर्वी महाराज चोळाप्पा जितक्या साधेपणानें रहात असे तितक्या साधेपणानें रहात असत पण नंतर संस्थानांतून सर्व व्यवस्था लागल्यामुळें महाराज ' राजयोगी ' बनले. त्यांची बरदास्त तशी जरी ठेवली होती तरी त्या व्यवस्थेंत ते कधींच ' मग्न ' होत नसत. त्यास श्रीमंती आणि गरिबी सारखीच वाटे.

## स्वामींची शिकवणूक.

साधुत्वाची परांकोटी ज्यनीं साधली अशा योगीजनाच्या चरित्रापासून काय शिकवणूक नसेल ? स्वामिसमर्थांच्या वागणुकीवरून जर कोणी शिकवणुकीचा विचार केला तर ते बालाशीं बालवत्... गृहस्थाशीं गृहस्थी बाण्यानें... वेदांत्याशीं वेदांत्यासारखें असें वागून ' पानी तेरा रंग कैसा तो जिसमें मिलावे वैसा ' ह्या म्हणीची सार्थकता आपल्या स्वभाववैशिष्ट्यानें करून दाखवीत. त्यांची आनंदी मुद्रा दुसऱ्यांस ' नेहमीं आनंदी रहा ' असा संदेश कथन करीत असे. त्यांची कोपाविष्टता दुर्गुणांचा तिरस्कार करण्यास शिकवीत असे. त्यांची अमृततुल्य गोड वाणी गोड बोलण्याचा धडा शिकवीत असे. कनवाळूपणानें—मन मोकळेपणानें वागण्यांतच मौज आहे—जीवनसर्वस्व आहे – असें ते नेहमीं म्हणत. व्यवहार-चातुर्याचा उपदेश देतांना महाराज म्हणत ' धीर सो गंभीर— उतावळा सो बावळा ! ' प्रयत्नवादाबद्दल त्यांचा अगदीं कटाक्ष असे. कोणी ऐतखाऊ तेथें आला का महाराज त्यांस म्हणत ' आयतें खायला हुडकतो... ऐदोबा नाहीं तर ! ! ' त्यांना गाणें फार प्रिय असे. त्यावरून त्यांना एवढेंच सुचवायचें असेल की नाम मात्र घ्या. ईशचिंतन करा. मनोरंजनापरी मनोरंजन आणि वरती परमार्थप्राप्ती... त्यांना हिंदुमुसलमान सारखेच प्रिय असत त्यावरून या दोन जातींची एकी करण्याचा प्रयत्न करावयास सुचवीत नसतील काय ? समतेची भावना अंगीं असल्यावर

तशा प्रकारचा प्रयत्न अभिनंदनीय होणार नाहीं काय ? महाराज सोंवळ्या ओंवळ्याचा प्रश्न फारसा विचारांत घेत नसत आणि अंतःशुद्धीच्या शिकवणुकी देत असत ह्यावरून मनःशुद्धीची श्रेष्ठता प्रस्थापित करतां येणार नाहीं काय ?. देहाची पवित्रता—अंतःकरणाची विमलता दोन्ही श्रेष्ठ खऱ्या. पण अंतःकरणाची विमलता देहशुद्धीपेक्षां कित्येक वेळीं श्रेष्ठ ठरत नाहीं काय ? अगदीं शेवटीं समाधिकालाच्या वेळीं सर्व भक्तमंडळीस निरोप देतांना महाराजांनीं खालील श्लोक म्हटले ...

## ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।

*　　　*　　　*

### अनन्याश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
### तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

ह्यावरून त्यांच्या भक्तजनांबद्दल किती कनवाळूपणाच्या भावना असत हें दिसून येईलच.

## स्वामींचे कवित्व.

अक्कलकोटापासून १२ कोसांवर लोहारगाव ह्या नांवाच्या गावीं बापु कुळकर्णी या नांवाचें गृहस्थ रहात असत. त्यांस गळ्याची कांहीं व्यथा असल्यानें ते अतिशय कंटाळून गाणगापुरास गेले. श्रीमद्दत्तात्रयाच्या कृपेनें रोग बरा झाल्यानंतर त्यांनीं ३००-४०० अभंग केले पण त्या अभंगाचा शेवटचा चरण जमेना म्हणून ती अभंगरचना तशीच पडून राहिली. कांहीं दिवसानंतर गृहस्थमजकुरास 'अक्कलकोटच्या स्वामींचें दर्शनाशिवाय कार्यसिद्धी होणार नाहीं' म्हणून दृष्टान्त झाला. बापुराव अक्कलकोटास आले आणि अनन्यभावानें स्वामीस वंदन केलें. ह्याच वेळीं महाराजांनी त्यांच्या अभंगाची शेवटचा चरणें सांगितली. हे कवि 'दास बापु' ह्या नांवानें प्रसिद्ध होते. दास बापुंची अभंगरचना आज कुणाजवळ असल्यास अगर पुढे-मागे शोध लागल्यास स्वामींच्या कवित्वशक्तीबद्दल तो एक खात्रीलायक पुरावा होऊं शकेल.


## श्री स्वामींचा समाधिकाल.

श्री स्वामीसमर्थ शके १८०० चैत्र वद्य १३।१४ रोजीं म्हणजे ता. ३० एप्रिल १८७८ रोजीं निजानंदीं निमग्न झाले. त्यांचे पट्टशिष्य ब्रह्मनिष्ठ वामनबुवा वैद्य वामोरीकर यांनीं, आपल्या ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासानुसार तत्कालिन ग्रहस्थितिमान ग्रथित केलें आहे. त्यांनीं ग्रथित केलेल्या ग्रहमानावरून खालीलप्रमाणें कुंडली मांडतां येईल.

## श्री स्वामीसमर्थांच्या समाधिकालीं असलेली ग्रहस्थिति.

शके १८०० चैत्र व॥ १३।१४ ता. ३०-४-१८७८

र. घ. २७ प. ४८




तेव्हां श्रीसमर्थ अशा शुभकालीं समाधिस्त झाले. समाधिस्त झाल्यावर—अवतारकार्य संपविल्यावरही—समाधीची शीळा बंद केल्यावरही कित्येकांस आंतून भाषणें ऐकूं आल्याचें सांगतात.

63.40
गोवा


# न मे भक्तः प्रणश्यति ।

REFBK-0004380

स्वस्त पण सुबक पुस्तक बांधणी !

# एन्. मिराखोर आणि मंडळी.

सर्व प्रकारचीं लहान-मोठीं पुस्तकें चांगलीं सुबकपणें बांधलीं जाऊन एम्बासिंगचें काम देखील करण्यांत येतें. दर माफक. काम नियमित. विशेष माहिती विचारा—

**नारायण महादेव मिराखोर**, बुकबाईंडर

दाडियाबाजार **बडोदें.**

## १. श्रीगुरुलीलामृत

**( श्रीगुरुचरित्राचा उत्तरार्ध )**

अध्याय ५५. ओवीसंख्या सुमारे १८००.

कै. ब्रह्मनिष्ठ वामनबुवा वैद्य वामोरीकर.

**( श्री अक्कलकोट स्वामी समर्थांचे शिष्य-कृत. )**

या ग्रंथांत विशेषतः भक्तिरस प्राधान्य असून श्रीमद्दत्तावतारी अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ यांचें रसाळ चरित्र ग्रथित केलें आहे. प्रपंचांत राहून परमार्थ साधून, जन्ममरण संसृति भयापासून कशा रीतीनें मुक्त व्हावें हें गुरुशिष्यसंवाद रूपानें श्रुति, स्मृति आणि महर्षिजन यांच्या वचनाधारांनीं यथायोग्य प्रतिपादित केलें आहे. किंमत रुपये २॥ ट. ख. निराळा.

## २. सांप्रदायिक आरत्या.

[ अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ ह्यांच्या मठांतील आरत्यांचा संग्रह ]

संपादकः—**श्री. शं. पट्टणकर.** किंमत दोन आणे.

वरील पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः— मांडवीनजीक,

**श्रीदत्तमंदिर,-बडोदें.**